



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २१ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# सुप्रीम कोर्टाच्या निकालावर ठरणार महापालिकेच्या सत्तेचे गणित

## शिंदेसेनेचे नगरसेवक अपात्र ठरणार?

**पुणे/प्रतिनिधी :** शिवसेना नाव आणि चिन्हाबाबत सुप्रीम कोर्टात उद्या म्हणजे आज २१ जानेवारीला अंतिम सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतर सुप्रीम कोर्ट त्यांचा निकाल देईल. मात्र या निकालावर एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील नगरसेवक, आमदार आणि खासदार यांचं भवितव्य ठरणार आहे. जर शिवसेना नाव आणि चिन्ह वापरण्यास सुप्रीम कोर्टाने मनाई केली तर एकनाथ शिंदेंकडे २ पर्याय उभे राहतात. त्यावर पुढची महापालिकेतील सत्तेची गणिते अवलंबून आहेत. याबाबत वकील असीम सरोदे यांनी भाष्य केले आहे.

वकील असीम सरोदे म्हणाले की, गेल्या ३ वर्षांपासून या खटल्यात अनिश्चितता आहे. २१ जानेवारीला सुनावणी होईल असं मागच्या तारखेला कोर्टाने सांगितले होते. मात्र हे प्रकरण ३७ व्या नंबरवर ठेवले आहे. त्यामुळे कोर्टाचं कामकाज पाहता दुपारी ४ पर्यंत सुनावणी होईल अशी शक्यता कमी आहे. जर निकाल द्यायचा ठरवला असेल तर उद्धव ठाकरे यांच्या बाजूने तो लागेल. त्यामुळे तारखा हा एक मार्ग असू शकतो. शिवसेनेत जे नगरसेवक, आमदार, खासदार निवडून आलेत तेव्हा कायदेशीरपणे शिवसेना पक्ष एकनाथ शिंदे यांना देण्यात आला होता. ते धनुष्यबाण वापरू शकत होते त्याचा अधिकार निवडणूक आयोगाने शिंदेंना दिले होते. त्यामुळे



जे निवडून आलेले सदस्य आहेत त्यांच्यावर कुठलीही अपात्रतेची कारवाई होणार नाही. पण ज्याक्षणी हा निर्णय येईल तेव्हा त्यांच्याकडून शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह जाईल. धनुष्यबाण चिन्ह हे एकतर उद्धव ठाकरेंना देण्यात येईल किंवा ते गोठवण्यात येईल. मग एकनाथ शिंदे हे पक्ष हिन होतील. त्यांना दुस-या पक्षात जावे लागेल. एकतर शिंदे स्वतःचा पक्ष बनवू शकतात किंवा त्यांना भाजपात जावे लागेल. जे निवडून आलेले सदस्य आहेत ते पदावर असले तरी ते कुठल्याही पक्षात जाउ शकतात त्यांना कुणाचे बंधन असणार नाही. त्यातील सगळेच भाजपात जातील असं नाही असं त्यांनी सांगितले.

तसेच संविधानिक दृष्टीने निर्णय झाल्यास तो उद्धव ठाकरे यांच्या बाजूने लागेल. कायदेशीर चुकीचा निर्णय कुणालाच देता येणार नाही. यापूर्वी सुप्रीम कोर्टाने उद्धव ठाकरेंबाबत जो निर्णय दिला होता तो चांगला होता परंतु त्याची चुकीची अंमलबजावणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी केली. जर एकनाथ शिंदे यांच्याकडील शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह वापरण्यास कोर्टाने मनाई केली तर शिंदे त्यांच्या पक्षातील सगळ्या लोकांसह अनाथ होतील. त्यानंतर शिंदेंना एकच मार्ग उरतो तो म्हणजे भाजपात विलीन होणे. भाजपात इतक्या मोठ्या प्रमाणात आधीच काँग्रेस, उद्धव ठाकरे यांच्या पक्षातून लोक आयात केले आहेत. आता भाजपात खूप जास्त जागा नाही. भाजपात एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत काही लोकांना प्रवेश दिला जाईल परंतु शिंदेंकडील सगळ्यांनाच भाजपात प्रवेश दिला जाणार नाही. त्यावेळी वेगळा पक्ष काढणे आणि त्या पक्षांतर्गत नांदणे हे शिंदेंच्या हातात आहे. त्याशिवाय ज्यांना भाजपात प्रवेश मिळणार नाही अशा काही नेत्यांना मूळ शिवसेनेत नक्कीच स्थान दिले जाउ शकते. त्यामुळे महापालिकेचेही गणित बदलेल. त्यातून महापौर आणि संख्याबळ याची समीकरणेही बदलतील असा दावा वकील असीम सरोदे यांनी केला. दरम्यान, मी जर-तर च्या भाषेत सांगत असलो तरी जर-तर यावरच आपल्याला विचार करावा लागेल कारण सुप्रीम कोर्टात निकाल लागला तर त्याचा हा विषय आहे. आपल्या बोलण्यातील अनिश्चितता सुप्रीम कोर्टात तारीख पे तारीख यामुळे होत आहे. निकाल कधीही लागला तरी तो उद्धव ठाकरे यांच्या बाजूनेच लागेल ही संविधानिक सत्याची बाजू आहे. ज्यावेळी विधानसभा निवडणूक झाली तेव्हा शिवसेना पक्ष आणि चिन्ह शिंदेंकडे असल्याने कायदेशीरपणे जे निवडून आलेत त्यांच्यावर कारवाई होणार नाही. परंतु ते शिवसेनेचे आमदार राहणार नाहीत तर त्यांना इतर पक्षाचे आमदार म्हणून राहावे लागेल. यापुढच्या निवडणुकीत ते धनुष्यबाणाचे आणि शिवसेनेचे उमेदवार नसणार. त्यामुळे हा राजकीय बदल एका संविधानिक निर्णयातून येउ शकतो. कोर्टातून सुरू झालेला सत्तासंघर्ष हा कोर्टातच संपवण्याची ताकद न्यायालयात आहे. सत्तासंघर्षाची बीजे कोर्ट उखडून फेकेल आणि एक बेंचमार्क कोर्ट ठरवेल असा विश्वास असीम सरोदे यांनी व्यक्त केला.

# भाजपा आणि काँग्रेसच्या हालचालींना वेग; 'मॅजिक फिगर'साठी डावपेच

**अकोला/प्रतिनिधी :** महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर होताच शहराच्या राजकारणात प्रचंड हालचालींना वेग आला आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपकडून जोरदार प्रयत्न सुरू असतानाच, महापालिकेत दुसरा मोठा पक्ष म्हणून पुढे आलेल्या काँग्रेसनेही पुढाकार घेत भाजपविरोधी सर्व पक्षांना एकत्र आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळे महापालिकेतील सत्तासंघर्ष अधिकच रंगतदार झाला आहे.





महापालिका निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक ३८ नगरसेवक निवडून आले असून, साध्या बहुमतासाठी त्यांना अवघ्या तीन नगरसेवकांची गरज आहे. दुसरीकडे काँग्रेसचे २१ नगरसेवक विजयी झाले असून, उद्धवसेनेचे सहा, वंचितचे पाच, राष्ट्रवादी (शरद पवार)-तीन, एमआयएमचे तीन नगरसेवक आहेत. राष्ट्रवादी (अजित पवार) चा एक, शिंदेसेनेचा एक, महानगर विकास समितीचा एक आणि एक अपक्ष नगरसेवक आहे. त्यामुळे ४१ चा 'मॅजिक फिगर' गाठण्यासाठी दोन्ही प्रमुख पक्षांकडून डावपेच आखले जात आहेत.काँग्रेसकडून भाजपविरोधी सर्व पक्षांना एकत्र येण्याची हाक देत आघाडी सत्ता स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दुसरीकडे भाजपने मात्र गोपनीयता पाळत रणनीती आखली असून, दोन राजकीय पक्षांचे मिळून सहा नगरसेवक गळाला लावल्याची खात्रीलायक माहिती आहे. निकाल जाहीर होताच भाजपने सत्ता मिळवण्यासाठी 'फिल्डिंग' लावली असून, विविध पक्षांच्या नगरसेवकांशी थेट संवाद साधला आहे.

**१० नगरसेवक भाजपच्या गळाला?**-भाजपकडे एका राजकीय पक्षाचे चार, दुस-या पक्षाचे तीन, एका पक्षाचा एक, एक अपक्ष आणि एक इतर असे दहा नगरसेवक असल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे भाजपकडे महापालिका सभागृहातील संख्याबळ ४८ पर्यंत गेल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, त्यासाठी काहींनी गट स्थापन करण्याची तयारी केल्याचीही माहिती आहे.

**छोट्या पक्षांवर लक्ष!**-पक्षांतरविरोधी कायदा नगरसेवकांनाही लागू असून, एखाद्या पक्षाचे दोन-तृतियांश किंवा त्यापेक्षा नगरसेवक वेगळे झाल्यास, ती पक्षातील फूट मानली जाते आणि त्या नगरसेवकांचे पद कायम राहते. कायद्यातील याच तरतुदीचा लाभ घेत संख्याबळ वाढवण्याचे आणि सभागृहात बहुमत मिळविण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी संख्याबळ कमी असलेल्या पक्षांवर नजर ठेवली जात आहे.

**पहिल्या दिवसापासून फोडाफोडी**-पहिल्याच १ दिवसापासून फोडाफोडीचे राजकारण सुरू झाले असून, पडद्यामागे बैठका, चर्चा आणि वाटाघाटींचे सत्र सुरू आहे. कोणता पक्ष 'मॅजिक फिगर' गाठून सत्ता स्थापन करतो, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. सध्या तरी महापालिकेच्या सत्तेसाठी सुरू असलेली रस्सीखेच उत्सुकता निर्माण करणारी आहे.

# महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी आज सुनावणी

## ◆ दोन्ही राज्यांचे सुनावणीकडे लक्ष ◆ 8 वर्षांनंतर पहिलीच सुनावणी

**बेळगाव/वृत्तसंस्था :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी अखेर आठ वर्षांनंतर बुधवार दि. २१ जानेवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या दिवशी मूळ दाव्यावर सुनावणी होईल. त्याकडे सीमावासीयांचे लक्ष लागून आहे. सीमाप्रश्नी महाराष्ट्राच्या वतीने दावा मेन्शन करण्यात आला होता. वरिष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. सी. एस. वैद्यनाथन आणि अ‍ॅडव्होकेट ऑन रेकार्ड शिवाजी जाधव यांनी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नी लवकरात लवकर सुनावणी व्हावी, अशी विनंती केली होती. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी ही विनंती मान्य करून बुधवारी सुनावणी निश्चित केली आहे. या दिवशी मूळ दाव्यावरच सुनावणी होण्याची शक्यता आहे. अनेक लढे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्यामुळे २००४ मध्ये महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. यामध्ये केंद्र सरकार प्रतिवादी क्रमांक एक असून कर्नाटक सरकार प्रतिवादी क्रमांक दोन



आहे. सुरवातीपासूनच दोन्ही प्रतिवादींनी या दाव्यात वेळकाढूपणा केला आहे. २०१३ मध्ये या याचिकेवर साक्षी, पुरावे तपासणे आणि वादाचे मुद्दे निश्चित करण्यासाठी कोर्ट कमिशनची नियु-त्ती करण्यात आली. तर न्यायालयात कर्नाटकाने फेरविचार याचिका दाखल करत पुन्हा वेळकाढूपणा केला आहे.

२०१७ मध्ये शेवटची सुनावणी झाली होती. त्यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विधिज्ञ अ‍ॅड. हरिष साळवे यांनी महाराष्ट्राची बाजू मांडली होती. आगामी सुनावणीलाही त्यांची नियुक्ती करावी, यासाठी मध्यवर्ती समितीतर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. उच्चाधिकार समितीची बैठक व्हावी, यासाठीही पत्रकार व्यवहार करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोन वेळा बैठक घेण्यात आली. तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष खासदार धैर्यशील माने यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले. पण ही बैठक झाली नाही. दरम्यानच्या काळात वरिष्ठ वकिलांशी समिती नेत्यांची ऑनलाईन संवाद झाला आहे. आता आठ वर्षांनंतर पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यामुळे सीमावासीयांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# डीजीपी रामचंद्र राव अखेर निलंबित

## ◆ अश्लिल व्हीडीओ व्हायरल प्रकरण ◆ मुलीलाही झाली होती अटक

**बंगळूरू /वृत्तसंस्था :** कर्नाटकचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि डीजीपी पदावर कार्यरत असलेले रामचंद्र राव यांना निलंबित करण्यात आले आहे. सोशल मीडियावर त्यांचे आक्षेपार्ह व्हीडीओ व्हायरल झाल्यानंतर राज्य सरकारने ही कारवाई केली. रामचंद्र राव हे कर्नाटकमध्ये डीजीपी (सिव्हिल राइट्स एन्फोर्समेंट) या पदावर कार्यरत होते.



सोमवारी सोशल मीडियावर काही व्हीडीओ क्लिप मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्या. या क्लिपमध्ये रामचंद्र राव हे वेगवेगळ्या महिलांसोबत अश्लील वर्तन करत असल्याचे दिसत असल्याचा दावा केला जात आहे. हे व्हीडीओ समोर येताच प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. प्रकरण गंभीर असल्याने सरकारने तातडीने निलंबनाचा निर्णय घेतला. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना रामचंद्र राव यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मी पूर्णपणे धक्क्यात आहे. हे व्हीडीओ बनावट आहेत. माझा त्यांच्याशी काहीही संबंध नाही असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. राव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, आजच्या काळात कोणाचाही फेक व्हीडीओ बनवणे शक्य आहे आणि त्यांची प्रतिमा खराब करण्याचे हे कटकारस्थान असू शकते.

रिपोर्ट्सनुसार, व्हीडीओ जुने असू शकतात का, असे विचारण्यात आल्यानंतर १९९३ बॅचचे आयपीएस अधिकारी रामचंद्र राव यांनी सांगितले की जुने असतील तर साधारण आठ वर्षांपूर्वीचे, म्हणजे मी बेलगावीमध्ये पोस्टिंगला असतानाचे असू शकतात. मात्र तरीही त्यांनी पुन्हा ठामपणे सांगितले की या व्हीडीओंचा माझ्याशी काहीही संबंध नाही.

व्हीडीओ प्रकरण बाहेर आल्यानंतर रामचंद्र राव यांनी राज्याचे गृह मंत्री जी. परमेश्वर यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र ही भेट होउ शकली नाही. सरकारने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणार असल्याचे संकेत दिले असून तपास अहवालानंतर पुढची कारवाई केली जाईल.या वादावर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कडक भूमिका घेतली आहे. आज सकाळी मला याबाबत माहिती मिळाली. अधिकारी कोणत्याही पदावर असो, कायदा कोणासाठीही वेगळा नाही. प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल असे त्यांनी सांगितले.

**रान्या राव प्रकरणामुळे आधीच चर्चेत**

रामचंद्र राव हे अभिनेत्री रान्या राव यांचे वडील असल्याने हे प्रकरण आणखी चर्चेत आले आहे. रान्या रावला गोल्ड स्मगलिंगच्या प्रकरणात आधीच अटक झाली होती. मार्च २०२५ मध्ये ती दुबईहून परत येताना तिला पकडण्यात आले होते. तिच्याकडून १४.८ किलो सोन्याचे बार जप्त करण्यात आले होते. या सोन्याची किंमत अंदाजे १२.५६ कोटी रुपये असल्याचे सांगितले गेले. यानंतर एजन्सींनी बंगळुरूतील लवेल रोडवरील निवासस्थानावर छापा टाकून तिथूनही मोठ्या प्रमाणावर संपत्ती जप्त केली होती.

# सात देशांचे सैनिक ग्रीनलँडमध्ये दाखल

**नूक/ब्रुसेल्स/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँड ताब्यात घेण्याबाबत केलेल्या वक्तव्यानंतर युरोपमधील देश एकवटले असून, नाटोमधील अनेक सदस्य राष्ट्रांनी ऑपरेशन आर्क्टिक एंड्युरन्स या संयुक्त लष्करी सरावाला सुरुवात केली आहे. या मोहिमेंतर्गत फ्रान्स, जर्मनीसह सात युरोपीय देशांचे सुमारे ३४ ते ४० सैनिक ग्रीनलँडमध्ये दाखल झाले आहेत.फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान म्हणाले की, येत्या काही दिवसांत जमिनीवरून, हवेतून आणि समुद्रामार्गे या दलाला अधिक बळ दिले जाईल. सैनिकांची संख्या मर्यादित असली, तरी नाटो एकसंघ आहे, हा राजकीय संदेश देणे महत्त्वाचे आहे. डेन्मार्कच्या संरक्षण मंत्रालयानुसार, ऑपरेशन आर्क्टिक एंड्युरन्स हा भविष्यातील मोठ्या तैनातीची तयारी तपासण्यासाठीचा सराव आहे. पुढचा टप्पा म्हणून ऑपरेशन आर्क्टिक सेंट्री नावाच्या मोठ्या नाटो मोहिमेचा विचार सुरू आहे. जर्मनीचे संरक्षणमंत्री बोरिस पिस्टोरियस म्हणाले की, याला अजून काही महिने लागू शकतात.



**नाटो आणि ब्रिटनची भूमिका**

नाटोचे महासचिव मार्क रुटे यांनी ट्रम्प यांच्याशी चर्चेनंतर दावोस येथील वर्ल्ड इकानामिक फोरमदरम्यान राजनैतिक प्रयत्न सुरू राहतील, असे सांगितले. ब्रिटनचे पंतप्रधान कीअर स्टारमर यांनी ट्रम्प यांच्याशी फोनवर बोलून, नाटोच्या सामूहिक सुरक्षेसाठी काम करणा-या मित्रदेशांवर टॅरिफ लावणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले. युरोपियन संसदेत अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराला स्थगिती देण्याची मागणी जोर धरत आहे. अमेरिकन वस्तूंवरील शुन्य टक्के टॅरिफ थांबवण्याचीही मागणी होत आहे.

**पोलंड, इटली, तुर्कीये मोहिमेपासून दूरच-** नाटोतील पोलंड, इटली आणि तुर्कीये यांनी ग्रीनलँडमध्ये सैनिक पाठवण्यास स्पष्ट नकार दिला आहे. पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांनी या मोहिमेत सहभागी होणार नाही असे सांगितले. इटलीचे संरक्षणमंत्री गुइडो क्रोसेत्तो यांनी संपूर्ण मोहिमेलाच विदुषकीपणा असे म्हटले. ही मोहीम एक विनोद आहे असे संबोधले आहे.

**तालिबानमध्ये राडा**

# दोन खुंखार गटातच लढाई

**काबूल/वृत्तसंस्था :** अफगाणिस्तानच्या तालिबानी सरकारविषयी तेथील जनतेच्या मनात भयानक भीती आहे. त्यांनाच काय, अखब्या जगाच्या मनात त्यांच्याबद्दल साशंकता आहे. कारण, हे तालिबानी केव्हा काय करतील याचा काहीच भरवसा नाही. अमेरिकेचं सैन्य अफगाणिस्तानमध्ये असतानाच्या काळातही तालिबान्यांनी त्यांच्या नाकीनउ आणले होते. तालिबान्यांच्या क्रूर राजवटीमुळे तेथील जनता भयभीत आहे, पण आता तालिबानी सरकारच पडण्याची भीती निर्माण झाली आहे. याचे कारण तालिबान्यांच्या दोन सत्तास्थानांमध्ये सुरू झालेली सुंदोपसुंदी ! तालिबान सरकारमध्ये दोन प्रमुख गट आहेत. पहिला गट आहे सुप्रीम लीडर हिबतुल्लाह अखुंदजादा यांचा आणि दुसरा गट आहे गृहमंत्री हक्कानी यांचा. या दोन्ही खुंखार गटात आता फूट पडली आहे आणि ते आमनेसामने आले आहेत.

# आता 'वीज' WiFi सारखीच मिळणार; घरांत तारांशिवाय लाईट येणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आपल्याकडे वीज तारांद्वारे मिळते. तारांशिवाय वीज येत नाही. तारांमधूनच वीज एका जागेवरून दुस-या जागी जाते. पण, आता यामध्ये मोठा बदल होणार आहे. कारण आता वीज तारांशिवाय, म्हणजेच वायरलेस पद्धतीने आपल्याला घरात मिळणार आहे. सध्या, आपल्याकडे जसा मोबाईल फोनवर कॉल येतो, इंटरनेट चालते किंवा मोबाइल वायरलेस चार्ज होतो, त्याच पद्धतीने वीजही हवेतून पोहोचवता येईल, असे शास्त्रज्ञ सांगत आहेत. हे ऐकायला जरी अवघड वाटत असले तरी, फिनलँड देशाने हे प्रत्यक्षात करून दाखवले आहे.

फिनलँडमध्ये वायरलेस पॉवर ट्रान्सफरवर वेगाने संशोधन सुरू आहे. केबल, प्लग किंवा सॉकेटशिवाय वीज पाठवता यावी, असे शास्त्रज्ञांचे उद्दिष्ट आहे. यासाठी आल्टो विद्यापीठ, हेलसिंकी विद्यापीठ आणि औलू विद्यापीठ या विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणावर अभ्यास केला जात आहे.२०२५-२६ दरम्यान, या क्षेत्रात महत्त्वाचे यश मिळाले. ध्वनीतरंग, रेडिओ फ्रिक्वेन्सी, लेझर आणि मॅग्नेटिक फील्ड्स यांच्या मदतीने हवेतून वीज पाठवण्याचे प्रयोग यशस्वी झाले आहेत. वायरलेस चार्जिंगमध्ये इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डचा वापर होतो. एका बाजूने उर्जा पाठवली जाते आणि दुस-या बाजूने ती उर्जा घेतली जाते. फिनलँडमधील संशोधनामुळे आता डिव्हाइस अचूक ठिकाणी ठेवण्याची गरज नाही. हलत असतानाही डिव्हाइस चार्ज होउ शकते. लॅबच्या बाहेरही हे तंत्रज्ञान यशस्वी ठरत आहे. छोटे इलेक्ट्रानिक उपकरणे, रोबोट्स आणि सेन्सर्स हवेतून वीज घेताना दाखवण्यात आले आहेत. काही प्रयोगांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त कार्यक्षमता मिळाली आहे. २०२५ मध्ये टाईम मॅगझीनने फिनलँडच्या या तंत्रज्ञानाला सर्वोत्तम शोधांमध्ये स्थान दिले. तरीही अजून घरांमध्ये पूर्णपणे वायरलेस वीज पोहोचायला वेळ लागणार आहे. सध्या हे तंत्रज्ञान कमी अंतर आणि कमी वीज क्षमतेसाठी अधिक उपयुक्त आहे. मोठ्या अंतरासाठी आणि जास्त वीज वापरासाठी अजून संशोधनाची गरज आहे. मानवी आरोग्यावर होणा-या परिणामांचाही अभ्यास सुरू आहे. तज्ञांच्या मते,



घरांमध्ये, गाड्यांमध्ये आणि संपूर्ण शहरांमध्ये वायरलेस वीज पोहोचण्यासाठी अजून काही वर्षे लागणार आहेत. पण भविष्यात तारांशिवाय वीज ही गोष्ट नक्कीच वास्तवात येउ शकते.




**तमिळनाडूत राष्ट्रगीतावरून हायव्होल्टेज ड्रामा**

# राज्यपाल विधानसभेतून बाहेर पडले

**चेन्नई/वृत्तसंस्था :** तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी आणि मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या सरकारमधील वाद आता टोकाला पोहोचला आहे. विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान राष्ट्रगीताचा अवमान झाल्याचा आरोप करत राज्यपालांनी थेट सभागृहातून बाहेर पडणे पसंत केले. तामिळ गीतासोबतच राष्ट्रगीतही वाजवले जावे, ही राज्यपालांची मागणी विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावल्याने हा पेच निर्माण झाला आहे. विधानसभेच्या सत्राची सुरुवात परंपरेनुसार तामिळ गीताने झाली. मात्र, राज्यपालांनी आग्रही मागणी केली की तामिळ गीतासोबतच राष्ट्रगीतही वाजवले गेले पाहिजे. या मागणीवरून विधानसभा अध्यक्ष अप्पावू आणि राज्यपाल यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. अध्यक्षांनी ही मागणी मान्य करण्यास नकार दिल्यानंतर, संतापलेल्या राज्यपालांनी अभिभाषण न करताच सभागृहातून काढता पाय घेतला.



**राष्ट्रगीताचा सन्मान राखला गेला नाही-** सभागृहाबाहेर पडल्यानंतर राज्यपालांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. राष्ट्रगीताला योग्य सन्मान दिला जात नाही, याचे मला प्रचंड दुःख वाटते. माझ्या अभिभाषणात वारंवार अडथळे आणले गेले. मला माझ्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे, पण राष्ट्रगीताचा सन्मान हा सर्वतोपरी असायला हवा असे आर. एन. रवी यांनी म्हटले आहे. इतकेच नव्हे तर, बोलताना माझा माईक बंद करून माझा अपमान करण्यात आला असा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.

**सलग तिस-या वर्षी बहिष्कार-**आर. एन. रवी यांनी तमिळनाडू विधानसभेच्या सत्रावर बहिष्कार टाकण्याची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वी २०२४ आणि २०२५ मध्येही त्यांनी राज्य सरकारच्या धोरणांशी असहमती दर्शवत अभिभाषण देण्याचे टाळले होते. राजभवनाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात सरकारवर असहकार्याचा आरोप करण्यात आला आहे.



# फेब्रुवारीत अमरावतीला मिळणार नवीन महापौर

## २२ जानेवारीला आरक्षण सोडत

**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिका निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला. त्यामुळे महापालिकेत १७वे महापौर कोण? याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. मात्र, राज्य शासनाने सोमवारी पत्र जारी करीत गुरुवार, २२ जानेवारी रोजी मंत्रालयात नगरविकास राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेत महापौरपदाचे आरक्षण सोडत काढण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी अमरावतीचे नवे महापौरपद कोणत्या प्रवर्गसाठी आरक्षींत निघते, याकडे राजकीय धुरंधरांच्या नजरा लागल्या आहेत. तसेच आरक्षण ड्रॉ निघाल्यानंतर नगरसचिव द्वारा विभागीय आयुक्तांना पत्र पाठवले जाणार असून त्यानुसार विभागीय आयुक्त पहिला विषय सभा आणि महापौर निवडणुकीची तारीख घोषित करणार आहेत. तारीख निश्चित झाल्यावर पहिल्या सभेसाठी कमीत कमी ८ दिवसाची नोटीस दिली जाणार आहे. यानुसार अमरावतीला फेब्रुवारी महिन्यात नवीन महापौर मिळणार असल्याचे दिसत आहे. अमरावतीमध्ये एक फेब्रुवारी नंतरच महापौर आणि उपमहापौर यांची निवड होणार आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक बोलावून महापौर आणि उपमहापौर यांच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असून आरक्षण ड्रॉ निघाल्याच्या २४ तासानंतर नगरसेवकांची पहिली आमसभा बोलविण्यात येणार आहे. यानंतर नगर विकास विभागाच्या वतीने विभागीय आयुक्तांना पत्र पाठवण्यात येणार आहे. यानंतर नवीन नगरसेवकांना आमसभेसाठी कमीत कमी आठ दिवसापूर्वी नोटीस दिली जाईल. यानंतर आमसभा आणि महापौर आणि उपमहापौर यांच्या निवडणुकीची तारीख निश्चित केली जाईल.

महापालिकेत २२ प्रभागांतून ८७ सदस्य निवडून आले आहे. महायुतीत महापौरपद हे भाजपच्या वाट्याला जाईल असे संकेत आहे. मात्र, अमरावती महापालिकेत आतापर्यंत महापौरपदाचे आरक्षण पहाता आणि रोटेशननुसार नवे महापौरपद हे सर्वसाधारण महिलांसाठी राखीव निघेल, अशी सूत्रांची माहिती आहे. १० मार्च १९९२ ते ८ मार्च २०२२ या ३० वर्षाच्या कार्यकाळात अमरावती महापालिकेत १६ महापौरांनी धुरा सांभाळली आहे. तर ९ मार्च २०२२ पासून तर आतापर्यंत महापालिकेत 'प्रशासकराज' सुरू आहे. भाजप २५, युवा स्वाभिमान पक्ष १५, काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ११, शिंदेसेना ३, बसपा ३, उद्धवसेना २ आणि वंचित १ असे ८७ नगरसेवक निवडून आले आहेत. भाजप, युवा स्वाभिमान व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होईल, असे चित्र आहे.

# शुभ विचारांतच शिव - ह.भ.प. वैभवश्री पांडे

## घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराजांचा संजीवन समाधी सोहळा



चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यांतील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आणि विदर्भातील एकमेव संजीवन समाधी असलेल्या चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यात मंगळवारी दुसऱ्या दिवशी संगीतमय शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले. प्रवचनात विदर्भ कन्या ह.भ.प. वैभवश्रीजी पांडे (वृंदावन) यांनी म्हटले की, 'शिव म्हणजे शुभ. आपल्या बोलण्यात, वागण्यात आणि विचारात जो चांगुलपणा आहे, तेच शिवतत्त्व आहे,' असे सांगत भक्तांना आत्मपरिवर्तनाचा संदेश दिला.

मंगळवारी संगीतमय शिवपुराण कथेत प्रवचन करतांना ह.भ.प. वैभवश्रीजी पांडे यांनी शिवपुराणातील आशय अत्यंत सोप्या आणि हृदयस्पर्शी शब्दांत उलगडला. त्यांनी सांगितले की, 'शिव म्हणजे केवळ देव नाही, तर शुभत्वाचे प्रतीक आहे. या विश्वात जे काही मंगल, पवित्र आणि चांगले आहे, ते शिवतत्त्व आहे. आपण कुणाबद्दल वाईट बोलू शकतो, पण जर आपण शुभ बोलत असू, तर आपल्या शब्दांतच शिवत्व प्रकट होते.' कथेच्या माध्यमातून त्यांनी भक्तांना आत्मचिंतनाचा संदेश दिला. 'आपल्या बोलण्यात, वागण्यात आणि विचारात चांगुलपणा यावा, हीच शिवपुराण कथेची खरी शिकवण आहे,' असे स्पष्ट करत त्यांनी भक्ती म्हणजे केवळ पूजा नसून जीवन जगण्याची पवित्र पद्धत असल्याचे अधोरेखित केले. या भक्तिमय प्रवचनाने संपूर्ण परिसर शिवनामाच्या गजराने दुमदुमून गेला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने कथा श्रवणाचा लाभ घेतला. श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यातील हा शिवपुराण कथा सप्ताह भक्तांच्या मनात शिवत्व जागवणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा ठरत आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### अखेर उपचारादरम्यान मंथन

बोलेरो कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील श्रीकांत सुधीर देशमुख (वय ३५) यांच्या पायाला तर मंथन देशमुख यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत दोन्ही जखमींना तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र मंथन देशमुख यांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील रीम्स हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. उपचार सुरू असतानाच मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ रोजी प्राणज्योत मालवली.या घटनेनंतर संतप्त झालेल्य वणी येथील नागरिकांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने तिवसा पोलीस स्टेशनमध्ये धडक देत अपघातास कारणीभूत ठरलेल्या बोलेरो चालकावर तात्काळ कारवाई करून अटक करण्याची मागणी करण्यात आली. आरोपी चालकास अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची ठाम भूमिका ग्रामस्थांनी यावेळी घेतली. दरम्यान मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आला होता.

यामुळे काही काळ तिवसा पोलीस स्टेशन परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यातील तसेच वणी येथील मोठ्या संख्येने ग्रामस्थ घटनास्थळी जमा झाले होते.या दुर्दैवी घटनेमुळे देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मंथनच्या अकाली मृत्यूमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान या प्रकरणाचा पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहेत.

### पिंपळखुटा येथील ग्रामसेवकाचा

ग्रामसेवक हे विकासाचे कामे जरी करीत असेल, तरी ते काम गावातील एका विशिष्ट राजकारणी लोकांना परस्पर मदत करण्याच्या हेतूने करतात. त्यामुळे गावामध्ये राजकीय असंतोष वाढत असून त्यामधून गावामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. अशा ग्रामसेवकांमुळे पिंपळखुटा या गावाची प्रतिमा मलीन होण्याच्या मार्गावर आहे.

त्यामुळे गावकऱ्यांनी दिलेल्या निवेदनावर गटविकास अधिकारी यांनी तात्काळ कारवाई करावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास गावकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिलेला आहे. जर गावामधील वातावरण बिघडले आणि कायदा व सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण झाला तर याला कोण जबाबदार राहणार याचा विचार सुद्धा संबंधित अधिकारी यांनी करावा अशी विनंती निवेदनातून करण्यात आलेली आहे.

### बच्चू वानरे, ठाकरे, देशमुख,

देशमुख तर सदस्य म्हणुन वंदना हजारे, अंकित कदम,पूनम कोकाटे ,सुमेध सरदार यांचा समावेश आहे.

शिक्षण व आरोग्य समिती सभापती अनिल मोटवानी तर सदस्य म्हणुन ममता राय,वंदना हजारे, कीर्ती इमले,हर्षल वाघ,आणि महिला व बाल कल्याण समिती सभापती दुर्गा भूत समिती सदस्य म्हणून आचल प्रधान, शालिनी राऊत, कल्पना लांजेवार, निलोफर शेख तसेच स्थायी समिती सदस्य पप्पू भालेराव (गटनेते)यांची निवड झाली.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपस्थित नगरसेवक आणि मान्यवरांनी सर्व नवनियुक्त सभापती व सदस्यांचे अभिनंदन केले. आगामी काळात सर्व पदाधिकारी प्रशासनासोबत मिळून चांदूर रेल्वे शहराच्या विकासासाठी कटिबद्ध राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नागरिकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करणे आणि नगरपरिषदेचा कारभार अधिक पारदर्शक, गतिमान व लोकभावनेचा आदर करण्याच्या सूचना व आश्वासन यावेळी देण्यात आले.

या प्रसंगी भाजप महिला शक्तीच्या धामणगाव नगराध्यक्षा अर्चना रोठे, विधानसभा प्रमुख जनार्दन रोठे, गटनेते पप्पू भालेराव, स्वीकृत सदस्य डॉ. सुभाष पनपालिया, शहराध्यक्ष नंदा वाधवानी, शैलेंद्र मेटे, धामणगावचे स्वीकृत नगरसेवक नरेंद्र चौधरी, अजय हजारे, गोटू गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते.

### परतवाडा-अंजनगाव मार्गावरील

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे उपविभागीय अधिकारी वानखडे सर, ढेपे सर, परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरेश म्हस्के , साहेबराव काठोळे, सुधीर रसे, तुषार खेरडे, हिरूजी गायन यांच्यासह महामार्गालगत असलेल्या गावांचे सर्व सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीदरम्यान महामार्गावरील अपघात प्रवण ठिकाणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. रस्त्यावर आवश्यक ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविणे, अपुरी असलेली प्रकाश व्यवस्था (स्ट्रीट लाईट) तातडीने सुरू करणे, दिशादर्शक व सूचनाफलक लावणे, तसेच वेगमर्यादा व वाहतूक नियंत्रणाबाबत प्रभावी उपाययोजना करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महामार्गालगत राहणाऱ्या नागरिकांनी आपल्या समस्या मांडत अपघात रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून लवकरात लवकर आवश्यक सुधारणा करण्याचे आ. केवलराम काळे यांच्या समक्ष संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

'परतवाडा ते अंजनगाव महामार्गावर होणारे अपघात ही गंभीर बाब असून नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत. याबाबत कोणतीही दिरंगाई न करता अपघात प्रवण ठिकाणी तातडीने स्पीड ब्रेकर, प्रकाश व्यवस्था आणि दिशादर्शक फलक बसविण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविली जाणार आहे.

**-आमदार केवलराम काळे**

### व्यवसायिक निलेश बदुकले हत्या

तालुक्यात खळबळ उडाली होती. पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवत आरोपी अजय लंगोटे याला अटक केली. अटकेनंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता, सरकारी वकिलांनी तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली.

तपासादरम्यान हत्या करण्यामागील कारणे, आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग, तसेच या प्रकरणाशी संबंधित इतर संभाव्य आरोपींचा शोध घेणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयासमोर नमूद केले. यावर सुनावणी करत न्यायालयाने आरोपी अजय लंगोटे याला २२ तारखेपर्यंत पीसीआर देण्याचा आदेश दिला. दरम्यान, या खून प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असून, लवकरच महत्त्वपूर्ण खुलासे होण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या

वरीष्ठाकडे तक्रार केली आहे.

दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा येथील शेतकरी भिमराव विठ्ठल कुऱ्हाडे यांनी कापूस गाडीचे वजन बाजार समितीच्या धरम काट्यावर गाडीचे कापसासहीत वजन केले असता कापसा सहित ७७ क्विंटल ८५ किलो एवढे भरले नंतर तीच गाडी सदगुरु जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी येथे सीसीआयला कापूस दिला असता गाडीचे कापसा सहीत वजन ७८ क्विंटल २५ किलो भरले. त्यामुळे कापसाचे गाडीचे वजन ४० किलोने कमी भरले. नंतर तीच गाडी सदगुरु प्रेसिंग जिनिंग मध्ये ७८ क्विंटल २५ किलोची गाडी खाली केल्यानंतर ३० क्विंटल ३५ किलो भरली .

कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर येथे धरम काट्यावर निव्वळ कापसाचे वजन ४७ क्विंटल ६५ किलो भरले आणि सदगुरु जिनिंग प्रेसिंग दर्यापूर मध्ये निवळ कापसाचे वजन ४७ क्विंटल ९० किलो भरले. दुसऱ्या गाडीचे वजन धरम काटयावर कापसासहीत वजन ७१ क्विंटल १४ किलो खाली गाडीचे वजन ३० क्विंटल २० किलो भरले आणि कापसाचे निव्वळ वजन ४१ क्विंटल २५ किलो तर सदगुरु जिनींग प्रेसिंग मध्ये कापसासह संपूर्ण गाडीचे वजन ७१ क्विंटल ६५ किलो खाली गाडीचे ३० क्विंटल ३० किलो आणि निव्वळ कापसाचे वजन ४१ क्विंटल ३५ किलो भरले.

### दर्यापूर-दहीहांडा रस्त्याच्या निकृष्ठ

त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.

प्रकरणाचे गांभीर्य पाहून आमदार गजानन लवटे तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा फौजफाटा घेऊन रस्त्यावर उतरले. पाहणी दरम्यान कामाचा दर्जा अत्यंत सुमार असल्याचे दिसताच आमदारांनी अधिकाऱ्यांना भर रस्त्यात सर्वांसमोर चांगलेच झापले.

भ्रष्ट कंत्राटदारांचे लाड पुरवणे बंद करा अन्यथा शिवसेनेचा हिसका दाखवावा लागेल अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी केली. संबंधित कंत्राटदाराचे बिल तात्काळ रोखून त्याचे सर्व परवाने रद्द करण्याचे आणि त्याला काळ्या यादीत टाकण्याचे आदेश त्यांनी दिले.

'आमच्या तालुक्यात जनतेच्या पैशांची लूट चालू देणार नाही. कंत्राटदाराने तात्काळ दर्जेदार काम पुन्हा सुरू करावे, अन्यथा शिवसेना आपल्या पद्धतीने त्याला धडा शिकवेल,' असा थेट इशारा आमदार गजानन लवटे व नितेश गावंडे यांनी दिला आहे.

शिवसेनेच्या या आक्रमक पवित्र्यामुळे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांचे धाबे दणाणले असून, नागरिकांनी या निर्णयाचे कौतुक केले आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेंद्र दिपटे,विकास येवले, युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर,युवासेना उपशहरप्रमुख दिपक बगाडे, सामाजिक कार्यकर्ते नितेश गावंडे, इंजि.यश लवटे यांच्यासह शिवसेना युवासेनेचे आजी - माजी पदाधिकारी व संबधित अधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

### अमरावतीत प्रथमच १२ लाखांच्या

केले आहे. अशा प्रकारच्या उच्च बक्षीस रकमेच्या स्पर्धा शहरांमध्ये वारंवार होत नसल्याचे त्यांनी नमूद केले. स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण ठाकरे, स्वप्नील बनसोड, दीपक चौहान, सोनल तांबे, तसेच सिनिअर नॅशनल आरबिटर योगेश रावंदते व विजय

ढाले हे पंच म्हणून उपस्थित राहणार आहेत. अमरावती शहराला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ नकाशावर नेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा अमरावतीतील बुद्धिबळ चळवळीला नवे बळ देणारी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

ही स्पर्धा फिडे (FIDE), ऑल इंडिया चेस फेडरेशन (AICF), महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना व अमरावती चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात येत असून, फिडे मानांकनासाठी पात्र आहे. त्यामुळे नवोदित खेळाडूंना आंतरराष्ट्रीय मानांकन मिळवण्याची तसेच विद्यमान रेटिंग वाढवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

### दिलदार ढाब्यामध्ये शिरले दोन

विभागाच्या पथकाने येथे पोहोचून पंचनामा केला. परिसरात वन विभागाची पेट्रोलिंग वाढवण्याची मागणी करण्यात आली. या घटनेमुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मोर्शी नगरपरिषदेत विषय

आली असून सदस्यपदी सुनीता सुनील कोहळे,निलेश महल्ले,सागर ठाकरे, रवींद्र गुल्हाने यांची निवड करण्यात आली. आरोग्य व स्वच्छता सभापतीपदी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कमरुनिसा शेख शब्बीर यांची निवड करण्यात आली असून सदस्यपदी मोनाली फंदे,सबिहा अर्शी शेख इरफान, नईमखान रहमतुल्ला खान, प्रीती राहुल देशमुख यांची निवड करण्यात आली.

महिला बालकल्याण सभापतीपदी भाजपाच्या जयश्री संजीव आगरकर यांची उपसभापतीपदी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कांचन वैभव भोजने यांची तर सदस्यपदी प्रीती ब्रह्मानंद देशमुख, राखी गौरव खेरडे, दिपाली बडोदेकर यांची निवड करण्यात आली.नियोजन विकास व पाणीपुरवठा विषय समितीच्या सभापती पदी पदसिद्ध सभापती म्हणून न.प.चे उपाध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे यांची निवड करण्यात आली असून सदस्यपदी प्रभा कैलास फंदे,भूषण कोकाटे, विद्या ढवळे, प्रीती राहुल देशमुख यांची निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी म्हणून विजय लोहकरे, प्रभारी मुख्याधिकारी शिवदास मुसळे, नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने,प्रशासकीय अधिकारी अमोल ढोले यांच्या देखरेखीखाली पार पडली.सर्व नवनिर्वाचित सभापतींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

### संयुक्त किसान मोर्चाचे

सांगण्यात आले होते परंतु तसेच झाले नाही. उलट सरकारने शेतकरी विरोधी कायदे राबविण्याकडे जोर दिला. बहुमताचा गैरवापर सुरू आहे. यामुळे शेती क्षेत्रात अत्यंत वाईट परिस्थिती आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, शेतकऱ्यांच्या कुटुंबाला पंचवीस लाख रुपयांचे पॅकेज व सरकारी नोकरी द्यावी, शेतकरी विरोधी वीज विधेयक त्वरित मागे घ्या, एफ टी ए रद्द करा, शेतकरी विरोधी वीज विधेयक त्वरित मागे घ्या, शेती क्षेत्रातील त्रास दूर करण्यासाठी स्वतंत्र किसान बजेट सादर करा, कापूस सोयाबीन आणि तुरीसाठी शासकीय खरेदीचे वचन पूर्ण करा, कापूस सोयाबीन आणि तुरीसाठी शासकीय खरेदीचे वचन पूर्ण करा आदि मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी अशोक सोनारकर, डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे, सतीश चौधरी विनोद जोशी जे.एम कोठारी ,चंद्रकांत बानूबाकोडे, प्रा साहेबराव विधळे, लक्ष्मणराव धाकडे, उमेश बनसोड, अशोक राऊत, स्वप्निल डाहाके ,राजा राहतगांडले, प्रज्ञा बनसोड, वैशाली निस्वादे, सुनिता चाहेंदे, देवेंद्र भोगे,केशवराव कुकटकर, सुधीर बारबुद्धे आदि उपस्थित होते.

# उत्तमराव इंगळे यांचे निधन



**काटपुर/प्रतिनिधीः-** काटपुर - ममदापूर येथील गांधी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष, विद्यमान संचालक उत्तमराव राजाराम इंगळे (वय ८१) यांचे सोमवारला रात्री एक वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. संपूर्ण इंगळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गांधी शिक्षण संस्था व परिसरात शोककळा पसरली आहे. उत्तमराव इंगळे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक,राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून संस्थेला प्रगतीपथावर नेण्यासाठी अविरत झटणारे व्यक्तिमत्व होते . त्यांच्या आकस्मिक निधनाने शैक्षणिक व सामाजिक व राजकिय क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाल्याचे मत श्रद्धांजलवर मान्यवरांनी व्यक्त केले . त्यांच्या पश्चात दोन मुले मुली, पत्नी, नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार असून संपूर्ण इंगळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. काटपुर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर हजारोच्या चाहत्यांनी श्रद्धांजली देत अंत्यसंस्कार करण्यात आला.

# दोन दुचाकीच्या धडकेत तीन मजूर जखमी

## -एक गंभीर,रायसोनी कॉलेजसमोरील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या रायसोनी कॉलेजच्या समोर दोन दुचाकीची समोरासमोर धडक होऊन अपघात झाला. यात तीन मजूर जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी रात्री समोर आली आहे. राजेंद्र जांबुंरकर (वय ३५), भोला बारस्कर (वय ५५) व बालाजी कांले (वय ४५, तिघे राहणार उपातखेडा) असे अपघातात जखमी झालेल्या मजुरांची नावे आहे. माहितीनुसार राजेंद्र, भोला व बालाजी सोमवारी सायंकाळी वीट भट्टी वरून काम संपल्यानंतर आठवडी बाजारात गेले होते, तेथून खरेदी झाल्यावर तिघे घरी परत येत होते. त्यावेळी त्यांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या एका दुचाकीने समोरासमोर धडक दिली. या धडकेत तिघे रस्त्यावर कोसळले. तिथून जाणाऱ्या नागरिकांनी याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून तिघांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान राजेंद्र जाबुंरकर यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचाराकरिता नागपूर रेफर करण्यात आले आहे. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे. पोलिसांनी या प्रकरणात अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.


## पाहिजेत

श्री छत्रसाल शिक्षण संस्था इतवारा अमरावती रजि. क्र. एफ २६७ अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था व्दारा संचालित १०० टक्के अनुदानित **श्री छत्रसाल प्राथमिक शाळा इतवारा बाजार, अमरावती** येथे शासन निर्णयानुसार रिक्त झालेल्या पदावर नियुक्ती करावयाची आहे.

| अनु क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | पद संख्या | संवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सेवक | H.S.C. D.ED TET PAPER-1 | ०१ | खुला | शासन निर्णयानुसार |

वरिल पदाकरिता पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक ३०/०१/२०२६ रोजी दु.१२.०० ते ३.०० या वेळात घेण्यात येईल. इच्छुक व पात्र उमेदवारांनी अर्ज व मुळ प्रमाणपत्रासह श्री छत्रसाल प्राथमिक शाळा इतवारा बाजार अमरावती येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

टिप -१. संस्था भाषिक अल्पसंख्याक असल्यामुळे शासनाच्या नियमांच्या अधिन राहुन पदे भरण्यात येईल.
२. वरिल पदाच्या नियुक्तीस मा.शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.अमरावती यांचे मान्यतेची अट राहील.
३. वयोमर्यादा शासन निर्णयानुसार शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे राहील.

**अध्यक्ष**
**श्री छत्रसाल शिक्षण संस्था**
**इतवारा बाजार, अमरावती**



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०७९/२०२५
**श्रीमती हिराबाई अधिक दोन विरुध्द निरंक**
पुढील ता.१७.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Hirabai Ramkrushna Wankhade,** Age 65 Yrs. Occu.: Household R/o. Near Chhangani Nagar, Amba Vihar, Ukali H.V. Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Atul Ramkrushna Wankhade,** Age 44 Yrs. Occu.: Business R/o. Near Maha Laxmi Temple, Ravi Nagar, Amba Vihar Ukali, H.V. Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. **Sunil Ramkrushna Wankhade,** Age 47 Yrs. Occu.: Business R/o. Near Chhangani Nagar, Amba Vihar Ukali, H.V. Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामकृष्ण वामनराव वानखडे** हे दिनांक **०९.०७.२०२२** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हिराबाई अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती हिराबाई अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती



**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION CO. LTD.**
**Amravati Zone Amravati**
**e-Tender Notice**

E-Tenders are invited for Empanelment of agencies for supply of various T&P in Amravati Zone for 2 years i.e. FY 2025-26 and 2026-27 as described in the Bidding data.

| Sr. No. | Description of Tenders | EMD Amount |
|---|---|---|
| 1 | CE/AMTZ/Tech/Supply of Pliers and Spanners (T and P)/2025-26/T-05 | Rs. 01.00 lakh for each Tender |
| 2 | CE/AMTZ/Tech/Supply of Screw Drivers and Testers (T and P)/2025-26/T-06 | |
| 3 | CE/AMTZ/Tech/Supply of Aluminum Ladders (T and P)/2025-26/T-07 | |
| 4 | CE/AMTZ/Tech/Supply of Electrical pole climbing clip 'Iron 5.5 to 6" Pole Width' along with safety belt (T and P)/2025-26/T-08 | |
| 5 | CE/AMTZ/Tech/Supply of Tool Bag and Allied (T and P)/2025-26/T-09 | |
| 6 | CE/AMTZ/Tech/Supply of Discharge Rods HT and LT (T and P)/2025-26/T-10 | |
| 7 | CE/AMTZ/Tech/Supply of Hammer and Hacksaw (T and P)/2025-26/T-11 | |
| 8 | CE/AMTZ/Tech/Supply of Charging Torch (T and P)/2025-26/T-12 | |
| 9 | CE/AMTZ/Tech/Supply of Fuse Wire (T and P)/2025-26/T-13 | |

**Date of Start of Bid Sale: 20.01.2026 Last Date & Time for submission of Bids: 04.02.2026 (up to 11:00 Hrs.) For further details of Tenders, please visit our website https://etender.mahadiscom.in/eatApp**

**Contact Person :** Executive Engineer (Adm), Amravati Zone **Mob No. 7875761688**
Address: Office of The Chief Engineer, Amravati Zone Administrative Building, "Vidyut Bhavan", 2nd Floor, Camp Road, Amravati – 444603 (Maharashtra) **Email: ceamtz@gmail.com**

**PRO No. 014** **Chief Engineer MSEDCL, Amravati Zone Amravati**

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २१ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## निकालाच्या दुसऱ्याच दिवशी कामाला सुरुवात
# प्रभाग १२ स्मार्ट केल्याशिवाय थांबणार नाही

### उबाठा सेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक सागर भारुका यांची भूमिका

■ प्रतिनिधी | अकोला ■

*प्रचार रॅलीपासूनच प्रभागातील नागरिकांशी थेट संवाद साधत समस्या जाणून घेतल्या आणि त्यातील तब्बल ९० टक्के प्रश्न निवडणुकीपूर्वीच सोडवले. आता निकाल लागल्यानंतरही विश्रांती न घेता दुसऱ्याच दिवशी प्रभागातील नागरिकांचे आभार मानत थेट कामाला सुरुवात केली आहे. येत्या काळात प्रभाग क्रमांक १२ (ड) हा समस्या मुक्त करून अकोल्यातील 'स्मार्ट प्रभाग' म्हणून ओळख निर्माण करण्याचा ठाम निर्धार उबाठा सेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक सागर भारुका यांनी 'जनमाध्यम'शी बोलताना व्यक्त केला.*



१६ जानेवारी रोजी मनपा निवडणुकीचा निकाल लागला. मतदारांच्या विश्वासावर आणि आशीर्वादावर आपण ही निवडणूक जिंकलो असून हा विश्वास कधीही तडा जाऊ देणार नाही, असे भारुका यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. प्रभागाचा काही प्रमाणात भौगोलिक विकास झाला असला तरी प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात विकासाचा अनुशेष प्रलंबित असल्याची वस्तुस्थिती त्यांनी मांडली. स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्ट्रीट लाईट, रस्ते आणि नाल्यांच्या समस्या आजही नागरिकांच्या रोजच्या जगण्यावर परिणाम करत आहेत, असे ते म्हणाले.

निकालानंतर लगेचच कामाला सुरुवात करत १७ जानेवारीपासून अनिकट, खोलेश्वर, रजपूतपुरा, देवराव बाबा चाळ, गजानन मंदिर परिसर, बागडे चौक, राधे नगर, पत्रकार कॉलनी, आळशी प्लॉट आणि आंबेडकर नगर या भागांमध्ये शनिवार-रविवार असूनही स्वखर्चाने सफाई कर्मचारी नेमून व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड नको, हीच भूमिका ठेवून हे काम करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, महापालिका अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याबाबत त्यांनी उघड नाराजी व्यक्त केली. जनतेची कामे वेळेत होत नसतील तर ते खपवून घेतले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देत सोमवारी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रभागातील मूलभूत सुविधांबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहकार्य करावे, अशा ठोस सूचना देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

प्रभागात अनेक ठिकाणी स्ट्रीट लाईट बंद आहेत, काही भागांत बोरिंग बंद असल्याने पाण्याची समस्या तीव्र आहे, तर चार ते पाच मोठ्या नाल्यांची स्वच्छता वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. सोमवारपासून या सर्व कामांना गती देण्यात आली असून अनेक ठिकाणी थेट मनपाचा जेसीबी लावून नाल्यांची साफसफाई सुरू असल्याची माहिती भारुका यांनी दिली. प्रशासकीय पातळीवरील अनेक कामे अद्याप प्रलंबित असून येत्या १५ दिवसांत मनपा अधिकारी वर्गाशी बैठक घेऊन त्यावर ठोस निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता प्रभागाच्या दीर्घकालीन विकासावर भर देण्यात येणार आहे. प्रभागातील मोकळ्या भूखंडांचा विकास करून ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्रे, ओपन जिम उभारण्यात येणार असून महाराणा प्रताप बाग, गांधी-जवाहर बाग, अशोक वाटिका तसेच विविध चौकांचे सुशोभीकरणही आगामी काळात केले जाणार आहे. पुढील पाच वर्षांत रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा आणि स्ट्रीट लाईटच्या समस्या पूर्णतः दूर करून प्रभाग १२ ला अकोल्यातील आदर्श आणि स्मार्ट प्रभाग म्हणून ओळख मिळवून देण्याचा निर्धार सागर भारुका यांनी पुन्हा एकदा ठामपणे व्यक्त केला.

**नागरिकांसाठी थेट हेल्पलाईन आणि तक्रार पेट्या**

प्रभागातील नागरिकांच्या समस्या थेट आणि वेगाने सोडवण्यासाठी लवकरच स्वतंत्र हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे. रस्ते, नाल्या, स्वच्छता, स्ट्रीट लाईट आणि पाणीपुरवठ्याबाबत नागरिक या हेल्पलाईनवर तक्रारी नोंदवू शकतील. यासोबतच प्रभागात ५० ठिकाणी तक्रार व सूचना पेट्या बसविण्यात येणार असून नागरिकांचा आवाज थेट लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचवण्याचा ठाम निर्णय घेण्यात आल्याचे सागर भारुका यांनी सांगितले.

## इंटेरियर डिझायनर नीतू जगताप
# प्रभागाचा चेहरामोहरा बदलणार!



### रस्ते-नाल्या-पाणी-स्ट्रीट लाईटवर थेट लक्ष; ? विकासात कुठलीही तडजोड नाही – नीतू जगताप

■ प्रतिनिधी | अकोला ■

*'निवडणूक जिंकणे हे ध्येय नव्हते, तर प्रभाग बदलणे हेच माझे उद्दिष्ट आहे. नागरिकांना मूलभूत सुविधांचा बॅकलॉग पूर्ण केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही,' अशा ठाम, आक्रमक शब्दांत भाजपाच्या नवनिर्वाचित नगरसेविका तथा इंटेरियर डिझायनर नीतू बबलू उर्फ महादेव जगताप यांनी 'जनमाध्यम'शी संवाद साधताना आपली विकासाची स्पष्ट दिशा मांडली.*

हद्दवाढीनंतर विकासाचा अनुशेष राहिलेल्या प्रभाग क्रमांक ३ (ब) मधील प्रश्नांना थेट हात घालण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला असून, रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, ड्रेनेज आणि स्ट्रीट लाईट या मूलभूत प्रश्नांवर आता कोणतीही तडजोड होणार नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. न्यू तापडिया नगर, खरप (पांढरी, पाचपिंपळ), पंचशील नगर या हद्दवाढीतील भागांमध्ये बऱ्याच प्रमाणात विकास झाला असला, तरी अजूनही अनेक कामे अपूर्ण आहेत. 'हा प्रभाग भौगोलिकदृष्ट्या मोठा आहे, पण कामे अपुरी ठेवून चालणार नाही. जे प्रलंबित आहे, ते पूर्ण करणारच. विकास हा कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष जमिनीवर दिसला पाहिजे,' असे ठाम शब्दांत नीतू जगताप म्हणाल्या.

प्रभागात अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत तर काही ठिकाणी अपूर्ण रस्ते असल्याने पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. 'तात्पुरत्या डागडुजीला माझा विरोध आहे. दर्जेदार रस्ते, मजबूत नाल्या आणि दीर्घकालीन उपाययोजनाच केल्या जातील,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

धार्मिक व सामाजिक स्थळांचा विकासही आपल्या प्राधान्यक्रमात आहे. प्रभागातील बुद्धविहार, मंदिरे यांचा विकास आधी झाला असला तरी अजूनही काही कामे अपूर्ण आहेत. 'धार्मिक व सामाजिक स्थळे ही समाजाची ओळख असतात. त्यांचा सर्वांगीण विकास करणे ही माझी जबाबदारी आहे,' असे त्या म्हणाल्या. नव्या पिढीचे, स्पष्ट बोलणारे आणि विकासावर आक्रमक भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून नीतू जगताप यांनी सुरुवातीलाच आपली छाप पाडली आहे. दिलेले आश्वासन प्रत्यक्षात उतरल्यास प्रभाग क्रमांक ३ (ब) हा विकासाचा नवा बेंचमार्क ठरणार, एवढे मात्र निश्चित!

**सौंदर्यीकरणात दिसणार 'डिझायनर टच'**

इंटेरियर डिझायनर म्हणून मिळालेला अनुभव प्रभागाच्या सौंदर्यीकरणासाठी उपयोगात आणणार असल्याचे सांगत त्या म्हणाल्या 'प्रभागात अनेक मोकळे भूखंड आहेत. ते शोभेची नव्हे, तर उपयोगाची ठिकाणे बनवली जातील. ओपन जिम, वॉकिंग ट्रॅक, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारले जातील'

**रेल्वे लाईनपलीकडील परिसरावर विशेष लक्ष**

रेल्वे लाईनपलीकडील न्यू तापडिया नगर व खरप परिसर हा सध्या शहरातील सर्वात वेगाने वाढणारा भाग आहे. 'लोकसंख्या वाढतेय, घरे उभी राहत आहेत. त्यामुळे पाणी, रस्ते, ड्रेनेज आणि स्ट्रीट लाईट या सुविधा आधीच सक्षम करणे गरजेचे आहे. भविष्यातील अडचणी आजच रोखणार,' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

**वडिलांच्या जनसेवेचा वारसा पुढे नेणार**

नीतू जगताप यांचे वडील बबलू उर्फ महादेव जगताप हे मागील दोन टर्मपासून नगरसेवक आहेत. त्यांची जनतेशी नाळ, सातत्यपूर्ण काम आणि सामाजिक उपक्रमांचा वारसा नीतू जगताप यांनी पुढे नेण्याचा निर्धार केला आहे. लहानपणापासून जनतेसाठी झटणारे वडील पाहतच नीतू मोठ्या झाल्या आणि त्याच प्रेरणेतून त्यांनी राजकारणात सक्रिय एन्ट्री घेतली.

**महिला सक्षमीकरणासाठी ठोस पावले**

'महिला सक्षमीकरण ही केवळ घोषणा न राहता प्रत्यक्ष कृतीत दिसली पाहिजे,' असे सांगत नीतू जगताप यांनी शासनाच्या सर्व महिला योजनांचा लाभ प्रभागातील महिलांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा उत्साहात समारोप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मागील ३ दिवसापासुन जिल्हा परिषदेच्याअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप शनिवारी रात्री सायंकाळी ९.३० वाजता झाला. वाशिम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद गणविर, ? जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशिल पाटील, कारंजा गट विकास अधिकारी पुनम राणे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने आदिंची मंचावर उपस्थिती होती. या स्पर्धामध्ये विविध मैदानी व इनडोअर क्रीडा प्रकारांमध्ये सर्व पंचायत समिती आणि मुख्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण करण्यात आले.

**क्रीडा स्पर्धेतील विजेते स्पर्धक :** बुध्दीबळ स्पर्धेत मुख्यालयाचे आशिष हिरेखण यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. कारंजा पंचायत समितीचे विनोद ठोंबे हे उपविजेते ठरले. बुध्दीबळ महिला दिव्यांग मध्ये उज्वला देबाजे प्रथम तर मंगरुळपीर पंचायत समितीच्या कल्पना मुळे या उपविजेत्या ठरल्या.

लांब उडी स्पर्धेत पुरुष गटात प्रदीप सदर (रिसोड) व गणेश शिंदे (वाशिम), तर महिला गटात ?वैशाली दहीभात (मुख्यालय) व मंगल गोडसे (रिसोड) यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावले. उंच उडी स्पर्धेत पुरुष गटात गोविंद हरणे (मंगरूळपीर) व नविन तिडके (मुख्यालय), तर महिला गटात शिवानी भालेराव (रिसोड) व सुनिता सोळंके (मालेगाव) यांनी यश संपादन केले.

**स्विमिंग मध्ये रामानंद ढंगारे अव्वल :** स्विमिंग मध्ये १०० मिटर पुरुष गटात मुख्यालयाचे रामानंद ढंगारे यांनी प्रथम तर वाशिम पंचायत समितीचे संदिप घोलप यांनी द्वितीय पुरस्कार पटकावला. १०० मिटर महिला गटात वाशिम पंचायत समितीच्या मनिषा सिरसाठ यांनी प्रथम तर कारंजा पंचायत समितीच्या कल्पना राऊत यांनी द्वितीय पुरस्कार पटकावला.

कबड्डीचा उपांत्य व अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. यामध्ये स्पर्धेत पुरुष गटात रिसोड संघ विजेता तर मंगरुळपीर संघ उप विजेता ठरला. महिला गटात कारंजा संघ विजेता तर वाशिम उप विजेता ठरला. क्रिकेट स्पर्धेत पुरुष गटात मालेगाव संघाने प्रथम, तर मंगरूळपीर संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. महिला क्रिकेटमध्ये मंगरुळपीर विजेता तर वाशिम संघ उप विजेता ठरला.

**सांस्कृतिक स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद :** जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा विविध कला प्रकारांत उत्साहात पार पडल्या. अधिकारी-कर्मचाऱ्यांमधील सुप्त कलागुण, अभिव्यक्ती व सर्जनशीलता या स्पर्धांमधून प्रभावीपणे समोर आली.

समूह नृत्य स्पर्धेत अतुल गणविर व समूह (कारंजा) यांनी प्रथम क्रमांक मिळविला तर गोपाळ लोखंडे व समूह (मानोरा) यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. एकल नृत्य स्पर्धेत किरण मोरे (रिसोड) यांनी प्रथम तर किशोर कोबळे (वाशिम) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. हास्यजत्रा / नाट्यछटा प्रकारात संदीप केळे (मुख्यालय) यांनी प्रथम तर राजू मोरे (रिसोड) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. भक्तिगीत गायन स्पर्धेत गजानन पाचरणे (रिसोड) यांनी प्रथम, तर रमेश भोडणे (मंगरूळपीर) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. लोकगीत स्पर्धेत डिंगबर घोडके (वाशिम) यांनी प्रथम, तर संजय भगत (मंगरूळपीर) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. सादरीकरणाच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सामाजिक विषय, लोकसंस्कृती, भक्तीभाव व विनोद यांचे प्रभावी दर्शन घडविले.

# वाशिम नगरपरिषदेत सत्तावाटपावर एकमत; सर्व सभापती बिनविरोध

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एकमेकाविरुद्ध दंड थोपटून निवडणूक लढलेले भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे दोन्ही विरोधक सत्ता स्थापनेसाठी मात्र एकत्र आल्याचे चित्र सभागृहात दिसून आले. उपाध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर सभापतीपदाच्या निवडीकडे संपूर्ण शहर वशियांचे लक्ष लागले होते.

निवडणूकित विरोधक असलेले सत्तेसाठी मात्र व्यवस्थित पदांची वाटणी करून घेतली. नगरपरिषदेत सर्व सभापतींची निवड बिनविरोध पार पडली. विशेष म्हणजे सर्व सभापतीपदे भाजप व उद्धवसेनेकडे गेली असून, महत्त्वाची तीन सभापतीपदे भाजपच्या वाट्याला आली आहेत. स्थायी समिती व विविध विषय समित्यांची निवड करण्यासाठी दि.मंगळवार, २० जानेवारी रोजी नगरपरिषदेत विशेष सभा घेण्यात आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अनिल केंदळे होते. सभेला उपाध्यक्ष राजू भांदुर्गे, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांच्यासह ३५ नगरसेवकांची उपस्थिती होती. सकाळी १२ ते दुपारी २ या वेळेत सभापतीपदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली. त्यानंतर छाननी पूर्ण झाल्यावर दुपारी ३ वाजता मुख्य सभा घेण्यात आली.



कोणत्याही सभापतीपदासाठी प्रतिस्पर्धी अर्ज दाखल न झाल्याने सर्व सभापतींची निवडणूक बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव व मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांनी केली. नगरपरिषद बांधकाम समितीच्या सभापतीपदी भाजपचे राहुल तुपसांडे, शिक्षण समितीच्या सभापतीपदी भाजपचे कुणाल हेडा, तर नियोजन समितीच्या सभापतीपदी अरुणा वाटाणे यांची वर्णी लागली. ही तीनही महत्त्वाची सभापतीपदे भाजपकडे गेली आहेत. तर शिवसेना उबाठा कडे आरोग्य समितीच्या सभापतीपदी उपाध्यक्ष राजू भांदुर्गे , पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी वर्षा हजारे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी गोकुळबाई इंगोले, यांच्याकडे उपसभापतीपदी पूजा काळे यांची नियुक्ती करण्यात आली. स्थायी समितीच्या सदस्यपदी भाजपचे अनिल ताजने, जयश्री वानखेडे तसेच उद्धवसेनेचे मिर्झा साबीर बेग यांची निवड करण्यात आली. सभापती व समिती सदस्यांच्या निवडीनंतर नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापती व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

**सत्तेचे समान वाटप :** वाशिम नगरपरिषदेत सत्तेचे भाजप आणि शिवसेना (उबाठा) यांच्यात जवळपास समान वाटप झाल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे. थेट जनतेतून भाजपचे नगराध्यक्ष अनिल केंदळे निवडून आले असले, तरी नगरपरिषदेत स्पष्ट बहुमत नसल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला सत्तेत महत्त्वाचा वाटा मिळाला आहे. नगराध्यक्षपद भाजपकडे असताना उपाध्यक्षपद उद्धवसेनेकडे आहे. याशिवाय प्रमुख विषय समित्यांतील सभापतीपदांचे वाटपही समसमान झाले असून, तीन सभापतीपदे भाजपकडे तर तीन सभापतीपदे उद्धवसेनेकडे आहेत. त्यामुळे नगरपरिषदेत सत्तास्थापनेसाठी परस्परविरोधी असलेल्या दोन प्रमुख पक्षांमध्ये समन्वय साधत एकप्रकारे सत्तेचे समान वाटप झाल्याचे दिसून येते. ही सत्तावाटपाची रचना आगामी काळात नगरपरिषदेला स्थैर्य देईल की राजकीय तणाव वाढवेल, हे येणारा काळच ठरवेल; मात्र सध्या तरी वाशिमच्या राजकारणात समतोलाची भूमिका अधोरेखित झाल्याचे चित्र आहे.

**(सभापतीपदांचे सत्तावाटप)**

भारतीय जनता पक्षा कडील सभापती पद
राहुल तुपसांडे – बांधकाम समिती
कुणाल हेडा – शिक्षण समिती
अरुणा वाटाणे – नियोजन समिती
शिवसेना (उबाठा) सभापती
उपाध्यक्ष राजू भांदुर्गे – आरोग्य समिती
गोकुळाबाई इंगोले – सभापती, महिला व बालकल्याण समिती तर उपसभापती - पूजा काळे वर्षा हजारे – पाणीपुरवठा समिती स्थायी समिती सदस्यः भाजप - अनिल ताजणे, जयश्री वानखेडे, उबाठा - मिर्झा साबीर बेग – स्थायी समिती सदस्य

**नगरसेवकांचा सत्कार, संविधान उद्देशिकेचे वाचन :** नवनिर्वाचित नगरसेवकांचा शाल, पुष्पगुच्छ तसेच संविधान उद्देशिकेचा समावेश असलेला स्मृतिचिन्ह (मोमेंटो) देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे स्वीकृत नगरसेवक गणेश खंडाळकर यांनी संविधान उद्देशिकेच्या वाचनाचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर सभागृहात सर्व उपस्थितांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. नगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज सुरू असताना संविधान उद्दिशिकेचे वाचन करण्यात आले असावे.

## वंचित बहुजन आघाडीची वाशिम येथे महत्त्वाची आढावा बैठक संपन्न

**वाशिम :** दि. १८ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह, वाशिम येथे वंचित बहुजन आघाडीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा महासचिव रंगनाथ धांडे होते. तर वाशिम जिल्हा निरीक्षक नतिकोद्दीन खतीब आणि फुले-आंबेडकर विद्वत सभेचे मुख्य समन्वयक भास्कर भोजने यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीस प्रदेश सदस्या किरणताई गिऱ्हे, वाशिम–मंगरुळपीर विधानसभा अध्यक्ष तुषार गायकवाड, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ज्योतिताई इंगळे, जिल्हा महासचिव सोनाजी इंगळे, जिल्हा प्रवक्ता संदीप सावळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा प्रवक्ता संदीप सावळे यांनी केले.

प्रारंभी वाशिम तालुका अध्यक्ष दिलीप भगत, मालेगाव तालुका अध्यक्ष सरनाथ अवचार, मंगरूळनाथ तालुका अध्यक्ष नरेंद्र राऊत, रिसोड तालुका अध्यक्ष महेश तिडके, कारंजा तालुका अध्यक्ष भारत भगत यांनी नुकत्याच झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचा सविस्तर आढावा सादर केला.यानंतर सूर्यकांत गायकवाड, संतोष सरकटे, ज्योतिताई इंगळे, सोनाजी इंगळे, तुषार गायकवाड, किरणताई गिऱ्हे, भास्कर भोजने, रंगनाथ धांडे व नतिकोद्दीन खतीब यांनी आपले मार्गदर्शन केले. यावेळी भास्कर भोजने यांनी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भूमिका, कर्तव्ये तसेच येणाऱ्या जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी आवश्यक असलेल्या अजेंड्यावर सखोल मार्गदर्शन केले.

नतिकोद्दीन खतीब यांनी आगामी निवडणुकांसाठी पक्षाची रणनीती स्पष्ट करत, जिल्हा, तालुका, सर्कल व ग्रामशाखा पातळीवरील पदाधिकारी निवड प्रक्रिया लवकरच पूर्ण होणार असल्याचे सांगितले. तसेच येणाऱ्या निवडणुकांना वंचित बहुजन आघाडी ताकदीने व स्वतंत्रपणे सामोरे जाणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.


## कार्यालय नगर परिषद खामगांव जिल्हा बुलडाणा
## निविदा सुचना

बांधकाम नअ/३३२/२०२५ दिनांक १५/०९/२०२५

नगरपरिषद खामगांव अंतर्गत खालील नमुद कामासाठी शासनाच्या सार्व. बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडून निविदा ब - १ प्रपत्रात ऑनलाईन प्रणालीव्दारे मागविण्यात येत आहे.

**(महाराष्ट्र जिल्हा वार्षिक योजना नगरोत्थान २०२५-२६)**

| | |
|---|---|
| 1) 2026_DMA_1270099_1 | 2) 2026_DMA_1270099_2 |
| 3) 2026_DMA_1270099_3 | 4) 2026_DMA_1270099_4 |
| 5) 2026_DMA_1270099_5 | 6) 2026_DMA_1270099_6 |
| 7) 2026_DMA_1270099_7 | 8) 2026_DMA_1270099_8 |
| 9) 2026_DMA_1270099_9 | 10) 2026_DMA_1270099_10 |
| 11) 2026_DMA_1270099_11 | 12) 2026_DMA_1270099_12 |
| 13) 2026_DMA_1270099_13 | 14) 2026_DMA_1270099_14 |
| 15) 2026_DMA_1270099_15 | 16) 2026_DMA_1270099_16 |
| 17) 2026_DMA_1270099_17 | 18) 2026_DMA_1270099_18 |
| 19) 2026_DMA_1270099_19 | 20) 2026_DMA_1270099_20 |

शर्ती व अटी इतर तपशील http: www/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इतर शर्ती व अटी नगरपरिषदेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, खामगांव**


# उमरा सर्कलमध्ये दिवसा वीज देण्याची मागणी; शेतकरी आक्रमक

■ प्रतिनिधी | अकोट ■

*अकोट तालुक्यातील उमरा सर्कलमध्ये शेतातील वीजपुरवठा दिवसा करण्यात यावा, तसेच गावातील सततची वीज खंडितता तात्काळ थांबवावी, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी व नागरिक आक्रमक झाले आहेत. या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) अकोट येथील कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले.*

### महावितरणविरोधात निवेदन, आंदोलनाचा इशारा



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या शेतातील वीज रात्रीच्या वेळेत दिली जात असून परिसरात वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर आहे. त्यामुळे रात्री शेतात पाणी देण्यासाठी जाताना शेतकऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे. यापूर्वीही वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या घटना घडल्याने शेतातील वीज दिवसा देणे अत्यावश्यक असल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले.

उमरा गावात वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेमुळे नागरिक, व्यापारी व विद्यार्थ्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत संबंधित अभियंत्यांकडे विचारणा केली असता, शेतकरी व नागरिकांशी अर्वाच्य व धमकीच्या भाषेत वागणूक दिली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. 'वरिष्ठांकडे तक्रार केली तरी काही फरक पडत नाही,' अशी विधाने केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

निवेदनात संबंधित अभियंत्याची तात्काळ बदली करण्याची मागणी करण्यात आली असून, उमरा सर्कलमधील महावितरणचा कारभार वादग्रस्त ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच भविष्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण व संबंधित अधिकाऱ्यांची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास महावितरणविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शेतकरी व नागरिकांनी दिला. सदर निवेदनाची प्रत आमदार प्रकाश भारसाकळे यांनाही देण्यात आली आहे.

यावेळी सुभाष सुरतने, ऋषिकेश लोणकर, किशोर बोंद्रे, निशांत मंगळे, मुरलीधर पाडोळे, भागवत मंगळे, विजय भारसाकडे, नितीन सुरतने, ज्ञानेश्वर राऊत, संजय महाले, संजू भाऊ शेंद्रे, अंबादास सुरतने, मोहन लबडे, विनायक सुरतने, सिद्धार्थ लबडे, आशिष महाले, सोपान सोनोने, प्रथमेश आगलावे, प्रदीप पालवे यांच्यासह शेतकरी व सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# चंद्रपुरात महापौर काँग्रेसचाच होणार

**चंद्रपूर/ प्रतिनिधी-**चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसची सत्ता येणार असून त्यासाठीचे आवश्यक संख्याबळ जमवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. काँग्रेसचे नगरसेवक भाजपच्या संपर्कात हे भाजप नेत्यांचे विधान म्हणजे हवेतील पतंगबाजी असल्याचा टोला विजय वडेट्टीवार यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला आहे.चंद्रपुरात जनतेने काँग्रेसला कौल दिला असल्याने तिथे जनतेला अपेक्षित असा काँग्रेसचाच महापौर होणार असे वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेस पक्षाचा नेता म्हणून चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता स्थापन करणे आणि तिथला महापौर बसवणे ही आमची प्राथमिकता आहे, त्यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. चंद्रपुरात कुणालाही तोडफोड करणे, नगरसेवक पळवणे यासाठी स्कोप नाही. त्यामुळे कोणी काहीही विधाने केली तरी काँग्रेसचाच महापौर होणार असे सांगत

# भाजप नेत्यांची वक्तव्ये म्हणजे हवेतली पतंगबाजी-वडेट्टीवार



वडेट्टीवार यांनी भाजपच्या दाव्यातील हवा काढली. भाजपचे नगरसेवक काँग्रेसच्याही संपर्कात असल्याचे संकेत वडेट्टीवार यांनी यावेळी दिले.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. राज्यात महाविकास आघाडी आल्याने या नगरसेवकांना चंद्रपुरात सोबत घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी सांगितले. महापौर पदावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दावा केला, हा त्यांचा अधिकार आहे, सर्वच गोष्टींबाबत शिवसेना पक्षातील पक्षश्रेष्ठींशी चर्चा सुरू असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. चंद्रपुरात काँग्रेस निष्ठावंत आणि अनुभवी नगरसेवक यांना महापौर बनवावे अशी भूमिका आहे. नागपुरात पत्रकारांशी संवाद साधत असताना काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूर महापालिकेबाबत भूमिका मांडली.

मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय मार्ग १९ आणि २० जानेवारी रोजी मुंबईकडे जाणा-या अवजड वाहनांसाठी बंद ठेवण्यात आला असून याची अधिसूचना पालघर जिल्हाधिकारी यांनी गुजराती भाषेत काढली. ही सुरुवात आहे. पालघरपासून गुजरातीचा शिरकाव करण्यात येत आहे. भाजपचा मुंबईत महापौर होणार, म्हणजे कुणाच्या इशा-यावर मुंबई चालणार हे स्पष्ट आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली.स्वित्झर्लंड येथील दावोस येथे राज्य सरकार लाखो कोटींचे सामंजस्य करार करत आहे. पण यात देशातील कंपन्या परदेशात जाउन करार करत आहेत, याचा काय उपयोग आहे? परदेशातील कंपन्यांची महाराष्ट्रात गुंतवणूक येणार का, असा सवाल वडेट्टीवार यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

# 'त्यांचे नगरसेवक आमच्या संपर्कात', सुधीर मुनगंटीवारांचे विधान, चंद्रपुरात 'ऑपरेशन लोट्स' सुरु

**चंद्रपूर/ प्रतिनिधी-** चंद्रपूरच्या जनतेने दिलेल्या जनादेशामुळे सत्तेचा पेच फसला आहे. काँग्रेसला बहुमतासाठी चार जागांची गरज आहे, तर भाजपाही बहुमतापासून बरीच लांब आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांकडून सत्तेसाठी लागणा-या बहुमताची जुळवा जुळव सुरू आहे. भाजपाने आता काँग्रेसचेच नगरसेवक फोडण्यासाठी ऑपरेशन लोटस सुरू केले आहे. काँग्रेसचे काही नगरसेवक भाजपा नगरसेवकांच्या संपर्कात असल्याचे सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. तर विजय वडेट्टीवार यांनी मात्र, हे दावे फेटाळत बहुमताची जुळवणी झाल्याचे सांगितले. दुसरीकडे भाजपाचे आमदार किशोर जोरगेवार यांनी मात्र खासदार प्रतिभा धानोरकर आणि विजय वडेट्टीवार असे काँग्रेसमध्ये दोन गट पडले असून, आम्ही सत्तेसाठी प्रयत्न करत असल्याचे सांगत खळबळ उडवून दिली. उद्धवसेनेकडून चंद्रपूरमध्ये मोठी मागणी करण्यात आली आहे. आमचा महापौर करेल त्यांच्यासोबत आम्ही जाउ, असा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. त्यामुळे चंद्रपुरात राजकीय घडामोडींना नाट्यमय वळण मिळाले आहे.

**काँग्रेस नगरसेवकांकडून आम्हाला प्रतिसाद** -मुनगंटीवार

भाजपाचे नेते मुनगंटीवार म्हणाले, 'काँग्रेसच्या काही नगरसेवकांशी आमचे नगरसेवक बोलत आहेत. विकासासाठी तुम्ही आमच्या बाजूने यावे. आणि काँग्रेस काही नगरसेवक तसा प्रतिसादही देत आहेत. त्यांना याची जाणीव आहे आणि म्हणून भाजपाच्या काही नगरसेवकांना काँग्रेसच्या काही नगरसेवकांशी संपर्क करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.'



**विजय वडेट्टीवारांनी दावा फेटाळला: म्हणाले, या अफवा** -काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मात्र काँग्रेसचे नगरसेवक भाजपाच्या संपर्कात असल्याचा दावा फेटाळून लावला. ते म्हणाले, 'सुधीर मुनगंटीवारांनी विधान केले की, काँग्रेसचा एक गट... या सगळ्या अफवा आहेत. ती मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणारी गोष्ट आहे. नगरसेवक पूर्णपणे सुरक्षित आहेत. सर्व आमच्याकडेच आहेत. सत्ता स्थापन करण्यासाठी लागणारी जी काही संख्या लागते त्याची व्यवस्था झालेली आहे', असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

**'काँग्रेसमध्ये धानोरकर आणि वडेट्टीवार गट पडलेत'** -'काँग्रेसचे २७ नगरसेवक निवडून आले आहेत. त्या २७ मध्ये विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्यात स्पर्धा लागलेली आहे. आपापल्या गटात नेण्याचे काम त्यांचे सुरू आहे. सत्ता स्थापनेसाठी मार्गदर्शक नेते सुधीर मुनगंटीवार हे प्रयत्न करत आहेत', असे आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले. 'आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. काँग्रेसचा इतिहास असा राहिला आहे की, त्यांच्यात फूट पडते. त्यांना सत्ता सांभाळता येत नाही. जनतेच्या मुलभूत सोयी त्यांना देता येत नाही. केवळ सत्तेचे राजकारण करण्यासाठी त्यांचे दोन गट स्थापन झाले आहेत', असे भाजपाचे आमदार किशोर जोरगेवार हे विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा खासदार धानोरकर यांच्याबद्दल बोलताना म्हणाले.

# वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्यात नेता निवडीवरून वाद

**चंद्रपूर** : चंद्रपूर महापालिकेतील गटनेता निवडीवरून काँग्रेसमधील अंतर्गत वाद उफाळून आला असून ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील संघर्ष चांगलाच टोकाला पोहोचल्याचे दिसत आहे. गटनेता निवडीच्या प्रक्रियेतून हा वाद उफाळून आला असून यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचा गटनेता कोण असावा, यावरून दोन्ही नेत्यांमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार प्रतिभा धानोरकर यांनी गंभीर आरोप करत, काँग्रेसमधील काही नगरसेवकांना विजय वडेट्टीवार यांनी पळवल्याचा दावा केला आहे. या आरोपांमुळे पक्षातील अंतर्गत राजकारण चव्हाट्यावर आला असून, कार्यकर्त्यांमध्येही संभ्रमाची स्थिती आहे. दरम्यान, चंद्रपूरमधील हा वाढता संघर्ष शमवण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ उद्या नागपुरात दाखल होणार आहेत. सपकाळ हे दोन्ही नेत्यांची स्वतंत्र तसेच संयुक्त बैठक घेउन समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. या बैठकीत चंद्रपूर महापालिकेतील गटनेता निवड, नगरसेवकांचे आरोप-प्रत्यारोप आणि आगामी निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक एकता यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

# बाळासाहेबांच्या जयंतीनिमित्त ठाकरे बंधू 23 जानेवारीला येणार एकत्र

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे तब्बल अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा एकाच व्यासपीठावर येणार आहेत. २३ जानेवारी रोजी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात आयोजित विशेष कार्यक्रमात दोन्ही ठाकरे बंधूंची उपस्थिती पाहायला मिळणार आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा कार्यक्रम ठाकरेंची शिवसेना आणि मनसे संयुक्तपणे आयोजित करत असल्याची माहिती खासदार संजय राउत यांनी दिली आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर हा पहिलाच प्रसंग असेल की उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र सार्वजनिक कार्यक्रमात दिसणार आहेत. यंदाची मुंबई महापालिका निवडणूक अनेक अर्थांनी वेगळी ठरली. तब्बल २० वर्षांनंतर ठाकरे बंधूंनी एकत्र येत निवडणूक लढवली आणि त्यांना एकूण ७१ जागांवर यश मिळाले. मात्र, गेल्या २५ वर्षांपासून मुंबईवर एकहाती सत्ता गाजवणा-या ठाकरेंना यंदा भाजप महायुतीकडून मोठा धक्का बसला. ८९ जागा मिळवत भाजप मुंबईतील सर्वात मोठा पक्ष ठरला असून, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला २९ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे मुंबईचा पुढील महापौर महायुतीचाच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.मराठी अस्मितेच्या आणि मुंबईच्या मुद्द्यांवरून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे पुन्हा



जवळ आले होते. जुलै २०२५ मध्ये हिंदी सक्तीच्या निर्णयाच्या विरोधात पहिल्यांदाच दोघे एकाच व्यासपीठावर दिसले. त्यानंतर रक्षाबंधन, दिवाळी यांसारख्या सणांमध्येही ठाकरे कुटुंबीय एकत्र दिसले. महापालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शिवाजी पार्कवर झालेली संयुक्त सभा आणि शाखांना दिलेल्या भेटींमुळे मराठीबहुल भागांमध्ये ठाकरे बंधूंचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून आला.दादर, वरळी, लालबाग, परळ, विक्रोळी, भांडूप अशा भागांतील मराठी मतदार मोठ्या प्रमाणावर ठाकरे बंधूंच्या पाठीशी उभे राहिले. २०१७ च्या निवडणुकीत शिवसेनेचे ८४ नगरसेवक निवडून आले होते, मात्र त्यापैकी अनेकांनी पक्ष सोडल्याने उद्धव ठाकरे गटाकडे केवळ ३६ माजी नगरसेवक उरले होते. या पार्श्वभूमीवर ही निवडणूक त्यांच्यासाठी कठीण मानली जात होती. तरीही, ज्या भागांतून नगरसेवकांनी साथ सोडली होती, तिथे नवी फळी उभारत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने ६५ जागा जिंकल्या. त्यात मनसेच्या सहा जागांची भर पडल्याने एकूण आकडा ७१ वर पोहोचला.२०१७ मधील ८४ जागांच्या तुलनेत हा निकाल फारसा कमी नसल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. जर ठाकरे बंधूंनी आणखी लवकर युतीची घोषणा केली असती आणि मुंबईत अधिक संयुक्त सभा घेतल्या असत्या, तर हा आकडा आणखी वाढू शकला असता, असा अंदाजही व्यक्त केला जात आहे. अशा परिस्थितीत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त होणारा हा संयुक्त कार्यक्रम आहे.

# महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पावर हाउस- मुख्यमंत्री

**दावोस/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्र गेटवे-ऑफ-इंडिया असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

राज्य शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डा. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्ष-या केल्या आहेत. हरित उर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणा? असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.वर्ल्ड इकानामिक फोरमच्या वार्षिक बैठकांकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डा. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधी मंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पुर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डा. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पावर हाउस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी महाराष्ट्र सदैव सज्ज आहे. येथे होणा-या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वार रूमच्या माध्यमातून



लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल. उद्योजक गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषत? मुंबईतील घनकचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकानामीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिस-या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या रोगजार निमितीवर भर इदला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणालेदरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआ, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लाजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक उर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणूकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, चर्चेच्या फे-या सुरू करण्यात आल्या आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (MAITRI) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणा-या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज!

■ १० लाख भाविकांची मांदियाळी ■ विभागीय आयुक्तजितेंद्र पापळकर

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचा ३५० वा 'शहीदी समागम' हा भव्य कार्यक्रम येत्या २४ आणि २५ तारखेला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.



**सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या** -कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदा-या वाटून देण्यात आल्या आहेत. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड 'लंगर' (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी 'नोडल एजन्सी' म्हणून काम पाहत आहे. हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा,सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत. आजच्या धावपळीच्या जगात 'त्याग आणि सेवा' हीच खरी माणुसकी आहे. हा विचार जपण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील जनतेसह देशभरातील जनतेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्तजितेंद्र पापळकर यांनी केले आहे. ज्यांना या महायज्ञात सेवा (स्वयंसेवक म्हणून) द्यायची आहे, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

# गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहादत सोहळ्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त हिंद दी चादर हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारी रोजी नांदेड येथे आयोजित केला आहे. या सोहळ्याचे निमंत्रण केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांना राज्यस्तरीय समागम समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान दिले.

नवी दिल्ली येथे राज्यस्तरीय समागम समितीच्या (महाराष्ट्र राज्य) पदाधिका-यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सदिच्छा भेट घेउन निमंत्रण दिले. केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी २५ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण स्वीकारले. यावेळी पोहरादेवीचे महंत बाबुसिंग महाराज (सहअध्यक्ष), समन्वय समितीचे अध्यक्ष रामसिंग महाराज, नांदेड येथील गुरुद्वारा प्रशासक डा. विजय सतबीर सिंग, समन्वयक श्री. रामेश्वार नाईक, सहसमन्वयक जसपाल सिंग, सदस्य चरणदीप सिंग (हॅप्पीसिंग),



सतिश निहलानी आणि सहनिमंत्रक तेजासिंग बावरी आदी उपस्थित होते.

नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे २५ जानेवारीला दुपारी २ ते ५ या वेळेत उपस्थित राहणार आहेत. तसेच, पं. धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर धाम सरकार) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील निमंत्रण स्वीकारले असून ते २४ जानेवारीला या सोहळ्याला उपस्थित राहतील, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

# आयएनएस सुदर्शिनी 'लोकायन 26' या आंतरमहासागरीय नौकानयन मोहिमेवर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय नौदलाचे प्रशिक्षण जहाज आयएनएस सुदर्शिनी 'लोकायन २६' या १० महिन्यांच्या आंतरमहासागरीय मोहिमेसाठी प्रस्थान करणार आहे. भारताचा समृद्ध सागरी वारसा आणि 'वसुधैव कुटुंबकम'ची संकल्पना महासागरांमध्ये प्रतिबिंबित करत हे जहाज १३ देशांमधील १८ परदेशी बंदरांना भेट देत २२,००० सागरी मैलांपेक्षा जास्त प्रवास करेल.या मोहिमेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आयएनएस सुदर्शिनीचा फ्रान्समधील 'एस्केल आ सेट' आणि अमेरिकेतील न्यूय ?र्कमधील 'सेल २५०' या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय भव्य जहाज कार्यक्रमांमधील सहभाग असेल. या दोन्ही कार्यक्रमांमध्ये आयएनएस सुदर्शिनी भारताचा गौरवशाली सागरी वारसा आणि सागरी परंपरा यांचे प्रतिनिधित्व करेल.या सागरी प्रवासादरम्यान भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दलाचे २०० हून अधिक प्रशिक्षणार्थी सखोल नौकानयन प्रशिक्षण घेतील आणि लांब पल्ल्याचे सागरी नौकानयन तसेच समुद्रातील पारंपरिक खलाशी कौशल्याचा मौल्यवान अनुभव मिळवतील.

# भाजप अध्यक्ष झाल्याबद्दल पंतप्रधानांकडून नितीन नवीन यांचे अभिनंदन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नितीन नवीन यांची भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) १२व्या राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. मंगळवारी पक्षाच्या मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत याची औपचारिक घोषणा करण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी नितीन नवीन यांना पुष्पहार घालून त्यांचे अभिनंदन व स्वागत केले. काही वेळातच नितीन नवीन राष्ट्रीय अध्यक्षपदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारणार आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी नितीन नवीन यांचे अभिनंदन करताना सांगितले की, जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. भाजपा संघटन पर्व हे देशातील कार्यकर्ताकेंद्रित विचारसरणीचे प्रतीक आहे, असेही त्यांनी नमूद केले.पंतप्रधान मोदी म्हणाले, आपले नेतृत्व परंपरेतून घडते, अनुभवातून समृद्ध होते आणि जनसेवा व राष्ट्रसेवेच्या भावनेतून संघटनेला पुढे नेते. आम्ही शून्यापासून शिखरापर्यंतचा प्रवास पाहिला आहे. यावेळी त्यांनी भाजपाचे सर्व माजी राष्ट्रीय अध्यक्ष यांचे अभिनंदन केले. पुढे पंतप्रधानांनी सांगितले की, आज भाजपाचा जितका भर संघटनेच्या विस्तारावर आहे, तितकाच भर कार्यकर्त्यांच्या घडणीवरही आहे. मी मुख्यमंत्री आणि पंतप्रधानही होतो, मात्र मी आधीपासून आणि आजही भाजपाचा कार्यकर्ता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मी कार्यकर्ता आहे आणि नितीन नवीन माझे बास आहेत, असे विधान करत त्यांनी कार्यकर्त्यांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, नितीन नवीन यांना केवळ भाजपामधीलच नव्हे, तर एनडीएतील सर्व घटक पक्षांशी समन्वय साधावा लागणार आहे. नितीन यांनी स्वतला सक्षम नेतृत्व म्हणून सिद्ध केले आहे. पुढील २५ वर्षे अत्यंत महत्त्वाची असून, या काळात विकसित भारताचे स्वप्न साकार होणार असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. नितीन नवीन हे मिलेनियल पिढीचे प्रतिनिधी असल्याचेही



त्यांनी नमूद केले.पंतप्रधान म्हणाले, देश आता २१व्या शतकातील एका निर्णायक टप्प्यात प्रवेश करत आहे. पहिली २५ वर्षे वेगाने गेली असून, पुढील २५ वर्षे अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. याच काळात विकसित भारताचे लक्ष्य गाठायचे आहे. या नव्या पर्वाच्या सुरुवातीस नितीन नवीन भाजपाची समृद्ध परंपरा पुढे घेउन जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधानांनी सांगितले की, नितीन नवीन आजच्या युवा पिढीचे प्रतिनिधित्व करतात. लहानपणी रेडिओच्या माध्यमातून माहिती घेणा-या आणि आज कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)सारख्या आधुनिक तंत्रज्ञानासोबत काम करणा-या पिढीतून ते आले आहेत. त्यामुळे पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याला शिकण्याची आणि पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल.पंतप्रधान मोदी यांनी यावर्षी जनसंघाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याची आठवण करून दिली आणि ज्यांनी पिढ्यान्पिढ्या त्याग, तपस्या व बलिदान देउन संघटना मजबूत केली, अशा सर्व कुटुंबांचा सन्मान केला.यापूर्वी नितीन नवीन यांनी दिल्लीतील झंडेवाला मंदिर, भगवान वाल्मीकि मंदिर, प्राचीन हनुमान मंदिर आणि गुरुद्वारा बंगला साहिब येथे जाउन दर्शन घेतले होते. वयाच्या ४५व्या वर्षी नितीन नवीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष ठरले आहेत. याआधी अमित शहा ४९व्या वर्षी पक्षाचे अध्यक्ष झाले होते. उल्लेखनीय म्हणजे, सोमवारी भाजपाच्या मुख्यालयात अध्यक्षपदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली होती. अन्य कोणत्याही उमेदवाराने नामांकन न भरल्यामुळे नितीन नवीन यांची बिनविरोध निवड झाली.

बांगलादेशात हिंसाचार सुरूच

# जमावाच्या मारहाणीत आरएबी अधिका-याचा मृत्यू

**ढाका/वृत्तसंस्था :** बांगलादेशातील कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान देणा-या जमावाच्या हिंसाचाराच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. अशीच एक धक्कादायक घटना चितगाव जिल्ह्यातील सलीमपूर भागातून समोर आली आहे, जिथे रॅपिड अ?क्शन बटालियनच्या टीमवर एका जमावाने हल्ला केला. या हल्ल्यात एका फअइ अधिका-याची निर्घृण हत्या करण्यात आली असून अन्य तीन अधिकारी गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिक मीडिया आणि सुरक्षा सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरएबीची टीम एका विशेष मोहिमेसाठी सलीमपूर परिसरात गेली होती. त्याचवेळी तिथे आधीच दबा धरून बसलेल्या गुन्हेगारांच्या टोळीने टीमला घेरले. पाहता पाहता परिस्थिती हाताबाहेर गेली आणि जमावाने अधिका-यांवर हल्ला करण्यास सुरुवात केली असे सांगण्यात येत आहे की, हल्लेखोरांनी काही अधिका-यांना ओलीस देखील ठेवले होते. यादरम्यान एका अधिका-याला जमावाने इतकी अमानुष मारहाण केली की त्यांचा जागीच मृत्यू झाला. इतर अधिका-यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या घटनेनंतर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या घटनेमुळे बांगलादेशातील वाढती हिंसा आणि ढासळत्या कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांच्या प्रेस विंगने जारी केलेल्या निवेदनानुसार, जानेवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान अल्पसंख्याक समुदायाशी संबंधित एकूण ६४५ गुन्हे दाखल झाले, ज्यापैकी ७१ गुन्हे जातीय स्वरूपाचे मानले गेले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ५६ ■ मंगळवार, २० जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# हरिनामाच्या गजरात न्हाऊन निघाली घोराड नगरी

## संत केजाजी महाराजांच्या पुण्यतिथीला वैष्णवांची मांदियाळी

### डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या रिंगण सोहळ्याने भाविक मंत्रमुग्ध

**सेलू ।** अभय बेदमोहता :विदर्भाची प्रतीपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र घोराड येथे श्रीसंत केजाजी महाराजांच्या ११९ व्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी भक्ती, श्रद्धा आणि परंपरेचा संगम अनुभवायला मिळाला. या पावन निमित्ताने आयोजित भव्यदिव्य पालखी व दिंडी सोहळ्यासाठी विविध गावांतील ३२० हून अधिक दिंड्या, भजनी मंडळे व हजारो भाविकांनी हजेरी लावली. त्यामुळे अवघी घोराड नगरी हरिनामाच्या गजरात दुमदुमून गेली.



पहाटेपासूनच संत नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. टाळ-मृदंगांच्या गजरात, संत केजाजी महाराज की जय च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. जणू काही भक्तीचा मळाच फुलल्याचे दृश्य सर्वत्र दिसून येत होते.

सकाळी अकरा वाजता विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला. मुख्य प्रवेशद्वारावर रथाचे पूजन ज्ञानेश्वर महाराज भांडकर आणि अभ्युदय मेघे यांच्या हस्ते करण्यात आले. आकर्षक सजविलेले रथ, सहभागी अश्व, बँडपथक तसेच विविध भजनी मंडळांच्या सहभागामुळे दिंडी सोहळ्याला विशेष शोभा प्राप्त झाली.

हरिनामाचा जयघोष करीत पालखीने मुख्य मंदिराची प्रदक्षिणा पूर्ण केली. त्यानंतर संत नामदेव महाराजांच्या समाधी स्थळी भव्य अश्व रिंगण सोहळा पार पडला. हातात भगवे पताका घेऊन धावणारे वारकरी, डोक्यावर तुळशी वृंदावन घेत गाथा-पारायण करीत धावणारे भाविक, विणेकरी, पखवाज वादक आणि टाळ-मृदंगांच्या तालावर नृत्य करणारे वारकरी उपस्थितांचे डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले.

या अविस्मरणीय क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी मैदानावर भाविकांसह महिलांची मोठी गर्दी उसळली होती. पालखी मार्गावर गावातील महिलांनी सुंदर रांगोळ्यांनी रस्त्यांची सजावट केली होती. ठिकठिकाणी उभारलेल्या स्वागत कमानी आणि ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेले पुष्पवृष्टी व आरतीमुळे सोहळ्याला भक्तीची विशेष झळाळी लाभली.

सहभागी भाविकांच्या सोयीसाठी ग्रामस्थांच्या वतीने चहा-पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. दिंडी व पालखी ग्रामपंचायत मार्गे मुख्य मंदिराजवळ पोहोचताच या भव्य पालखी-दिंडी सोहळ्याची सांगता झाली.

या सोहळ्यामुळे संपूर्ण घोराड नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली असून, श्रीसंत केजाजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवाची सांगता अत्यंत भक्तिभावात, आनंदात आणि उत्साहात झाली.

# बँकेतून २३.११ लाखांची रोकड लंपास : चोरटे अमरावतीचेच

## पोलिसांचा मोठा गौप्यस्फोट; मध्यप्रदेशातून एक ताब्यात, एक रुग्णालयात; ८ पथकांची कडवी नाकेबंदी

**वर्धा जनमाध्यम :** सुकळी (बाई) येथील बँक ऑफ इंडिया शाखेत घडलेल्या खळबळजनक बँक फोडीप्रकरणी पोलिसांनी निर्णायक पाऊल टाकले आहे. हायड्रॉलिक कटरने खिडकीचे गज तोडून आणि तीन स्तरांची तिजोरी गॅस कटरने फोडत चोरट्यांनी २३.११ लाखांची रोकड लंपास केली होती. सुरुवातीला राज्याबाहेरील टोळीचा संशय असताना, तपासाअंती ही धोकादायक टोळी अमरावतीचीच असल्याचा धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे.







मंगळवारी, १३ जानेवारी रोजी सकाळी चोरी उघडकीस येताच जिल्ह्यात एकच खळबळ माजली. पोलिस अधीक्षकांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत तपासाची सूत्रे हाती घेतली. सीसीटीव्ही चित्रण, तांत्रिक माहिती आणि वाहन हालचालींच्या आधारे तपासाची दिशा ठरवण्यात आली.

बँक फोडीसाठी चारचाकी वाहनाचा वापर करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून, काम फत्ते झाल्यानंतर चोरटे त्याच वाहनाने पसार झाल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

या गुन्ह्यातील आरोपींच्या शोधासाठी पोलिसांच्या तब्बल आठ पथकांना विविध ठिकाणी रवाना करण्यात आले आहे. या कारवाईदरम्यान एक आरोपी मध्यप्रदेश येथून चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आला आहे. तर अमरावती येथून ताब्यात घेतलेल्या आणखी एका आरोपीची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

या संदर्भात माहिती देताना पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी दोघांना ताब्यात घेतल्यास दुजोरा देत, अधिक तपास सुरू असल्याचे स्पष्ट केले. उर्वरित आरोपींचा शोध, चोरीतील रोकड जप्ती आणि गुन्ह्यात वापरलेली वाहने व साधने हस्तगत करण्यासाठी तपास युद्धपातळीवर सुरू आहे. बँक फोडीप्रकरणी पोलिसांची ही धडक कारवाई गुन्हेगारांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

# औद्योगिक परिसरात धाडसी चोरीची मालिका : तळेगाव हादरले

## निरंकार कॉटेक्स व जगदंबा जिनिंगमध्ये घुसखोरी; १६ लाखांचा ऐवज लंपास

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील तळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या निरंकार कॉटेक्स व जगदंबा जिनिंग या दोन औद्योगिक आस्थापनांमध्ये अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत तब्बल १६ लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या चोरीमुळे संपूर्ण औद्योगिक परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी सुनियोजित पद्धतीने फॅक्टरीच्या आवारात प्रवेश करत सुरक्षा व्यवस्थेला चकवा दिला. त्यांनी रोख रक्कम तसेच मौल्यवान साहित्यावर हात साफ करून काही वेळातच पलायन केले. चोरीनंतर सकाळी कर्मचारी कामावर आल्यानंतर प्रकार उघडकीस आला. तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली.विशेष बाब म्हणजे, चोरीची संपूर्ण घटना फॅक्टरीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपासाला वेग दिला असून चोरट्यांच्या हालचाली, वापरलेली साधने आणि पलायनाचा मार्ग तपासला जात आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक पथक व डॉग स्क्वॉड दाखल होऊन शास्त्रीय पद्धतीने पुरावे गोळा करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर ढोले व तळेगावचे ठाणेदार मंगेश भोयर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तळेगाव पोलीस ठाण्याचे पथक कसून तपास करत आहे. पोलिसांनी परिसरातील इतर सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, अपुऱ्या पोलीस मनुष्यबळामुळे औद्योगिक भागात नियमित गस्त होत नसल्याचा आरोप नागरिक व उद्योजकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, अवघ्या महिनाभरापूर्वी शेजारील जिनिंगमध्ये १२ लाख रुपयांची चोरी झाली होती; मात्र त्या प्रकरणाचा अद्याप कोणताही ठोस सुगावा लागलेला नाही. त्यामुळे सलग होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.तसेच सीसीटीव्ही व प्रकाशव्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी लवकरात लवकर चोरट्यांचा छडा लावून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मुख्याधिकाऱ्यांना शिवीगाळ, धमकीखोरी खपवून घेतली जाणार नाही

## काळी फित बांधून पालिका कर्मचाऱ्यांचा एल्गार

### नगरसेविकेच्या पतीवर कठोर कारवाईची आक्रमक मागणी

**वर्धा जनमाध्यम :**दारूच्या नशेत नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांच्या कक्षात घुसून अश्लील शिवीगाळ, धमकीखोरी व कार्यालयात गोंधळ घालण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही, असा रोखठोक इशारा देत वर्धा नगर परिषद कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि. १९) काळी फित बांधून आक्रमक आंदोलन छेडले. महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनातून दोषीवर तात्काळ आणि कठोर कारवाईची ठाम मागणी करण्यात आली.

शुक्रवारी (दि. १६) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सुदामपुरी प्रभाग क्रमांक ४ येथील भाजप नगरसेविकेचे पती प्रकाश चामटकर हे मुख्याधिकाऱ्यांच्या कक्षात गेले. माझे काम लगेच झाले नाही तर गंभीर परिणाम भोगावे लागतील,अशी धमकी देत त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. यानंतर नगर परिषद कार्यालयात गोंधळ घालून कर्मचाऱ्यांमध्ये दहशत निर्माण करण्यात आली, असा गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी केला.



या प्रकारामुळे संपूर्ण नगर परिषद प्रशासन हादरले असून, शासकीय कार्यालयात राजकीय दबाव, दादागिरी आणि धमकीखोरीला थारा दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका कर्मचाऱ्यांनी मांडली. या प्रकरणी मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी कोणताही राजकीय दबाव न स्वीकारता कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आज मुख्याधिकाऱ्यांवर हात उगारला, उद्या सामान्य कर्मचाऱ्यांची सुरक्षितता कोण देणार? असा प्रश्न उपस्थित करत दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला. या आंदोलनात नगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शासकीय कामकाजात हस्तक्षेप करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या प्रवृत्तीविरोधात आता रस्त्यावर उतरून लढा दिला जाईल, असा निर्धार व्यक्त करत कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे न्यायाची मागणी केली.

# एसआयटीचा धाक; वर्धा शिक्षण विभागात ईओ रजेवर?

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील शालेय शिक्षण विभागाला हादरे देणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास सध्या एसआयटीकडून जोरात सुरू आहे. या प्रकरणात वर्धा शहराशेजारील नालवाडी येथील रवींद्र काटोलकर यांना डिसेंबर २०२५ मध्ये अटक करण्यात आली. या धास्तीने विभागात एक गंभीर कुजबूज पसरली आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. जयश्री घारफळकर (राऊत) रजेवर गेल्या आणि अद्याप कार्यभारावर रुजू झाल्या नाहीत.

शालार्थ आयडी घोटाळ्यात मुख्य आरोपी उल्लास नरड यांनी नागपूर येथील डॉ. मनिषा भडंग यांना वर्धा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला होता. मात्र, वर्धा शिक्षण विभागाने डॉ. घारफळकर यांची पुर्ननियुक्ती केली.

एसआयटीच्या तपास यंत्रणेच्या आदेशानुसार वर्धा जिल्ह्यातील शिक्षकांच्या काही प्रकरणांची माहिती संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले आहे. विभागाला फाईल शोधून ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून, या तपास यंत्रणेची नजर वर्धा शिक्षकांवर सतत आहे.

**रजेमागील कुजबूज: ईओ रजेवर?**

डॉ. घारफळकर यांनी डिसेंबरमध्ये वैद्यकीय कारण नोंदवून १५ ते १९ डिसेंबर २०२५ साठी रजा घेतली. नंतर १८ डिसेंबरला पुन्हा अर्ज करून 'प्रकृती ठिक होईस्तोवर रजा मंजूर करावी' अशी विनंती जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली. अद्यापही डॉ. घारफळकर कर्तव्यावर रुजू झालेल्या नाहीत, तर विभागात एसआयटीच्या धास्तीमुळे ईओ रजेवर? अशी चर्चा रंगली आहे.

**वेतन काढण्यासाठी दबाव?**

रजेवर असलेल्या डॉ. घारफळकर यांनी वैद्यकीय कारण स्पष्ट न करता रजा घेतली. मात्र बातम्यांनुसार, रजा कालावधीत शिक्षण विभागातील सहकाऱ्यांवर दबाव टाकून वेतन काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. सध्या या पदाचा अतिरिक्त कार्यभार उपशिक्षणाधिकारी माध्यमिक व प्रभारी शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडे आहे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या २२ डिसेंबर २०२५ च्या आदेशान्वये.

**पूर्वीची कार्यनियुक्ती आणि तपासाची दहशत**

डॉ. घारफळकर यांनी पूर्वी यवतमाळ येथे शिक्षणाधिकारी म्हणून काम केले आहे. या प्रकरणात रवींद्र काटोलकर यवतमाळ येथे आरोपी असल्यामुळे, १६ जानेवारीला तपास यंत्रणेनं माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात झाडाझडती केली. विशेष म्हणजे, त्या दिवशी उपसंचालक नीलिमा टाके या यवतमाळ येथे कार्यक्रमासाठी होत्या.या प्रकरणाचा तपास आता वर्धा शहरासह जिल्ह्यातील शिक्षकांपर्यंत पोहचत आहे. एसआयटीची दहशत व रजेत असल्यामुळे विभागात गडबड आणि गुपचूप कुजबूज सुरू आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

जिल्हा परिषदेचे सिओ पराग सोमन यांना प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### ऑपरेशन 'मुस्कान'चा एल्गार

# बेपत्ता १९ अल्पवयीनांचा शोध घेण्यासाठी पोलिस सज्ज; १३ मुलींचा समावेश

## ११ प्रकरणे २०२५ मधील : एसपी सौरभकुमार अग्रवाल यांची माहिती

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातून बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुला-मुलींच्या शोधासाठी पोलिस विभागाने आक्रमक पावले उचलली असून २० जानेवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत १४ वी ऑपरेशन मुस्कान मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेतून अद्याप न सापडलेल्या १९ अल्पवयीन मुला-मुलींचा शोध घेतला जाणार असून, त्यातील ११ प्रकरणे सन २०२५ मधील असल्याची माहिती पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.



एसपी अग्रवाल यांनी सांगितले की, बेपत्ता किंवा अपहरणाच्या कलमाखाली दाखल असलेली एकूण १९ प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत. यामध्ये १३ मुली व ६ मुलांचा समावेश असून, ही बाब अत्यंत गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर ऑपरेशन मुस्कान अंतर्गत प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे आढावा घेतला जाणार आहे. बेपत्ता अल्पवयीनांनी नातेवाईकांशी संपर्क साधला आहे का, याची सखोल चौकशी केली जाणार आहे.

ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना तसेच चाईल्ड लाईन यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. सापडणाऱ्या मुला-मुलींना सुरक्षितपणे त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करून कुटुंबियांना दिलासा देणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यासाठी प्रत्येक उपविभागात स्वतंत्र पोलिस पथक तैनात करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी उपस्थित होते.

**'कार्तिक' प्रकरणावर विशेष लक्ष**

ऑपरेशन मुस्कानदरम्यान आर्वी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या मांडला परिसरातील ३ वर्षीय कार्तिक बेपत्ता प्रकरणाचा छडा लावण्यावर भर देण्यात येणार आहे. १२ मार्च २०२५ रोजी कार्तिक घरून बेपत्ता झाला होता. १४ मार्च रोजी जंगल परिसरात आढळलेले रक्त मानवाचे असल्याचा अहवाल मिळूनही अद्याप प्रकरण उघडकीस आलेले नाही. मांडला सोडून गेलेल्या कुटुंबियांचा शोध घेऊन या गूढ प्रकरणाचा छडा लावण्याचा पोलिसांचा निर्धार आहे.

**सराईत गुन्हेगारांवर पोलिसांचा दणका**

दरम्यान, जिल्ह्यात १६ ते १८ जानेवारी या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत पोलिसांनी सराईत गुन्हेगारांवर कडक कारवाई केली. ९८२ सराईतांच्या घरांची झडती, ६१२ सराईत गुन्हेगार घरी आढळले, जुगार कायदा : १ कारवाई, दारूबंदी कायदा : १९ कारवाया, हत्यार कायदा : २ कारवाया, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि बेपत्ता बालकांच्या शोधासाठी पोलिस विभागाची ही आक्रमक भूमिका स्वागतार्ह ठरत आहे.

# अवैध दारूविक्रीविरोधात सिंदी रेल्वे पोलिसांची मोहीम तेजीत

## एक लाख दहा हजारांचा मुद्देमाल जप्त; सेलू येथील युवक अटकेत

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** अवैध दारूविक्री व वाहतुकीविरोधात सिंदी रेल्वे पोलिसांनी धडक कारवाई सुरू ठेवत रविवारी मोठे यश मिळवले. खात्रीशीर मुखबिराकडून मिळालेल्या माहितीनुसार सेलडोह रोड परिसरात सापळा रचून पोलिसांनी मोपेडवरून देशी व विदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या सेलू येथील रहिवासी आकाश खंदारे यास रंगेहाथ पकडले.



आरोपीच्या मोपेडच्या डिक्कीतून देशी व विदेशी दारूचा मोठा साठा आढळून आला. या कारवाईत मोपेडसह एकूण एक लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक नरेंद्र निस्वादे, ठाणेदार पोस्टे सिंदी रेल्वे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस उपनिरीक्षक ओम कालेगुरवार यांच्यासह पोलीस हवालदार प्रफुल्ल डफ, नितीन नखाते, मंगेश मुडे, सचिन उईके व अमोल कोडापे (सर्व नेमणूक पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे) यांचा समावेश होता.

अवैध दारूविक्रीमुळे सामाजिक शांततेला धोका निर्माण होत असल्याने अशा गैरप्रकारांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा सिंदी रेल्वे पोलिसांनी दिला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**ई-निविदा सुचना क्र.०२/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी हे खालील कामांकरिता नोंदणीकृत कंत्राटदार व अनोंदणीकृत कंत्राटदार कडून "ब-१" निविदा प्रपत्रामध्ये ई-निविदा आमंत्रित करीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (रु.लक्ष) | बयाना रक्कम (रु.लक्ष) | ई-निविदा प्रपत्राची किंमत | कंत्राटदाराची वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | वर्धा जिल्हयातील आवी तालुक्यातील आर्वी शिरपुर रस्ता ग्रा.मा. २१ किमी/ ०/० ते ९/३०० मध्ये रुंदीकरणासह सुधारणा करणे. | ९००.०० | ४.५० | ३५४०.०० | लागू नाही |
| २ | वर्धा जिल्हयातील आवी तालुक्यातील आर्वी हरदोली दहेगांव बेढोना चिंचोली पाचोड हिवरा बेल्लारा ते राम- ३२३ रस्ता ग्रा.मा.११ किमी ८/५०० ते १२/ ५०० सुधारणा करणे. | ५००.०० | २.५० | २३६०.०० | लागू नाही |
| ३ | वर्धा जिल्हयातील आष्टी तालुक्यातील आबाद वडाला साहुर मागिकवाडा रस्ता प्रजिमा-५ कि.मी. ८/१०० मध्ये लहान पुलांचे बांधकाम करणे. | १००.०० | १.०० | ११८०.०० | वर्ग -४ व त्यावरील |

टिप :- सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदा डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रकियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे व निविदा सुचना www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. ऑनलाईन वेळापत्रक अंतिम राहील.
२. निविदाकारानी निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यत शक्यतो निविदा भरण्यास विलंब करु नये. संकेतस्थळाबाबत शेवटच्या दिवशी काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास निविदेस मुदतवाढ देता येणार नाही.
३. ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखुन ठेवण्यात आले आहे.
४. निविदा सुचना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी सुचना फलकावर उपलब्ध आहे.
५. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.

(जा.क्र.१९०६/निविदा/२०२४)

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## गुंतवणुकीचा मार्ग

**गेल्या वर्षी मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहिले होते तेव्हा आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली होती, की ही गुंतवणूक देशी कंपन्यांचीच आहे. केवळ ११ कंपन्या परदेशी आहेत. पण या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना बाजूला ठेवले तरीही एक बाब लक्षात येते ती ही, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचंड गुंतवणूक आणली आहे आणि त्याचा उपयोग भारतातील बेरोजगारी दूर हटवण्यासाठी करण्यात येईल. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे एमओयू करण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ७२ टक्के अमलात आले आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंदा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही जागतिक आर्थिक मंचाचे आकर्षण असणार आहेत. कारण त्यांच्यासमवेत शिष्टमंडळ हे सर्वात मोठे असेल असे सांगण्यात येते. पण ट्रम्प यांनी अनेक देशांना टॅरिफ लावून जेरीस आणले आहे आणि त्यामुळे त्यांच्या वाटाघाटीत काय होते हे महत्त्वाचे आहे. पण विषय आपला महाराष्ट्राचा चालला आहे, तर फडणवीस सांगतात की यंदा गतवर्षीपेक्षाही जास्त गुंतवणूक आणणार आहे ते विशेष महत्त्वाचे आहे. मुळात दावोस गुंतवणूक ही जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करते. जिथे देश आणि राज्ये, जसे की महाराष्ट्र किंवा मध्य प्रदेश राज्यातून जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रचंड प्रयत्न होतात. त्यामुळे रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि शाश्वत विकासाला चालना मिळते. भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हे एक प्रमुख गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात, की भारत हे गुतवणूकदारांचे अत्यंत आकर्षक आणि विश्वासाचे ठिकाण म्हणून सध्या उदयाला आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा आहे.कॅनडा आणि मेक्सिकोपाठोपाठ अमेरिकेने भारतावरही टॅरिफ लावण्याचा आणि तोही भरमसाट टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. कारण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथून जी गुंतवणूक आणतील त्यातून येथे रोजगार निर्माण होतील आणि त्याचा परिणाम येथील तरुणांना रोजगारांचा लाभ देण्यात होईल. त्याचबरोबर महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि त्याचे पडसाद राज्याच्या औद्योगिक वाटचालीत दिसून येतात. मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा हे त्याचेच फल आहे. मुख्यमंत्र्यांच्या या दावोस दौऱ्याने स्टील म्हणजे पोलाद, केमिकल्स आणि सिमेंट बॅटरी या उद्योगात मोठी गुंतवणूक होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच काळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला आणि त्याचे एकमेव कारण होते ते औद्योगिक गुंतवणूक. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड गुंतवणूक येण्याची गरज आहे आणि ती मुख्यमंत्री फडणवीसच आणू शकतात, असा विश्वास सर्वांनाच आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील काही औद्योगिक राज्यांच्या सरकारांनी उदा. महाराष्ट्र, आसाम यांनी उच्चाधिकार शिष्टमंडळे दावोसला पाठवली आहेत. त्यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्रीही आहेत आणि हाच पॅटर्न यंदाही अमलात आणला आहे. ज्या क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे, ती क्षेत्रे आहेत स्वच्छ ऊर्जा, सागरी अन्नाची निर्यात आणि तत्सम क्षेत्रे. स्विस कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात मुख्यमंत्री यशस्वी होतील यात काही शंका नाही.महाराष्ट्राची स्पर्धा ही आसाम आणि मध्य प्रदेश या अन्य राज्यांशी असली तरीही त्यात विखार नाही. केवळ आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक आणणे आणि आपल्या लोकांना चांगल्यातील चांगले जीवन बहाल करणे हेच उद्दिष्ट आहे. कारण शेवटी राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट तर आपल्या जनतेचे कल्याण करणे हेच असते. यंदा दावोस येथील भारताचे प्रतिनिधित्व भारतातील महाराष्ट्राचे फडणवीस तसेच आणि तेलंगणाचे रेवंथ रेड्डीशिवाय आसामचे विस्वकर्मा आणि झारखंडचे हेमंत सोरेन करतील. प्रत्येक राज्य त्याच्या गरजेच्या दृष्टीने औद्योगिक गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न करणार आहे. पण सर्वात महत्त्व आहे ते केवळ महाराष्ट्रालाच. कारण हे राज्य प्रगत आहे आणि गेल्या वर्षी त्याने विक्रमी गुंतवणूक आणली आहे. आणखी एक विशेष, की ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. अशावेळी ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत सहभागी होत आहेत, हे निश्चित आहे, की ट्रम्प यांनी टॅरिफचा वापर शस्त्र म्हणून अनेक देशांविरुद्ध केला आहे आणि त्यात भारतही आला. केवळ देशांतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी हे प्रचंड टॅरिफचे शस्त्र उगारले. यात त्यांचा राजकीय उद्देष्यही आहे. जास्तीत जास्त रोजगार अमेरिकन लोकांनाच मिळावा हा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. वाढती जागतिक गुंतागुंत आणि भू-राजकीय तुकडे करणाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक स्पर्धात्मकता यांच्या परिप्रेक्ष्यात जागतिक आर्थिक मंच जागतिक नेत्यांना भारतातील राजकीय नेत्यांना इमपार्शल म्हणजे तटस्थ मंच उपलब्ध करून देईल अशी आशा वाटते. मुख्यमंत्री फडणवीस यांची आणखी एक परीक्षा आहे आणि त्यात ते कितपत यशस्वी होतात हे काळच दाखवेल. पण त्यांचे कर्तृत्व पाहता ते यातही यशस्वी होतील यात काही शंका नाही. ट्रम्प यांच्या एकांगीवादाला फडणवीस यांचे यश हेच उत्तर आहे. जागतिक आर्थिक मंचाची बैठक ही जग कोणत्या दिशेने जात आहे याविषयी अधिक आहे. सामान्य गुंतवणुकीसाठी जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीतील निर्णय हे परिणामकारक नसतात पण ते खरे असतात आणि त्यातून जे धोरणात्मक संदेश दिले जातात त्यांच्यासाठी ते वास्तविक असतात.**

# आकडे अर्थसंकल्पाचे आणि राजकोषीय तुटीचे

**एव्हाना देशाला अर्थसंकल्पाचे वेध लागले आहेत. त्याबाबतची तयारी शासकीय पातळीवर जोरात सुरू आहे. दरम्यान, किरकोळ इंधन बाजारात भारत जगात तिसरा असल्याची बातमी आणि तशी आकडेवारी उपलब्ध झाली आहे. याच सुमारास केंद्र सरकारची राजकोषीय तूट दहा लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याची महत्वपूर्ण माहिती पुढे आली आहे.**



### अर्थसंकल्पाच्या चर्चा तीव्र

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ बाबत चर्चा आहे. संसदीय परंपरेनुसार २०१७ पासून दरवर्षी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करण्याची परवानगी आहे. या वर्षी १ फेब्रुवारी हा दिवस रविवारी येणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमन त्या दिवशी अर्थसंकल्प सादर करू शकतात, अशी अपेक्षा आहे. देशाचा अर्थसंकल्प प्रत्यक्षात कोण तयार करते आणि त्याची प्रक्रिया काय आहे याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. केंद्रीय अर्थसंकल्प तयार करण्यासाठी आर्थिक व्यवहार विभाग पूर्णपणे जबाबदार आहे. हा विभाग अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत काम करतो. हा विभाग मध्यवर्ती भूमिका बजावत असला, तरी ही प्रक्रिया अत्यंत सहयोगी आहे. नीती आयोग आणि विविध प्रशासकीय मंत्रालयांसारख्या संस्था डेटा, अंदाज आणि धोरणात्मक माहिती प्रदान करतात. अर्थसंकल्प तयार करण्याची औपचारिक प्रक्रिया सप्टेंबर किंवा ऑक्टोबरच्या आसपास सुरू होते. अर्थ मंत्रालय सर्व केंद्रीय मंत्रालये, विभाग आणि अगदी राज्य सरकारांना एक परिपत्रक जारी करते. त्यामध्ये त्यांना आगामी आर्थिक वर्षासाठी खर्चाचे अंदाज आणि आर्थिक आवश्यकता सादर करण्यास सांगितले जाते. हे अंदाज बजेट फ्रेमवर्कचा पाया तयार करतात.

### अर्थसंकल्पाची तयारी

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, अर्थ मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी त्यांचा काळजीपूर्वक आढावा घेतात. त्यानंतर अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सल्लामसलत होते. बँकिंग, उद्योग, कृषी, कामगार संघटना आणि अर्थतज्ज्ञांच्या प्रतिनिधींना या बैठकीला आमंत्रित केले जाते. सल्लामसलत केल्यानंतर, अर्थ मंत्रालय प्रत्येक विभागासाठी महसूल अंदाज, खर्च मर्यादा आणि वाटप अंतिम करते. हे निर्णय राजकोषीय शिस्त, आर्थिक प्राधान्ये आणि विकास उद्दिष्टे यांच्याद्वारे निश्चित केले जातात. अंतिम टप्प्यात पंतप्रधानांशी चर्चा केली जाते. अर्थसंकल्पीय कागदपत्रे छापण्यापूर्वी, नॉर्थ ब्लॉकमध्ये पारंपरिक हलवा समारंभआयोजित केला जातो. ही अर्थसंकल्पीय तयारीच्या शेवटच्या आणि सर्वात गुप्त टप्प्याची सुरुवात असते. त्यानंतर अर्थसंकल्प तयार करण्यात आणि छपाई करण्यात गुंतलेल्या अधिकाऱ्यांचा बाह्य जगाशी संपर्क तुटतो. त्यानंतर, संविधानाच्या कलम ११२ अंतर्गत, अर्थमंत्री लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतात. संसदेच्या मान्यतेशिवाय सरकार भारताच्या एकत्रित निधीतून पैसे काढू शकत नाही. यामुळे हे सादरीकरण घटनात्मकदृष्ट्या महत्त्वाचे बनते. संसदेची मान्यता मिळाल्यानंतर, नवीन आर्थिक वर्षासाठी सरकारी खर्च कायदेशीररित्या सुरू होतो.

### देशात पेट्रोल पंपाची संख्या दुप्पट

आता एक दखलपात्र बातमी. देशात २०१५ पासून पेट्रोल पंपांची संख्या दुप्पट झाली आहे. एव्हाना ती एक लाखाहून अधिक झाली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्रेत्यांनी बाजारपेठेतील हिस्सा राखण्यासाठी आणि ग्रामीण तसेच महामार्ग भागात इंधनाची उपलब्धता वाढवण्यासाठी त्यांचे पेट्रोल पंप वेगाने वाढवले आहेत. त्यामुळे भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा इंधन किरकोळ बाजार बनला आहे. पेट्रोलियम मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या पेट्रोलियम नियोजन आणि विश्लेषण कक्षाच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर अखेर देशात एक लाख २६६ पेट्रोल पंप होते. अमेरिका आणि चीननंतर ही तिसरी सर्वात मोठी संख्या आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडे ९० टक्क्यांपेक्षा जास्त पंप आहेत. देशात मोठ्या प्रमाणात इंधनाचा वापर होत आहे. त्यामुळे पेट्रोल पंपांची संख्या वाढत आहे. रशियाची रोझनेफ्ट समर्थित नायरा एनर्जी लिमिटेड हा सर्वात मोठा खासगी इंधन किरकोळ विक्रेता आहे. या कंपनीचे ६,९२१ पेट्रोल पंप आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बीपी यांच्या संयुक्त उपक्रमाचे २,११४ पेट्रोल पंप आहेत. शेलचे ३४६ पेट्रोल पंप आहेत. पीपीएसी डेटानुसार २०१५ मध्ये पेट्रोल पंप नेटवर्क ५०,४५१ स्टेशनवरून जवळजवळ दुप्पट झाले आहे. त्या वर्षी, खासगी कंपन्यांच्या मालकीचे २,९६७ पेट्रोल पंप एकूण बाजारपेठेच्या अंदाजे ५.९ टक्के होते. सध्या ते एकूण बाजारपेठेच्या ९.३ टक्के आहेत.

### भारत हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचा नेटवर्क

भारत हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे पेट्रोल पंप नेटवर्क आहे. अमेरिकेत सर्वात मोठे नेटवर्क आहे. अमेरिकेत पेट्रोल पंपांच्या संख्येबद्दल कोणतेही अधिकृत आकडे उपलब्ध नाहीत; परंतु २०२४ च्या अहवालानुसार देशातील किरकोळ पेट्रोल पंपांची संख्या एक लाख ९६ हजार ६४३ होती, तेव्हापासून काही पंप बंद झाले आहेत. गेल्या वर्षी चीनसाठीच्या एका अहवालात पेट्रोल पंपांची संख्या एक लाख १५ हजार २२८ असल्याचे म्हटले आहे. 'सिनोपेक'च्या वेबसाइटवरील माहितीनुसार तीस हजारांहून अधिक कार्यरत पेट्रोल पंपांसह ते चीनमधील सर्वात मोठे इंधन किरकोळ विक्रेते आहे. 'चायना पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन' (सिनोपेक) आकाराने मोठे असले, तरी भारतीय बाजारपेठेतील आघाडीच्या 'आयओसी'च्या ४१ हजार ६६४ पेट्रोल पंपांच्या तुलनेत त्यांच्या पेट्रोल पंपांची संख्या कमी आहे. बीपीसीएल चे नेटवर्क २४ हजार ६०५ स्टेशन्ससह दुसऱ्या क्रमांकावर आहे. 'एचपीसीएल' २४ हजार ४१८ पेट्रोल पंपांसह त्यानंतर आहे.




नोव्हेंबर अखेरीस केंद्र सरकारची राजकोषीय तूट नऊ लाख ७६ हजार कोटींवर पोहोचली आहे. ती २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक अर्थसंकल्पीय उद्दिष्टाच्या ६२.३ टक्के आहे. गेल्या वर्षी याच कालावधीमध्ये ती ५२.५ टक्के होती. सरकारने चालू आर्थिक वर्षासाठी राजकोषीय तूट एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ४.४ टक्के किंवा १५ लाख ६९ हजार कोटी असण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (सीएजी) च्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर २०२५ पर्यंत केंद्र सरकारचे एकूण उत्पन्न १९ लाख ४९ हजार कोटी रुपये होते. ते एकूण अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५५.७टक्के आहे. यापैकी १३ लाख ९४ हजार कोटी कर महसुलातून, पाच लाख १६ हजार कोटी करबाह्य महसुलातून आणि ३८ हजार ९२७ कोटी रुपये कर्ज नसलेल्या भांडवली पावत्यांमधून आले. याच कालावधीत, केंद्र सरकारने राज्यांना करांचा वाटा म्हणून नऊ लाख ३६ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले. ते गेल्या वर्षीच्या तुलनेत एक लाख २४ हजार कोटी रुपयांनी वाढले आहे.

### महसूल खर्चाचा मोठा वाटा

नोव्हेंबरपर्यंत केंद्र सरकारचा एकूण खर्च २९ लाख २६ हजार कोटी रुपये होता. तो वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५७.८ टक्के आहे. त्यात २२ लाख ६७ हजार कोटी रुपये महसूल खर्च आणि सहा लाख ५८ हजार कोटी रुपये भांडवली खर्च समाविष्ट आहे. व्याज देयकांमध्ये महसूल खर्चाचा सर्वात मोठा वाटा होता. तो सात लाख ४५ हजार कोटी रुपये होता, तर अनुदानांचा वाटा दोन लाख ८८ हजार कोटी होता. 'आयसीआरए'च्या मुख्य अर्थशास्त्रज्ञ अदिती नायर म्हणाल्या, की चालू आर्थिक वर्षात केंद्र सरकारचा एकूण कर महसूल बजेट अंदाजापेक्षा अंदाजे दीड लाख कोटी रुपयांनी कमी पडण्याची शक्यता आहे; परंतु ही तूट सुधारित कर नसलेले महसूल कामगिरी आणि महसुली खर्चातील बचतीद्वारे भरून काढता येते. त्यामुळे सध्याच्या वित्तीय तूट लक्ष्यापेक्षा जास्त होण्याचा धोका मर्यादित राहतो.

**महेश देशपांडे**

# पाकिस्तानची 'क्रिप्टो' लबाडी

**भिकेकंगाल झालेल्या पाकिस्तानात जवळपास निम्मी लोकसंख्या गरिबी रेषेखाली आपले जीवन कंठत आहे. महागाई, गरिबी आणि बेरोजगारीने जनता होरपळत असताना तिथे मोठे नेते, लष्करी कुटुंबे आणि बड्या अधिकाऱ्यांकडे कधीच मंदी येत नाही. याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे नेते आणि लष्कराकडे असलेली अफाट संपत्ती. आता ही संपत्ती सुरक्षित ठेवण्यासाठी ''क्रिप्टो करन्सी'ला ढाल किंवा कवच बनवण्याची पूर्ण तयारी झाली आहे. क्रिप्टो करन्सी सत्ताधारी वर्गासाठी पैसा लपवण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी आणि निर्बंधांपासून वाचण्यासाठी एक पर्यायी माध्यम बनू शकते. पण सामान्य लोकांसाठी ही व्यवस्था लाभदायी नाही.**




दहशतवाद, हिंसाचार, अस्थिरता, घटनात्मक व्यवस्थांचा अभाव, गरिबी आणि मागासलेपणाशी झुंजणाऱ्या पाकिस्तानच्या अनेक भागांमध्ये आजही अनेक मुलींची शाळांपर्यंत पोहोच नाही. देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली असून तिथे गंभीर आर्थिक संकट आहे. महागाईचा दर सातत्याने वाढत आहे. लोक आरोग्यसेवेसह आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत आहेत.देशाची अर्थव्यवस्था सध्या पूर्णपणे आंतरराष्ट्रीय संस्था आणि मित्र राष्ट्रांकडून घेतलेल्या कर्जावरच चालत आहे. पाकिस्तानची ३० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानाच्या बाबतीत गंभीर टंचाईचा सामना करत आहे, तर जवळपास निम्मी लोकसंख्या गरिबी रेषेखाली आपले जीवन कंठत आहे. महागाई, गरिबी आणि बेरोजगारीने होरपळणाऱ्या या देशाबद्दल असेही म्हटले जाते की, तिथे मोठे नेते, लष्करी कुटुंबे आणि बड्या अधिकाऱ्यांसाठी कधीच मंदी येत नाही. याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे नेते आणि लष्कराकडे असलेली अफाट संपत्ती, जी सुरक्षित ठेवण्यासाठी आता 'क्रिप्टो करन्सी'ला ढाल किंवा कवच बनवण्याची पूर्ण तयारी झाली आहे. पाकिस्तानमधील राजकीय अस्थिरता आणि धोरणात्मक अनिश्चिततेने भांडवलासाठी एक अत्यंत असुरक्षित वातावरण निर्माण केले आहे. अशा स्थितीत, ज्यांच्याकडे साधनसंपत्ती आणि संपर्क आहेत, ते आपली संपत्ती देशात ठेवण्याऐवजी परदेशात सुरक्षित करणे अधिक योग्य मानतात. दुसरीकडे, तिथे करचोरी ही एक व्यापक समस्या राहिली आहे. जेव्हा राज्य स्वतः कर संकलनात अपयशी ठरते आणि कायद्याचे समान पालन होत नाही, तेव्हा संपन्न वर्गासाठी आपले उत्पन्न लपवणे अपेक्षाकृत सोपे होते. हे लपवलेले उत्पन्न हळूहळू परदेशात गुंतवणूक म्हणून वळवले जाते. परिणामी, देशाच्या अंतर्गत विकासासाठी आवश्यक असलेले भांडवल बाहेर निघून जाते आणि दुसरीकडे सरकार कर्ज आणि आंतरराष्ट्रीय मदतीवर अधिकाधिक अवलंबून होत जाते.

पाकिस्तानी नागरिकांकडे दुबईमध्ये मोठ्या संख्येने मालमत्ता आहेत, ज्यांचे एकूण मूल्य १२.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके आहे. जगभरातील व्यापारी आणि नेत्यांच्या गुप्त व्यवहारांचा उलगडा २०१६ मध्ये झाला होता आणि त्याच्या केंद्रस्थानी पाकिस्तानचे अनेक नेते, उद्योगपती आणि लष्करी अधिकारी होते. नंतर असेही समोर आले की, पाकिस्तानमधील काही मोठ्या हस्तींनी गुपचूपपणे आपली संपत्ती देशाबाहेर नेली. या प्रकरणात इम्रान खान यांच्या काही सहकाऱ्यांच्या नावांचाही समावेश होता.काळा पैसा वैध करणे, आंतरराष्ट्रीय निर्बंधांपासून वाचणे आणि करचोरीमध्ये मदत करण्याचे जागतिक धागेदोरे जेव्हा जोडले गेले, तेव्हा पाकिस्तानच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आणि हा एक मोठा मुद्दाही बनला.

२०१७ मध्ये 'पनामा पेपर्स'मध्ये नाव आल्यानंतर नवाज शरीफ यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. 'ट्रान्स्परन्सी इंटरनॅशनल'ने पाकिस्तानचा जगातील सर्वात भ्रष्ट देशांच्या यादीत समावेश केला आहे, जिथे सर्वच क्षेत्रांत भ्रष्टाचार व्याप्त आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात लष्कराशी संबंधित व्यवसायांना पाकिस्तानमधील सर्वात मोठा समूह म्हटले गेले आहे. पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी जून २०२३ मध्ये देशाला दिवाळखोरीपासून वाचवण्यासाठी मदत केल्याबद्दल लष्करप्रमुख मुनीर यांचे जाहीर आभार मानले होते. पाकिस्तानी लष्करामध्ये जमीन हडप करण्याची लालसा इतकी प्रबळ आहे की, तिथले जनरल एखाद्या सरंजामी जमीनदारासारखे वर्तन करतात आणि त्यांना 'लँड माफिया' असेही संबोधले जाते.

हा एक असा देश आहे जो आर्थिक संकट, कर्जावरील अवलंबित्व आणि चलनाचे अवमूल्यन या समस्यांशी झुंजत आहे. या अविश्वासाच्या वातावरणात 'क्रिप्टो करन्सी' एक राज्य-निरपेक्ष संपत्ती म्हणून समोर येत आहे. ही मालमत्ता ना कोणत्याही बँकेत ठेवली जाते आणि ना ती कोणत्याही एका देशाच्या कायद्याच्या पूर्णपणे अधीन असते. याचे नियंत्रण पूर्णपणे व्यक्तीकडे त्याच्या खासगी डिजिटल कीच्या माध्यमातून असते. याच कारणामुळे लोक याकडे भांडवल सुरक्षेचे एक साधन म्हणून पाहतात. जेव्हा चलनाचे वेगाने अवमूल्यन होते किंवा महागाई बचतीला गिळंकृत करू लागते, तेव्हा मर्यादित पुरवठा असलेली क्रिप्टो करन्सी लोकांना आपल्या भांडवलाचे मूल्य टिकवून ठेवण्याचा एक पर्याय वाटते. सीमापार भांडवल नेण्याच्या संदर्भातही क्रिप्टो करन्सीची भूमिका महत्त्वाची ठरते. पारंपरिक पद्धतींमध्ये परकीय चलन नियम, सरकारी परवानगी, बँकिंग प्रक्रिया आणि वेळेचा मोठा विलंब यांचा समावेश असतो. याउलट, क्रिप्टो नेटवर्कच्या माध्यमातून एखादी व्यक्ती काही मिनिटांत कोणत्याही मध्यस्थाशिवाय जगाच्या कोणत्याही भागात संपत्तीचे हस्तांतरण करू शकते.

पाकिस्तानमध्ये क्रिप्टो करन्सीचा मूळ उद्देश सामान्य नागरिकांना आर्थिक सक्षमीकरण देणे हा नसून, राजकीय उच्चभ्रू आणि लष्करी आस्थापनांची संपत्ती आंतरराष्ट्रीय देखरेखीपासून सुरक्षित ठेवणे हा असल्याचे दिसून येते. पारंपरिक बँकिंग प्रणालीवर आंतरराष्ट्रीय संस्था आणि पाश्चात्य वित्तीय एजन्सींची कडक नजर असते. अशा स्थितीत क्रिप्टो करन्सी सत्ताधारी वर्गासाठी पैसा लपवण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी आणि निर्बंधांपासून वाचण्यासाठी एक पर्यायी माध्यम बनू शकते. सामान्य लोकांसाठी ही व्यवस्था लाभदायी नाही. पाकिस्तानची मोठी लोकसंख्या आर्थिकदृष्ट्या असुरक्षित आहे,तिथली वित्तीय साक्षरता कमी आहे आणि डिजिटल पायाभूत सुविधांची पोहोच मर्यादित आहे. क्रिप्टोमधील गुंतवणूक त्यांच्यासाठी अत्यंत जोखमीची आहे. तिथे ना कोणते मजबूत नियमन आहे, ना ग्राहक संरक्षण आणि ना कोणत्याही प्रकारची हमी. अशा वातावरणात सामान्य लोक लवकर श्रीमंत होण्याच्या आमिषाने आपली साठवलेली पुंजी गमावू शकतात.

पाकिस्तानची जवळपास ६५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. मोठ्या संख्येने लोकांची उपजीविका शेती, पशुपालन, शेतमजुरी आणि त्याशी संबंधित लहान व्यवसायांवर अवलंबून आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था रोख व्यवहार, पारंपरिक सावकारी, आढ़ती (दलाल) प्रणाली आणि मर्यादित बँकिंगपर्यंतच मर्यादित आहे. डिजिटल बँकिंग, इंटरनेट आणि स्मार्टफोनची पोहोच आजही असमान आणि मर्यादित आहे. अशा परिस्थितीत, क्रिप्टो करन्सीसारखी जटिल, तांत्रिक आणि अस्थिर वित्तीय व्यवस्था ग्रामीण पाकिस्तानसाठी जवळजवळ अप्रासंगिक आहे. ग्रामीण लोकसंख्येच्या प्राथमिक समस्या पूर्णपणे वेगळ्या आहेत – जसे की बी-बियाणे, खते आणि डिझेलची महागाई, सिंचनाची कमतरता, हवामान संकट, पिकाला रास्त भाव न मिळणे, कर्जाचा जाच आणि सरकारी मदतीचा अभाव. क्रिप्टो या समस्यांवर कोणताही उपाय देत नाही.

जेव्हा एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा आधार ग्रामीण जीवन, कृषी उत्पादन आणि स्थानिक बाजारपेठ असतो, तेव्हा क्रिप्टोकरन्सी विकासाचे इंजिन बनू शकत नाही. पाकिस्तानच्या संदर्भात हे स्पष्ट आहे की, क्रिप्टोकरन्सी ना ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करेल आणि ना देशाला आर्थिक स्थैर्य देईल. हा बहुतांश करून केवळ एक शहरी-उच्चभ्रू आणि सत्ता-संरक्षण प्रकल्प बनूनच राहील, ज्याचा अंतिम बोजा ग्रामीण आणि गरीब जनतेवरच पडेल. अनियंत्रित भांडवल, क्रिप्टो आणि सट्टा अर्थव्यवस्थेत खऱ्या उत्पादनाऐवजी वित्तीय जुगाडालाच उपाय समजले जात आहे. क्रिप्टोला विकासाचा पर्याय सांगणे म्हणजे प्रत्यक्षात हे स्वीकारणे आहे की, राज्याकडे आता संरचनात्मक सुधारणा करण्याची क्षमता उरलेली नाही. साहजिकच, पाकिस्तानमध्ये क्रिप्टो करन्सीला प्रोत्साहन देणे ही सुधारणेची नीती कमी आणि 'सत्ता-संरक्षणाची' रणनीती अधिक वाटते. यामुळे ना सामान्य जनतेचे जीवन सुधारेल आणि ना देश आर्थिक स्थैर्याकडे वाटचाल करेल. याचा खरा लाभ केवळ त्यांनाच मिळेल ज्यांच्याकडे आधीपासूनच शक्ती, माहिती आणि संसाधने उपलब्ध आहेत, तर जोखमीचा भार पुन्हा एकदा सामान्य नागरिकांवरच पडेल.

**डॉ. ब्रह्मदीप आलुने**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## ३६ संघटनांचा संतप्त आक्रोश महामोर्चा, आक्रोश मोर्चाने शहर दणाणले

# एक पाऊल अनुष्काच्या न्यायासाठी..!






**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या मातंग समाजातील १२ वर्षीय विद्यार्थिनी अनुष्का पाटोळे हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात अद्याप ठोस कारवाई न झाल्याने जनतेच्या संयमाचा बांध तुटला आहे. न्याय, दोषींवर कठोर कारवाई व फास्ट ट्रॅक न्यायालया मार्फत फाशीची शिक्षा या मागण्यांसाठी आज यवतमाळ शहरात अभूतपूर्व असा आक्रोश महामोर्चा काढण्यात आला. सकल मातंग समाज, यवतमाळ जिल्ह्याच्या नेतृत्वाखाली तब्बल ३६ सामाजिक संघटना या लढ्यात एकवटल्या असून, त्यांनी थेट शासनाच्या मौनावर बोट ठेवत जाब विचारला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून संविधान चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या या महामोर्चात महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. "अनुष्काला न्याय मिळालाच पाहिजे", "दोषींना फाशी द्या", "दलितांवरील अन्याय सहन केला जाणार नाही" अशा आक्रमक घोषणांनी शहर दणाणून गेले. मोर्चामुळे काही काळ संपूर्ण वाहतूक व्यवस्था ठप्प झाली होती. मोर्चात शालेय विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना भावनिक साद घातली. "साहेब, आमची अनुष्काताई गेली आहे... तिला न्याय द्या," या शब्दांनी उपस्थितांचे डोळे पाणावले. विद्यार्थी विनय शेजव यांनी केलेल्या रोखठोक भाषणात प्रशासनाच्या उदासीनतेवर कडाडून टीका केली. "राजकीय सत्तांतर झटपट होते, पण एका मुलीला न्याय मिळायला वेळ का लागतो?" या प्रश्नाने सभास्थळ हादरले. या महामोर्चात लहुजी शक्ती सेना, विदर्भ मातंग समाज संघटना, अण्णाभाऊ साठे स्मारक समिती, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार निर्मूलन समिती, भारत मुक्ती मोर्चा, ओबीसी मोर्चा, मराठा सेवा संघ, वकील संघटना, सावित्रीबाई फुले स्मारक समिती, मुक्ता साळवे विचारमंच, नाग संघटना यांसह विविध सामाजिक, शैक्षणिक व वैचारिक संघटनांचा सक्रीय सहभाग होता. प्रमुख वक्त्यांमध्ये प्रा. संजय वानखडे, संजय ठाकरे, ज्ञानेश्वर गोबरे, ॲड. आनंद गायकवाड, ॲड. जयसिंग चव्हाण, ॲड. प्रशांत किर्दक, ॲड. सीमा तेलंग, प्रबोधिनी रामटेके, प्रियाताई वाकडे, सिंधुताई धावणे आदींनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "अनुष्काच्या हत्येचा छडा लावला नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल," असा स्पष्ट इशारा देत संघटनांनी लढा थांबणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला. हा मोर्चा केवळ निषेध नव्हता, तर अन्याया विरोधातील स्वाभिमानी जनआंदोलन होते. अशी प्रतिक्रिया यावेळी अनेक सामाजिक संघटनांनी व्यक्त केली.

# तंटामुक्तीचे अध्यक्ष व कुटुंबावर गटसमूहाने केला हल्ला

## तंटा मिटवणाराच ठरला तंट्याचा बळी!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - गावागावात शांतता, सलोखा आणि तंटामुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी शासनाने नेमलेल्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षांनाच आज गटसमूहाच्या हिंसाचाराचा सामना करावा लागत असेल, तर शासनाच्या तंटामुक्त गाव संकल्पनेचे अपयश यापेक्षा ठळकपणे काय असू शकते, असा थेट सवाल घाटंजी तालुक्यातील कोळी (खुर्द) येथील तंटामुक्त अध्यक्ष व त्यांच्या कुटुंब यावर हल्ला केल्याच्या प्रकार उघडकीस आला आहे. या धक्कादायक घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाबाराव गेमसींग जाधव यांच्यावर २१ जणांच्या जमावाने घरासमोर येऊन काठी, गोटे व काड्यांनी अमानुष मारहाण केल्याची गंभीर घटना १८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी घडली.

याबाबत घाटंजी पोलीस स्टेशनमध्ये दाखल जबानी रिपोर्ट नुसार, गावात १४ जानेवारीपासून विना परवानगी नियमबाह्य कबड्डी स्पर्धा सुरू असलेल्या ठिकाणी बाहेरगावच्या संघांना खेळू देण्याच्या



मुद्द्यावरून वाद निर्माण झाला. वाद वाढू नये म्हणून बाबाराव जाधव हे घरी परतले असतानाच अवघ्या काही वेळात जिवण कैलास राठोड व इतर २० जणांचा जमाव त्यांच्या घरासमोर आला. कोणतेही कारण न देता शिवीगाळ करत त्यांनी थेट हल्ला चढवला. काठीने डाव्या हातावर व कपाळावर मारहाण करण्यात आल्याने बाबाराव जाधव यांच्या कपाळावर गंभीर दुखापत झाली. मारहाण थांबवण्यासाठी मध्ये पडलेल्या त्यांच्या पत्नी मालाबाई जाधव व वहिनी वर्षा जाधव यांनाही हातावर व डोळ्या जवळ मार लागला. इतकेच नव्हे तर अपंग असलेल्या त्यांच्या लहान भावालाही तसेच अल्पवयीन मुलालाही निर्दयपणे मारहाण करण्यात आली. महिलांवर, अपंग व्यक्तीवर आणि संपूर्ण कुटुंबावर सामूहिक हल्ला करून आरोपींनी थेट कायदा व सुव्यवस्थेला आव्हान दिल्याची भावना गावात व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, गावातील तंटे मिटवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांनाच अशा प्रकारे जीवे मारण्याच्या धमक्या देत मारहाण होत असेल, तर सामान्य नागरिकांची सुरक्षा कोण करणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. २१ आरोपींचा स्पष्ट उल्लेख, प्रत्यक्ष साक्षीदार असूनही अद्याप कठोर कारवाई का होत नाही. आरोपींना कोणाचे पाठबळ आहे का, याबाबत प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर कोळी (खुर्द) गावासह परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, दोषींवर दंगल, खुनाचा प्रयत्न, महिलांवरील अत्याचार व इतर गंभीर कलमांखाली तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

तंटामुक्त गाव ही केवळ कागदावरील योजना ठरणार की प्रत्यक्षात नागरिकांना सुरक्षा देणार, याचे उत्तर आता शासन व पोलीस प्रशासनाने कृतीतून द्यावे, अशी ठाम अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## युनियन बँक महागाव शाखेतर्फे पीडित कुटुंबाला दोन लाखाचा धनादेश

महागाव - तालुक्यातील पेढी येथील विमल रामदास ठाकरे वय अंदाजे 42 वर्षे यांचा हृदय विकाराने मृत्यू झाला मृत्यूपूर्वी त्यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती या योजनेअंतर्गत युनियन बँक शाखा महागाव येथे विमा काढला होता त्यांच्या दुःखद निधनानंतर महागाव शाखेच्या कर्मचाऱ्यांनी सहानुभूतीपूर्वक व तत्परतेने त्यांच्या वारसांना शासकीय योजनेचा लाभ त्वरित मिळावा याकरिता तांत्रिक बाबींचा पाठपुरावा करून दोन लाखाची मदत मिळवून दिली. युनियन बँकेचे शाखा व्यवस्थापक किरण सावळे, सहाय्यक शाखा व्यवस्थापक प्रमोद दुधाडे, ग्रामविकास अधिकारी सतीश कुबडे, दिलीप सिरतावार, वरिष्ठ लिपिक विनोद दुधे, संदीप वांगेकर, हनुमान इंगळे ,गणेश पुरी, ऋषिकेश वांगेकर, ग्राहक सेवा संचालक गोपाल कासार व दिलीप जाधव, यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या संदर्भात बँकेच्या कार्यक्षेत्रातील गावामध्ये जनजागृती केली. 436 रुपया मध्ये दोन लाखाचा विमा तसेच केवळ वीस रुपयांमध्ये प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने अंतर्गत दोन लाखाच्या अपघाती विमा प्रत्येक नागरिकांनी काढावा असे आवाहन बँक शाखेचे व्यवस्थापक किरण सावळे यांनी केले आहे.

## • वेचक



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराच्या सौंदर्यीकरणासाठी सामाजिक व राजकीय पक्षांकडून नगराध्यक्षांना निवेदन

पुसद - शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या सभोवतालचा परिसर मोकळा करून सौंदर्यीकरण व सुशोभीकरण करण्यासाठी आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करत आज भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांच्या वतीने नगराध्यक्षा सौ. मोहिनी नाईक यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण देशाचे संविधान शिल्पकार असून त्यांच्या स्मारकाचा सन्मान राखणे हे प्रशासनाचे सामाजिक व नैतिक कर्तव्य आहे. यापूर्वीही समाजाच्या व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने या संदर्भात अनेक वेळा निवेदने व चर्चा करण्यात आल्या असतानाही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. त्यामुळे परिसर मोकळा व सुव्यवस्थित करून नियोजनबद्ध सौंदर्यीकरण व सुशोभीकरणासाठी आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी अशोक भालेराव,राजकुमार भगत,विशाल डाके, राहुल धुळे, रवी वागमारे, रोहन जोगदंडे, संदीप सिंग, सूरज खिलारे, केंद्रक खंदारे, रोहन राऊत, शुभम गेले, रविराज कोल्ले, अजय लोखंडे, वैभव सूर्यवंशी सह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### "अध्यात्म हेच ग्रामोन्नतीचे प्रथम चरण" : प्रा प्रेम राठोड



दिग्रस - 18 जानेवारी 2026 रोजी जय भोले मंडळ रोणादेवी यांचे वतीने आयोजित भव्य महादेवाच्या गाण्याची स्पर्धा पार पडली सदर स्पर्धेच्या उद्घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मा सुधीर भाऊ देशमुख सदस्य जिल्हा नियोजन समिती तर उद्घाटक म्हणून मा प्रेम राठोड माजी जिल्हा परिषद शिक्षण सभापती प्रमुख पाहुणे म्हणून प्रा विजय चांदेकर संयोजक बिरसा ब्रिगेड तर प्रमुख उपस्थिती म्हणून स्वप्निल भाऊ चांदवत, विलास पाटील बुट्टीकर, पंजाबराव पाटील, रमेश भाऊ मडावी, जय भोले भजनी मंडळ रोहणादेवी चे अध्यक्ष माणिक भाऊ लडके, भारत कुरसंगे, राजूभाऊ सुकळकर, देविदास गोंधळेकर, केशव भाऊ उकंडे, अशोक भाऊ मानतुटे हे होते. सदर स्पर्धेत शिवशक्ती भजनी मंडळ वडगाव (आंध) यांनी प्रथम पारितोषिक मिळवले तर ओम शिवशक्ती मंडळ कुऱ्हाड द्वितीय ,जय भोले मंडळ वडगाव तृतीय, जय भोले भजनी मंडळ तिवरी यांनी चतुर्थ पारितोषिक मिळवले वरोली, कारखेडा, कारली, गुडी, कळसा, भुली, मोगवान, येथील भजनी मंडळींनी सुद्धा वेगवेगळे पारितोषिके आणि बक्षीसे मिळवले सदर स्पर्धेचे परीक्षक म्हणून नारायण बेले जानराव हगवणे यांनी भूमिका पार पाडली तर सूत्रसंचालन राम तायडे सर यांनी केले.

### जीवन केवळ भौतिक अस्तित्व नाही तर सन्मानाने जगण्याचा अधिकार : अलताफ हुसेन यांचे प्रतिपादन

उमरखेड - आज जीवनाचा हक्क कायदेशीररित्या हमी दिलेला असला तरी, प्रत्यक्षात लाखो लोक अजूनही सन्माननीय जीवनापासून वंचित आहेत. गरिबी, असमानता, जातीय भेदभाव, लिंग असमानता, बेरोजगारी, बेघरपणा आणि आरोग्य सेवांचा अभाव यासारख्या समस्या या अधिकाराच्या प्रत्यक्ष प्राप्तीमध्ये अडथळा आणतात. नागरिकांना वास्तविकता प्रतिष्ठेने जीवन जगण्याचा अधिकार मिळत आहे का? गरीब, दलित, अल्पसंख्यक यांचे साठी प्रतिष्ठेचा अर्थ , त्यांना रोज कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो. महिला हिंसा, भेदभाव और असुरक्षा ,संविधानाने दिलेले अधिकार,सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक असमानता , प्रशासकीय सेवा या वर सखोल चर्चा करण्यात आली. "जीवनाचा अधिकार " आणि "प्रतिष्ठा" या संकल्पनांबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, उपेक्षित लोकांचा आवाज मुख्य प्रवाहात आणने,सार्वजनिक सहभागाद्वारे संवैधानिक मूल्ये मजबूत करणे. हा अभियाना चा मुख्य उद्देश असल्याचे प्रास्ताविकात फेरोज अन्सारी यांनी मांडले. छत्रपती संभाजी नगर येथे 1 फेब्रवारी 2026 रोजी तपाडिया नाटय गृह येथे होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी होण्याचे आवाहन एमपीजे शहराध्यक्ष मोहसीन राज यांनी केले.

# नॅचरल शुगरचे विदर्भात सर्वाधिक उसाचे गाळप!

## ७५ दिवसांत ३.४० लाख मेट्रिक टन ऊस गाळप क्षमता

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज युनिट 2 गुंज- सवना या कारखान्याने चालू दहाव्या गळीत हंगामात आज अखेर केवळ 75 दिवसात 3 लाख 40 हजार मॅट्रिक टन विदर्भात विक्रमी गाळप केले आहे. कारखान्याची गाळप क्षमता वाढल्यानंतर दररोज 500 मॅट्रिक टन गाळप होत असून शेतकऱ्यांच्या हितासाठी कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त गाळप करण्याचा व्यवस्थापनाचा प्रयत्न यशस्वी झालेला आहे. कारखान्याने चालू गळीत हंगामात गाळपास येणाऱ्या उसाला रुपये 2700 प्रति टन या प्रमाणे सर्वाधिक पहिला हप्ता देण्याचे धोरण सर्वप्रथम नॅचरल शुगरने जाहीर केलेले आहे. व त्या नुसार गेल्या दहा वर्षापासून शेतकऱ्यांना प्रत्येक पंधरवड्याला ऊस बिलाची रक्कम नियमित अदा करण्यात येत आहे.

कारखाना क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या हितासाठी व्यवस्थापनाने अत्यंत



महत्त्वाकांक्षी निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी चालू केलेली आहे. त्यामध्ये सुधारित जातीचे ऊस रोपे आणि नॅचरल ऑर्गानिक फर्टीलायझर सेंद्रिय खत शेतकऱ्यांना सवलतीचे दरात कारखान्याच्या शेती गट कार्यालया मार्फत पोहोच देण्याची सुविधा केलेली आहे. तसेच कारखाना स्थळी प्रति दिन सहा मॅट्रिक टन क्षमतेचा सीएनजी प्रकल्प उभारणीचे काम युद्धपातळीवर चालू असून येत्या मार्च 2026 पर्यंत या प्रकल्पाची चाचणी घेण्याचे नियोजन सुद्धा केलेले आहे. या प्रकल्पासाठी लागणारा कच्चामाल नेपियर गवत बेणे कारखान्याच्या शेजारील गावातील शेतकऱ्यांना मोफत देण्याची व्यवस्था आहे. तसेच ऊसा मधील एआय तंत्रज्ञान ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी राबविण्यातची योजना महाराष्ट्रात सर्वप्रथम नॅचरल शुगर युनिट 1 येथे आणलेली आहे. त्याचा शुभारंभ नुकताच कारखान्याचे युनिट 1 रांजणी येथे सकाळ उद्योग समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार व राजेंद्रजी पवार आणि धाराशिवचे जिल्हाधिकारी यांचे हस्ते संपन्न झाला. अशा प्रकारचे अनेक उपक्रम सातत्याने राबविले असून या साठी नॅचरल शुगरला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक पारितोषकांनी गौरविण्यात आले आहे. साखर उद्योग यशस्वी करण्यासाठी आणि आर्थिक क्रांती घडविण्यासाठी शेतकरी, कष्टकरी व कामगारांनी सकारात्मक सहकार्य केल्यास निश्चितच पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्या प्रमाणे नॅचरल शुगरच्या माध्यमातून विदर्भाचा विकास साध्य होण्यास वेळ लागणार नाही. नॅचरल शुगरच्या यशस्वी वाटचाली मध्ये मोलाचा वाटा असलेल्या सर्व घटकांनी सहकार्य केले, त्याबद्दल नॅचरल उद्योग समूहाचे प्रमुख कृषीरत्न बी. बी. ठोंबरे चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# दलित कुटुंबीयांना भूमिहीन करून फसवणूक केल्याने संबंधितावर अट्रॉसिटी नुसार गुन्हे नोंद व्हावे

## या मागणी साठी २७ जानेवारी पासून तहसील कार्यालय समोर आमरण उपोषण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - डोंगरगाव ता. महागांव येथील बौद्ध समाजातील विमल बबन हाडशे तसेच हिरामण शंकर हाडशे या शेतकऱ्यांना त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची संपूर्ण जमीन हडप करण्यात आली. भोगवटदार क्रमांक दोनची जमीन एक करून हाडशे कुटुंबीयांना नाममात्र मोबदला देऊन ती जमीन तायरखा रहीमखा पठाण यांनी वैशाली श्रीकांत उपलेंचवार यांना विकली. सदर जमीन अल्पावधीतच दीड कोटी रुपयाला जीएनआय इंफास्टट्रक्चर लि. औरंगाबाद या कंपनीला विकण्यात आली. यामध्ये बौद्ध समाजाच्या कुटुंबीयांच्या अज्ञानाचा फायदा घेत फसवणूक करण्यात आली. संबंधित कुटुंबीयांना न्याय मिळावा याकरिता त्यांच्या वतीने सय्यद मुदसिर सय्यद जमील यांनी हे संबंधितांना त्वरित न्याय न मिळाल्यास 27 जानेवारीपासून तहसील कार्यालया समोर उपोषणास बसणार असल्याचा प्रशासनास गर्भित इशारा दिला आहे.

जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने



डोंगरगाव येथील शेत सर्वे नं. 138 क्षेत्रफळ 4.00 हे.आर. मध्ये गिट्टीक्रेशर खदान हा प्रचंड कारखाना सुरू केला आहे. गरीब अशिक्षित मागासवर्गीय असलेल्या हिरामण हाडसे व त्यांच्या कुटुंबातील नागरिकांना भूमीहीन करून त्यांची जमीन मोठ्या किंमतीमध्ये इतरांना विकण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वतीने लढण्याचा अधिकार प्राप्त झाला. करिता संबंधित प्रकरणांमध्ये फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांना त्यांची जमीन त्यांना परत मिळवून देण्यासाठी 26 जानेवारी पासून महागाव तहसील कार्यालयाच्या समोर समोर उपोषण बसणार असल्याचे प्रशासनाच्या निर्देशनास आणून दिले आहे. गिट्टीक्रेशर कंपनी कारखाना तात्काळ बंद करण्यात यावा. बौद्ध समाजाच्या अशिक्षित शेतकऱ्याची फसवणूक झालेल्या प्रकरणात ज्या शासकीय व निमशासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग आलेला आहे, त्या सर्वावर ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल व्हावेत, ही मागणी घेऊन 27 जानेवारी 2026 पासून सय्यद मुदसिर सय्यद जमाल सामाजिक कार्यकर्ते डोंगरगाव हे महागाव तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती समोर उपोषणास बसणार असल्याचे कळते. या प्रकरणांत ताहेरखान रहीमखान पठाण, वैशाली श्रीकांत उपलेंचवार, जीएनआय इन्फोक्रस्ट्रक्शन लि. औरंगाबाद, जिल्हाधिकारी यवतमाळ, उपविभागीय अधिकारी उमरखेड, तहसीलदार महागाव, दुय्यम निबंधक अधिकारी महागाव, मंडळ अधिकारी मोरथ, तलाठी डोंगरगाव यांना गैरअर्जदार करण्यात आले.

# नालीचे पाणी प्लॉटमध्ये साचल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगर परिषद अंतर्गत येत असलेल्या प्रभाग क्रमांक १५ महावीर नगर मधील उमरखेड रोड लगत असलेल्या जैन मंदिर ते चिलवाडी रोड पर्यंत असलेली नाली तुटफूट झाल्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

महावीर नगर हे दलित वस्ती म्हणून घोषित झालेले आहे या नगरात गेल्या २० वर्षा अगोदर सिमेंट रस्ते व नाल्याचे बांधकाम झालेले आहे परंतु आज रोजी नगरातील सिमेंट रोडमध्ये खड्डे पडून सर्व रोड खराब झालेले आहे तसेच सर्व सांडपाण्याच्या नाल्या हे तुटपुट झाल्यामुळे सांडपाणी हे जाण्यासाठी उतार मार्ग नसल्यामुळे एकाच ठिकाणी थांबले आहे तसेच काही ठिकाणी नाल्यातील घाणपाणी खुल्या प्लॉटमध्ये जाऊन साचल्यामुळे



घाणीचे साम्राज्य पसरले आहे व जंतूचा प्रदुभाव वाढल्यामुळे नागरिकासह लहान बाळाचे सुद्धा आरोग्य खराब होऊन साथीचे रोग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही असे परिसरातील नागरिकांकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. अत्यंत महत्त्वाचे उमरखेड रोडला लागून असलेल्या प्लॉट समोरील चिलवाडी रोड ते जैन मंदिर पर्यंत असलेले नाल्या ह्या सर्व तुटल्यामुळे या नालीतील सर्व पाणी खुल्या प्लॉटमध्ये साचल्यामुळे हे आजूबाजूच्या विंधन विहीर (बोर) मध्ये उतरत आहे त्यामुळे लोकांच्या वापर करण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये गढूळ

> महावीर नगर मधील उमरखेड लोकल लगत असलेली नाली ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येत असल्यामुळे त्यांच्याकडे या विषयासाठी मागणी करावी असे नगर अभियंता शुभम आचमारे नगरपरिषद पुसद यांनी कळविले आहे.

आणि अत्यंत खराब पाणी येत असल्यामुळे या पाण्याचा वास येत आहे त्यामुळे नागरिकाकडून वारंवार नगर प्रशासनाला तोंडी व सांगूनही आजपर्यंत कोणतेही नियोजन करण्यात आले नाही. तत्कालीन मुख्याधिकारी अभिषेक वायकोस यांना या संदर्भात नागरिकांनी भेटून बोलल्यामुळे त्यांनी संबंधित नगर अभियंता यांना कळविले होते परंतु आजपर्यंत कोणतीही उपयोजना झाली नाही त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# आंबाळी गावाचे दोन युवक अपघात जागीच ठार ; अज्ञात वाहणाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - अंबाळी गावाचे दोन युवक उमरखेड शहरातून कामकाज आपले अटपूण अंबाळी गावाकडे दुचाकीने जात असताना उमरखेड - पुसद रोड राज्य मार्गावर रस्ता कुपटी गावाच्या जवळच्या दत मंदीर परिसर लगत अज्ञात वाहणाने दुजाकी स्वारास जबर धडक दिली त्यामध्ये अंबाळी येथील दोघाचा जागीच मृत्यु झाला ही घटणा दि १९ जानेवारी रात्री ९ वाजता सुमारास घडल्याचे सविस्तर वृत आहे.

अंबाळी येथील विनायक काळे (३२) आणि चंद्रकांत कऱ्हाळे (२२) हे दोघे जन मोटार सायकल क्र. एम एच २९ सीएच ४०३७ यांनी उमरखेड वरून गावाकडे जात होते कुपटी गावा जवळच्या दत मंदीर परिसर लगत उमरखेड - पुसद राज्यमार्ग रस्त्यावर अज्ञात वाहनाने यांच्या मोटार





सायकलला जबर धडक दिली रात्रीची वेळ असल्याने अत्याअवस्थ पडलेल्या मृतक विनायक व चंद्रकांत यांच्याकडे ये -जा करणाऱ्या वाहण धारकांच्या ही घटणा निर्दशणास आली त्यावरून घटणेची माहिती पोफाळी पोलीसात परशराम काळे यांनी दिली २० जानेवारी रोजी अपघातग्रस्ताचे शासकीय उपजिल्हा रुग्णालय उमरखेड या ठिकाणी शवविच्छेदन करण्यात आले दोघे जन अपघातात मृत पावले अंबाळी गावात मनसून्न दुःखाचे सावट पसरले होते या घटणेचा पोफाळी पोलीस ठाणेदार निलेश शेंबडे उपनिरिक्षक सुरेश शिन्दे जमादार शिवाजी पवार करित आहे. अज्ञात वाहण पसार झाले आहे. मृतकांचा अंत्यसंस्कार अंबाळी गावात करण्यात आला आहे.

# पांढरकवडा नगरपालिकेत शिवसेनेचा भगवा फडकला सातही विषय समित्यांवर शिवसेनेचे निर्विवाद वर्चस्व

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - नगरपरिषदेच्या विषय समित्यांच्या सभापती व उपसभापती निवडीत शिवसेनेने (शिंदे गट) ऐतिहासिक विजय मिळवत सातही विषय समित्यांवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. आज सोमवारी दुपारी दोन वाजता पार पडलेल्या विशेष सभेत शिवसेनेची एकहाती सत्ता अधिकृतपणे स्थिरावली.

या निवडीत सार्वजनिक बांधकाम समिती – प्रफुल जिड्डेवार, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समिती – सविता गटलेवार, स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती – गणेश धुर्वे, पाणीपुरवठा व जलनिसारण समिती – आतिश चव्हाण, नियोजन व विकास समिती – शैलीन सबरीन खान, महिला व बालकल्याण समिती – भाग्यश्री कडू यांची सभापतीपदी निवड करण्यात आली. तर



उपसभापतीपदी जयश्री शेंडे यांची निवड झाली.

हा दणदणीत विजय शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीचा आणि नेतृत्वावर असलेल्या जनविश्वासाचा ठोस पुरावा मानला जात आहे. या यशाचे श्रेय पालकमंत्री मा. श्री संजय राठोड, खेतानी फाउंडेशनचे अध्यक्ष मा. श्री सलीम भैया खेतानी, जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिंगणवार, जिल्हा प्रमुख राजुदास जाधव, जिल्हा समन्वयक मा. श्री साजिद शरीफ, तालुकाप्रमुख राकेश नेमणवार तसेच शिवसेना नेते मोहसीन भाई काजी यांच्या मार्गदर्शनाला देण्यात आले. दरम्यान, नगरपरिषद उपाध्यक्ष आतिश चव्हाण यांना पाणीपुरवठा व जलनिसारण समितीचे पदसिद्ध पद मिळाल्याने शहराच्या मूलभूत सुविधा व जलव्यवस्थापनावर शिवसेनेचे नियंत्रण अधिक बळकट झाले आहे. या निवडीनंतर शिवसेना नगरसेवक व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, महिला व बालकल्याण या क्षेत्रांत गतिमान व लोकाभिमुख विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. प्रशासनाशी समन्वय साधून नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत पांढरकवड्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना कटिबद्ध राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# कचरा व्यवस्थापनावर एनएसएसचा अभ्यासपूर्ण अहवाल नगराध्यक्षांना सादर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - शहरातील कचरा व्यवस्थापनाची सद्यस्थिती, त्यातील त्रुटी व भविष्यात राबविण्याजोग्या उपाययोजनांचा सखोल अभ्यास करून शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत स्वयंसेवकांनी सविस्तर अहवाल तयार केला आहे. हा अहवाल कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला असून, तो नुकताच आतिश उर्फ सोनूभाऊ बोरेले, नगराध्यक्ष, नगरपरिषद पांढरकवडा यांना औपचारिकरित्या सादर करण्यात आला.



या अहवालामध्ये शहरातील कचरा संकलन व्यवस्था, ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण, डम्पिंग ग्राऊंडची सद्यस्थिती, रस्त्यांच्या कडेला व मोकळ्या जागांवर साचलेले कचऱ्याचे ढिग, नाल्यांमधील प्लास्टिक कचरा, सार्वजनिक शौचालयांची अवस्था तसेच बाजारपेठेतील कचरा व्यवस्थापन यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.

तसेच, या समस्यांवर प्रभावी उपाययोजना म्हणून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, ओला व सुका कचरा वेगळा करण्याची सक्ती, घंटागाडी व्यवस्थेत सुधारणा, कचऱ्याचे ब्लॅक स्पॉट्स निर्मूलन, प्लास्टिक कचऱ्यावर नियंत्रण, सार्वजनिक स्वच्छतेसाठी नियमित देखरेख व नगरपरिषद व नागरिक यांच्यातील समन्वय वाढवण्याच्या ठोस सूचना अहवालात मांडण्यात आल्या आहेत.

अहवाल स्वीकारताना नगराध्यक्ष आतिश उर्फ सोनूभाऊ बोरेले यांनी एनएसएस स्वयंसेवकांचे तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांचे विशेष कौतुक केले. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अशा अभ्यासपूर्ण आणि वास्तवाधारित उपक्रमांचा निश्चितच उपयोग होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांवरील अन्याय खपवून घेणार नाही

## डॉ मीनल भोंडे यांच्या इशारा

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात उद्भवलेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या शिष्टमंडळाने कुलगुरू यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर व ठोस चर्चा केली. या भेटीत संशोधक विद्यार्थ्यांची वस्तुस्थिती, त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे प्रश्न तसेच मार्गदर्शक शिक्षकांवर येणारा अन्याय याबाबत स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडण्यात आली.

शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले की, विद्यापीठाने अधिसूचना क्र. १६३/२०२४ अन्वये सत्र २०२३-२०२४ साठी पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया राबविली होती. या अधिसूचनेनुसार संशोधक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन आरएसीमार्फत प्रवेश घेतला, १/२०१६ नियमांनुसार कोर्सवर्क पूर्ण केले, विद्यापीठ परीक्षा उत्तीर्ण केली तसेच संशोधन आराखडा सादर करण्याची संपूर्ण प्रक्रिया पार पाडली. विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर आवश्यक सर्व शुल्क भरल्यानंतर नोंदणी प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांना आरआरसी सभेसाठी बोलाविण्यात आले. मात्र प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी मार्गदर्शक शिक्षक संबंधित संशोधन केंद्राच्या महाविद्यालयात नियमित सेवेत नसल्याचे कारण पुढे करून संशोधक विद्यार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आल्याने तीव्र अन्याय झाल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.अनेक विद्यार्थी यूजीसी-नेट व जेआरएफ पात्र असून, वेळेत नोंदणी न झाल्यास त्यांची पात्रता व विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय शिष्यवृत्ती धोक्यात येण्याची गंभीर शक्यता आहे. पीएच.डी. नोंदणीअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक भवितव्य धोक्यात येऊ नये, ही प्रमुख मागणी यावेळी मांडण्यात आली.यूजीसी रेगुलेशन २०२२ ची अंमलबजावणी विद्यापीठाने नंतरच्या अधिसूचनेद्वारे केली असून, त्याआधी अधिसूचना क्र. १६३/२०२४ नुसार प्रवेश घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्यांवर हे नियम प्रतिगामी स्वरूपात लागू करणे अन्यायकारक ठरेल, असे महासंघाने स्पष्ट केले. प्रशासकीय विलंब, दिशानिर्देशांचा अभाव व अधिसूचनांच्या विसंगत अंमलबजावणीचा फटका विद्यार्थ्यांना बसू नये, ही ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली.



या सर्व मुद्द्यांवर कुलगुरूंनी अत्यंत सकारात्मक, संवेदनशील व विद्यार्थीहितैषी भूमिका व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे हित हे विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.प्रकुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनीही भविष्यात संशोधक विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या अडचणी येऊ नयेत यासाठी विद्यापीठ स्तरावर सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे मत व्यक्त केले. प्रशासकीय प्रक्रियांमध्ये स्पष्टता आणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यावर भर देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या वतीने अध्यक्षा डॉ. मीनल भोंडे यांनी यावेळी कडक शब्दांत इशारा देत सांगितले की, संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांवर कुठलाही अन्याय शैक्षणिक महासंघ खपवून घेणार नाही. विद्यापीठीय निर्णयांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य उद्ध्वस्त होऊ देणार नाही आणि गरज पडल्यास महासंघ न्यायासाठी तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही त्यांनी दिला.एकूणच हे संपूर्ण प्रकरण प्रशासकीय विलंब, दिशानिर्देशांच्या अभाव आणि अधिसूचनांच्या विसंगत अंमलबजावणीमुळे निर्माण झालेले असून, त्याची झळ संशोधक विद्यार्थ्यांना बसू नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने तातडीने न्याय्य, समतोल व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घ्यावा, अशी ठाम अपेक्षा या बैठकीत व्यक्त करण्यात आली. शैक्षिक महासंघाचे महामंत्री डॉ. मंगेश अडगोकर, कोषाध्यक्ष डॉ. दिनेश खेडकर, अमरावती शहर महामंत्री डॉ. अरुण हरणे, प्राचार्य डॉ. डी.टी. इंगोले, डॉ. प्रफुल्ल गवई, डॉ. गजानन लामधाडे, आणि डॉ. तक्षशीला मोटघरे उपस्थित होते.

## संक्षिप्त

### डॉ.रवि दलाल यांना फरिदाबाद युनिव्हर्सिटी कडून आचार्य पदवी



**अमरावती**-तिवसा जि. अमरावती गावातील प्रख्यात लेखक डॉ.रवि दलाल यांनी ३०० वर्षापासून अलिखित असलेले अवधुती भजन प्रथम १९९३ साली लिहून काढले. अठराव्या शतकापासून बौद्ध शाखेच्या सांगायान पंरपरेतून निर्माण झालेले अलिखित अवधुती भजन लेखी करण्याचा मान डॉ.रवि दलाल यांनी वयाच्या २२ व्या वर्षी मिळविला.'अवधूती भजन बौद्ध धर्मातील प्रवाह ' हा डॉ.रवि दलाल यांचा अंत्यंत वादग्रस्त समीक्षासंग्रह आहे.या ग्रंथाचे एकूण चार भाग प्रकाशित झाले असून पारंपरिक पद्धतीने अवधूती भजन करणाऱ्या भक्तानी डॉ.रवि दलाल यांच्या समीक्षा ग्रंथाला . (संग्रहाला )जोरदार विरोध केला होता.आजपर्यंत डॉ.रवि दलाल यांच्या सामाजिक वास्तवावर आधारित असलेले साहित्य म्हणजे 'अवधुती भजन बौद्ध धर्मातील प्रवाह' हा संशोधन ग्रथं असून त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह युद्धमय, वादळरेषा, आम्ही स्वातंत्र्यात प्रवेश करतो,नामा,बेगळ शंकरपट ,सावजीचाळ पुरणपोळी,मास्तर, एक घाव सुखाचा संथ वाहते वरदाई, पारध,कानू सोनू आणि महार पारडीचा इतिहास इत्यादी कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित झालेल्या आहेत तर वेंलाटी , खपरेलाची पायवाट आभाळव्रण ,तीन खून, वेदनेचे वेद इत्यादी कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत.त्यांच्या चा लेखनातून वंचित,शोषित समाजाच्या वेदना आणि संघर्षाचे चित्रण प्रभावीपणे दिसते.

### आता लाडकी बहीण योजनेसाठी आधार प्रमाणीकरण



**अमरावती** - राज्यातील महिलांच्या आधिक स्वातंत्र्य, तसेच आरोग्य, पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यामाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहोण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभाची महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण करण्यात मान्यता देण्यात आली आहे.योजनेतील लाभार्थ्यांची १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करणे आवश्यक होते. ऑनलाईन ई-केवायसी करताना पतीचे किंवा वडिलांचे आधार कार्ड नोंदवून ओटीपी प्राप्त झाल्यानंतर ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण होत होती. परंतु विधवा, परितत्त्या, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला, घटस्फोटीत, एकल व ज्यांचे वडील मृत्यू पावले आहेत, अशा महिलांना ई-केवायसी करण्यात अडचण निर्माण होत होती. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत वाढवून ई-केवायसी प्रक्रिया राबवित असताना लाभार्थ्यांकडून पर्याय निवडताना संभ्रम असल्यामुळे ई-केवायसी करताना चुका झाल्यास किंवा पती किंवा वडील ह्यात नसलेल्या, तसेच घटस्फोटीत लाभार्थांची ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी किंवा अद्याप ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण केली नसल्यास यासाठी एडीट ऑप्शन देण्यात आला होता.१८ नोव्हेबर २०२५ पर्यंत ऑनलाईन ई-केवायसी करताना पर्याय देण्यात आले होते. यात माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी माणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानंतर निवृत्तीवेतन येत नाहीत. पर्याय : होय/नाही, माझ्या कुटुंबातील केवळ एक विवाहीत व एक अविवाहीत महिला योजनेचा लाभ घेत आहे. पर्याय होय / नाही, या पर्यायापैकी लाभार्थ्यांनी नाही हा पर्याय निवडल्यामुळे लाभाथ्यांचे अर्जामध्ये रिमार्क EKYCGovtEmp1आणि स्टेटस रिजेक्ट दाखवत आहे. त्यामुळे अर्जदाराचे लाभ बंद झाले आहेत. लाभार्थ्यांनी ऑनलाईन स्टेटस तपासणी करावयाची असल्यास सेतू केंद्र, सायबर कॅफे, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, संबंधीत तालुका, बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प किंवा जिल्हा महिला व बाल अधिकारी, अमरावती येथे तपासणी करु शकतील.

### धामणगाव रेल्वे येथे साईबाबा प्राणप्रतिष्ठा स्थापना दिवस



**धामणगाव रेल्वे** - येथील श्री साई सेवा प्रतिष्ठाण ट्रस्ट यांच्या वतीने श्री पंचमुखी हनुमानजी व श्री संत साईबाबांचा ७ वा प्राणप्रतिष्ठा स्थापना दिवस वसंतपंचमीच्या शुभ मुहूर्तावर २१ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. अभिषेक, श्री साईबाबा ग्रंथाचे संगीतमय पारायण, रुद्र स्वाहाकार महायज्ञ, महाआरती, भजन संध्या व महाप्रसाद असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ट्रस्ट व समस्त नगरवासी यांनी केले आहे.

## अमरावती महानगरपालिकेमार्फत स्वच्छतेसाठी हेल्पलाईन सेवा उपलब्ध

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरातील नागरिकांना स्वच्छतेसंदर्भातील विविध तक्रारी नोंदविता याव्यात, यासाठी खालील हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये पुढील तक्रारींचा समावेश आहे. घराघरातून कचरा गोळा करण्याबाबत (घंटागाडी) तक्रार,सार्वजनिक नाल्यांची साफसफाई,गल्ली व रस्ते स्वच्छतेबाबत तक्रार, मेलेली जनावरे उचलणेइतर स्वच्छतेशी संबंधित सर्व तक्रारी या सर्व तक्रारींसाठी नागरिकांनी खालील मनपा हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधावा.मनपा हेल्पलाईन क्रमांक : ७२१२६७२३००, व्हॉट्सॲप तक्रार क्रमांक : ७०३००९२२३० .तसेच अमरावती शहरांतर्गत घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या नवीन कंत्राटदार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या मार्फत स्वतंत्र हेल्पलाईन सेवा सुरू करण्यात आली आहे.शहरातील मोठ्या प्रमाणातील कचरा, कचऱ्याचे साचलेले स्पॉट तसेच भरलेले कचरा कंटेनर उचलण्याबाबत नागरिकांनी खालील हेल्पलाईन क्रमांकावर थेट संपर्क साधावा. हेल्पलाईन ७५१७५१६१६२

अमरावती शहरातील सर्व नागरिक, व्यापारी, व्यावसायिक व संस्थांनी शहर स्वच्छतेच्या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. कचरा व्यवस्थापनासंदर्भात कोणतीही अडचण किंवा समस्या असल्यास वरील हेल्पलाईन क्रमांकांचा वापर करून तक्रार नोंदवावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील**

## परीक्षा विभागाची प्रमाणपत्रे व इतर सेवांचे शुल्क वाढ थांबवा

### प्रहार विद्यार्थी संघटनेचे निवेदन आंदोलनाचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाअंतर्गत देण्यात येणारे प्रमाणपत्र व इतर सेवांचे शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. ती शुल्कात केली अवाढव्य वाढ विद्यार्थ्यांना न परवडणारीच आहे.त्यामुळे ही शुल्क वाढ थांबविण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून यावर ७ दिवसाच्या आत निर्णय न घेतल्यास प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने प्रहार स्टाईल तीव्र आंदोलन करण्यात येईल,असे निवेदन देण्यात आले.



विद्यार्थ्यांना परीक्षेत मिळालेल्या गुणांची पूर्णमोजणी शुल्क हे २० रूपये वरून निर्धारित केलेल्या शुल्कानुसार १०० केले आहे.दुय्यम गुणपत्रिका किंवा तात्पुरती गुणपत्रिका शुल्क हे १०० रुपये वरून निर्धारित केलेल्या शुल्कानुसार ५०० केले आहे, दुय्यम पदवी प्रमाणपत्र वाटप शुल्क ४०० रुपये वरून निर्धारित केलेल्या शुल्कानुसार १००० केले आहे. अशा ४२ प्रकारच्या अनेक प्रमाणपत्र व इतर सेवांचे शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने केली आहे.

बहुसंख्य विद्यार्थी हे शेतकरी,मजुर,कामगार तसेच गरीब घरातील विद्यार्थी आहेत. त्यामुळे विद्यापीठाने केलेली शुल्क वाढ विद्यार्थ्यांना न परवडणारी आहे. तरी आपण त्वरित हा प्रमाणपत्रे व इतर सेवांचे शुल्क वाढीचा निर्णय त्वरित मागे घ्यावा, व विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. ही नम्र विनंती लवकरात लवकर ७ दिवसाच्या आत विद्यापीठाने प्रमाणपत्र व इतर सेवांचे शुल्कात केलेल्या वाढीचा निर्णय मागे घेतला नाही तर प्रहार विद्यार्थी संघटनेच्या वतीने प्रहार स्टाईल तीव्र आंदोलन करण्यात येईल,असे निवेदन देण्यात आले, निवेदन देतेवेळी जिल्हाप्रमुख आकाश दादा खारोडे, समर्थ डवरे, ऋषिकेश ठवकर,विशाल आवारे ऋषी पोहोकर,आकाश टापरे, रोहित शहाणे,रुद्रेश सायंडे,प्रज्वल भोकसे, कुणाल नागे,निखिल ठाकरे, ऋषी धाबे, सार्थक याउल,भूषण डोंगरे,कार्तिक फिसके,आशिष बंड, अनुज घावडे अनेक पदाधिकारी व विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सिकलसेल आजार मुक्तीसाठी आरोग्य विभागाची 'अरुणोदय'मोहीम

**मोर्शी/वार्ताहर**

सिकलसेल आजाराचे प्रमाण कमी करून भविष्यात सिकलसेल मुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'अरुणोदय' विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.ही मोहीम १५ जानेवारी २०२६ ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी अंतर्गत राबविली जाणार आहे.

या मोहिमेअंतर्गत ० ते ४० वयोगटातील सर्व नागरिकांची सिकलसेलची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे.नागरिकांनी आपण सिकलसेल निरोगी आहोत, सिकलसेल वाहक आहोत किंवा सिकलसेल ग्रस्त आहोत याचे निदान करून घेणे आवश्यक आहे.तसेच सिकलसेल रुग्ण व वाहक व्यक्तींसाठी समुपदेशन,औषधोपचार तसेच विवाहपूर्व समुपदेशनही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



सिकलसेल निर्मूलनासाठी प्रत्येक नागरिकाने एक पाऊल पुढे टाकावे, असे आवाहन मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमेश यावलकर यांनी केले आहे.यासोबतच मोर्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रतीक्षा रवि गुल्हाने तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने सिकलसेल तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले आहे. सिकलसेल आजारावर वेळेत निदान व योग्य उपचार केल्यास भविष्यातील गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते. त्यामुळे सर्व नागरिकांनी या 'अरुणोदय' विशेष मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

## चांदूरबाजार नगरपरिषदेच्या सर्व विषय समित्या बिनविरोध

**चांदूरबाजार/वार्ताहर**

स्थानिक नगरपरिषदेच्या सर्व विषय समित्यांची निवड, बिनविरोध पार पडली. या निवडीत बांधकाम समितीच्या सभापतीपदी आबु वानखडे,शिक्षण-क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी तन्वीर ताज, तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी, कल्याणी हेमंत कोंडे यांची निवड करण्यात आली.तसेच महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापतीपदी,



कनिजा फातेमा जमील अहमद यांची बिनविरोध निवड झाली.

तसेच स्थायी समितीचे नामनिर्देशित सदस्य म्हणून, सचिन खुळे व ॲड. आबीद हुसैन यांची निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध झाल्याने, नगरपरिषदेत समाधानाचे वातावरण होते. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे शहरवाशीयांकडून अभिनंदन होत आहे .शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार,यावेळी विषय समितीच्या सभापतींनी व्यक्त केला.

### इंद्रायणी कॉलनीत 'श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ'

**अमरावती**-इंद्रायणी कॉलनी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थानच्या वतीने शहरात प्रथमच भव्य 'श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा २२ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार असून, विठ्ठल भक्तांसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे.या ज्ञानयज्ञाचे प्रवक्ते म्हणून श्री.ह.भ.प. कैलाशचंद्र चांदूरकर महाराज (रा. साऊर, अमरावती) आपल्या मधूर वाणीतून विठ्ठल कथेचे निरुपण करणार आहेत.सोहळ्याची सुरुवात २२ जानेवारी रोजी सकाळी काकडा आरती, कलश पूजन आणि दुपारी कलश यात्रेने होईल.

### निधन वार्ता

#### लक्ष्मी सावरकर यांचे निधन



**अमरावती**- महाजनपुरा येथील रहिवासी लक्ष्मी फकीरजी सावरकर यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यू त्यांचे वय ८९ वर्षाचे होते. त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुली,नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# हृदयस्पर्शी विषयाच्या नाट्य प्रयोगाने पाणावले प्रेक्षकांचे डोळे

## नितेश देशमुख व डॉ. खोंड यांचे मार्गदर्शनातं राज्यनाट्य स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेमध्ये दरवर्षी सीओईपीचे विद्यार्थी प्रेक्षकांचे मनावर कायम छाप उमटवीत असतात. तीच परंपरा कायम ठेऊन यावर्षी राज्यातील ६४ व्या महाराष्ट्र राज्य मराठी नाट्य स्पर्धेत प्रथमच सहभाग घेत विद्यार्थ्यांनी सीओईपी चा सांस्कृतिक वारसा पुढे नेण्यासाठी यशस्वी पाऊल उचलले.'डिअर तीर्थरूप' या सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पहिल्या दोन अंकी नाटकाचा प्रयोग सादर केला. पहिल्यांदा दोन अंकी नाटकाच्या स्पर्धेत



सहभाग घेत महाराष्ट्रच्या घरोघरातील हृदयस्पर्शी परस्थितीचे सादरीकरण केले.

राज्यात सद्य परिस्थितीत रोजगार आणि शिक्षण संधीच्या कमतरतेमुळे छोट्या शहरांमधून युवा पिढीचे होणारे स्थलांतर, लोप पावत असलेली छोट्या खाणितील संस्कृती आणि दोन पिढ्यांच्या जीवनशैली आणि राहणीमानातील फरक या मुद्द्यांवर आधारित सादरीकरण हा उद्देश लेखकाचा होता आणि तो डॉ. खोंड आणि नितेश देशमुख अमरावती यांचे मार्गदर्शनात नाटकाचे दिग्दर्शक यश लोही याने प्रेक्षकांपर्यत पोहचवीला. नाटकात यश लोही, सानिया तडवी, आर्यन करेवार, श्रेया मिरगाळे, तन्वी क्षीरसागर, साकिब शेख, ऋतुजा सार्वे, विघ्नेश हुरपडे, आयुष देशपांडे, वेदांत यादव, ऋतुजा गोतपागर, श्रावणी खोत, प्रज्ञेश वाडेकर, ओम पेंदाम, चंद्रशेखर जोशी, आदित्य ताम्हणकर, ऋजूल शास्त्री, आकांक्षा राऊत आणि इतर विद्यार्थी कलाकार तसेच नील कदम आणि काव्या या बालकलाकारांचाही सहभाग होता. नाटकाचे दिग्दर्शन यश लोही याने तर नाटकाचे आणि गोंधळाचे लिखाण विघ्नेश हुरपडे याने केले. पार्श्वसंगीत विराज चव्हाण तर नाटकाची सूत्रे तनिष्क जैन याने सांभाळली. अत्यंत देखणी नेपथ्य रचना पार्थ खेडेकर याने साकारली तर रंगमंच व्यवस्था जान्हवी कडू हिने सांभाळली. प्रकाशयोजना प्रणव दिग्रसकर आणि हर्षवर्धन दिवटे यांनी रंगवली. या संघाचे नेतृत्व विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. मोहन खोंड यांनी केले. नाट्य संघाला प्राध्यापक सल्लागार म्हणून प्रा. सतीश कुंभार, प्रा. रोहित मांगळेकर तसेच सांस्कृतिक समन्वयक म्हणून प्रा. सुनील घुनागे आणि स्नेहसंमेलनाचे सल्लागार म्हणून डॉ.संतोषकुमार वाघ लाभले. नाट्य संघाचे मार्गदर्शन विद्यापीठाचा माजी विद्यार्थी निकष देशमुख याने केले. 'आमचे नाटक 'डिअर तीर्थरूप' हा फक्त दोन पिढ्या किंवा जीवनशैलीतला फरक नसून तो 'तीर्थरूप' ते 'डिअर' यामधला बदल स्वीकार करण्याचा प्रवास आहे' असे नाट्यसंघाचे मार्गदर्शक निकष देशमुख यांनी यावेळी सांगितले.

यावेळी फक्त विद्यार्थीच नाही तर विद्यापीठाचे प्राध्यापक, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांबरोबरोबर विद्यार्थ्यांचे पालक,सीओईपी चे अधिष्ठाता प्राध्यापक चेतनकुमार पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. मोहन खोंड, डॉ. एस.एस. परदेशी (अध्यक्ष माजी विद्यार्थी संघटन), डॉ. महेश शिंदीकर, डॉ. प्रमोद शेंडगे हे सर्व मान्यवर उपस्थित होते.'सीओईपी हे फक्त आता तांत्रिक विद्यापीठ राहील नसून इथले विद्यार्थी आता व्यावसायिक पातळीवरचे नाटक सुद्धा सादर करण्याची क्षमता ठेवतात व नक्कीच यातील काही काही कलाकार आपल्याला पुढे मोठ्या पडद्यावर दिसतील याची आम्हाला खात्री आहे.' असे विधान विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. मोहन खोंड यांनी केले.

# ‘डेटा लीक’चा भयकंप




**सोशल मीडिया क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असणाऱ्या ‘इन्स्टाग्राम’च्या दीड कोटींहून अधिक वापरकर्त्यांच्या माहिती सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून सायबर विश्वात यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वापरकर्त्यांचा वैयक्तिक डेटा धोक्यात असल्याचा दावा केला जात आहे. यामध्ये वापरकर्त्यांची नावे, भ्रमणध्वनी क्रमांक, घराचे पत्ते आणि ई-मेल आयडी यांचा समावेश आहे.**

आजच्या काळात इन्स्टाग्राम हे सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या सर्वाधिक पसंतीचे ठरलेले माध्यम म्हणून पुढे आले आहे. विशेषतः ‘टिकटॉक’वर बंदी घातल्यानंतर इन्स्टाने रिल्स नामक संकल्पना अचूक वेळी पुढे आणली आणि तिथून पुढे ‘इन्स्टाग्राम’चा अक्षरशः झंझावात सुरू झाला. वैयक्तिक माहिती शेअर करण्यापासून ते विविध व्लॉगपर्यंत सर्वदूर इन्स्टाग्राम वापरले जाऊ लागले; पण अलीकडे इन्स्टाग्राम वापरकर्त्यांच्या इनबॉक्समध्ये अचानक पासवर्ड रिसेट ई-मेल्सचा पूर येऊ लागल्याचे दिसून आले. कोणतीही मागणी न करता आलेले हे ई-मेल्स अनेकांना गोंधळात टाकणारे ठरले. खोलात जाऊन माहिती घेतल्यानंतर याच्या मुळाशी सायबर सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वाची आणि चिंताजनक घडामोड असल्याचे समोर आले. त्याच वेळी डार्क वेबवरील एका मंचावर सुमारे १७.५ दशलक्ष इन्स्टाग्राम खात्यांची माहिती उपलब्ध झाल्याच्या बातम्यांनी वापरकर्त्यांच्या अस्वस्थतेत भर घातली.

सद्यस्थितीत दोन अब्जहून अधिक मासिक सक्रिय वापरकर्ते असलेले इन्स्टाग्राम हे सायबर गुन्हेगारांचे प्रमुख लक्ष्य असणे स्वाभाविक आहे. वापरकर्त्यांचे खाते ताब्यात घेण्यासाठी ब्राऊझर एक्स्टेन्शनपासून ते फिशिंग मोहिमांपर्यंत अनेक क्लृप्त्या वापरल्या जातात; मात्र अलीकडे दिसून आलेली पद्धत तुलनेने अधिक सोपी आणि मानसशास्त्रीय दबाव निर्माण करणारी आहे. थेट इन्स्टाग्रामकडून आलेला खरा पासवर्ड रिसेट करण्याबाबतचा ई-मेल वापरकर्त्याला गोंधळात टाकणारा ठरला. असा ई-मेल मिळाल्यावर साहजिकच ‘माझे खाते धोक्यात आहे’ अशी भावना निर्माण होते आणि घाईघाईने निर्णय घेण्याची शक्यता वाढते. हाच क्षण हल्लेखोरांसाठी महत्त्वाचा ठरतो.

‘याहू’ची डेटा गळती ही सायबर इतिहासातील सर्वात मोठ्या डेटा गळतींपैकी एक घटना मानली जाते. २०१३ आणि २०१४ मध्ये दोन वेगवेगळ्या सायबर हल्ल्यांमध्ये ‘याहू’च्या सुमारे ३ अब्ज वापरकर्त्यांची खाती बाधित झाली. वापरकर्त्यांची नावे, ई-मेल पत्ते, फोन क्रमांक, जन्मतारीख आणि एन्क्रिप्टेड पासवर्ड बाहेर गेले. ही बाब २०१६ मध्ये उघडकीस आली होती आणि या गळतीमुळे ‘याहू’च्या व्हेरिझॉनसोबतच्या विक्री कराराच्या किमतीत कपात झाली. त्यापूर्वी २०१३ मध्ये डोबीच्या सॉफ्टवेअर प्रणालीत झालेल्या हल्ल्यात १५ कोटी वापरकर्त्यांची माहिती चोरीला गेली. यात ई-मेल पत्ते, एन्क्रिप्टेड पासवर्डस आणि क्रेडिट कार्ड माहितीचा समावेश होता. विशेष बाब म्हणजे, अनेक पासवर्ड कमकुवत पद्धतीने एन्क्रिप्ट केलेले असल्यामुळे ते सहज उलडगले गेले.

‘इक्विफॅक्स’ या अमेरिकेतील क्रेडिट रेटिंग कंपनीमध्ये झालेल्या डेटा लीक प्रकरणात १४.७ कोटी नागरिकांची अत्यंत संवेदनशील माहिती बाहेर पडली. सामाजिक सुरक्षा क्रमांक, जन्मतारीख, पत्ते आणि ड्रायव्हिंग लायसन्स तपशील ठकसेनांच्या हाती लागल्याने ही घटना आर्थिक आणि कायदेशीर दृष्ट्या अत्यंत गंभीर ठरली. परिणामी, कंपनीला अब्जावधी डॉलर्सची नुकसानभरपाई आणि दंड भरावा लागला.२०१८ मध्ये घडलेले फेसबुककॅम्ब्रिज नालिटिका प्रकरण अद्यापही चर्चिले जाते. कारण, यामध्ये तब्बल ८.७ कोटी फेसबुक वापरकर्त्यांचा डेटा परवानगीशिवाय राजकीय उद्देशांसाठी वापरण्यात आला. एका तृतीय पक्ष पद्वारे डेटा गोळा करून तो कॅम्ब्रिज नालिटिका या राजकीय सल्लागार संस्थेला देण्यात आला. या प्रकरणामुळे फेसबुकवर जागतिक स्तरावर विश्वासाचा मोठा तडा गेला आणि डेटा गोपनियतेवर गंभीर चर्चा सुरू झाली.

२०१८ मध्ये मॅरियट समूहाच्या स्टारवूड हॉटेल सिस्टीममध्ये दीर्घकाळ सुरू असलेल्या घुसखोरीमुळे ५० कोटी ग्राहकांची माहिती गळतीला लागली होती. यात पासपोर्ट क्रमांक, प्रवास तपशील, संपर्क माहिती आणि काही प्रकरणांत क्रेडिट कार्ड डेटा समाविष्ट होता. ही घुसखोरी अनेक वर्षे लक्षात न येणे, ही बाब अधिक धक्कादायक ठरली. २०२२ मध्ये ट्विटरच्या एपीआयमधील त्रुटीचा वापर करून हॅकर्सनी ५.४ कोटी खात्यांचे ई-मेल आणि फोन नंबर गोळा केले होते. ही माहिती नंतर डार्क वेबवर विक्रीसाठी ठेवण्यात आली. ही घटना थेट हॅकिंग न करता प्रणालीतील कमकुवत दुव्याचा वापर कसा केला जातो, याचे उदाहरण मानली जाते. २०२३ मध्ये ‘मूव्हइट’ या फाईल ट्रान्स्फर सॉफ्टवेअरमधील त्रुटींचा फायदा घेऊन क्लॉप रॅन्समवेअर गटाने शेकडो संस्थांचा डेटा चोरला. सरकारी विभाग, बँका, आरोग्य संस्था आणि विद्यापीठे यांचा यात समावेश होता.

### ‘इन्स्टाग्राम’बाबत नेमके काय घडले?

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात अनेक वापरकर्त्यांना एका पाठोपाठ एक पासवर्ड रिसेट ई-मेल्स मिळाले. हे ई-मेल्स बनावट नव्हते, तर इन्स्टाग्रामच्या अधिकृत प्रणालीतूनच पाठवले गेले होते. त्यामुळे पारंपरिक फिशिंगप्रमाणे लिंक खोटी आहे का, ई-मेल ड्रेस संशयास्पद आहे का, अशी शंका निर्माण होण्यास वावच नव्हता. ई-मेलमधील मजकूर मात्र स्पष्टपणे सांगतो की, तुम्ही ही रिक्वेस्ट केली नसेल, तर पासवर्ड बदलला जाणार नाही. साहजिकच, हे वाचल्यानंतर घाबरलेला वापरकर्ता अनेकदा विचार न करता ‘रिसेट’ पर्यायावर क्लिक करतो. याच मानसिकतेवर हल्लेखोर अवलंबून असतात. या पार्श्वभूमीवर डार्क वेबवरील ‘ब्रिचफोरम्स’ या मंचावर १७.५ दशलक्ष खात्यांचा डेटाबेस उपलब्ध झाल्याची माहिती समोर आली. या डेटामध्ये वापरकर्त्यांची नावे, ई-मेल पत्ते, फोन क्रमांक आणि यूजर आयडी समाविष्ट असल्याचे सांगितले गेले. या घटनेचा आणि पासवर्ड रिसेट ई-मेल्सच्या लाटेचा थेट संबंध आहे का, हा प्रश्न उपस्थित झाला. मेटाने मात्र आपल्या प्रणालीत कोणतीही घुसखोरी झालेली नाही, असे स्पष्ट केले.

कंपनीच्या अधिकृत निवेदनानुसार, एका त्रुटीमुळे बाहेरील व्यक्तींना पासवर्ड रिसेट ई-मेल्स ट्रिगर करता येत होते. ही त्रुटी दुरुस्त करण्यात आली असून वापरकर्त्यांची खाती सुरक्षित आहेत, असे सांगितले गेले; परंतु हे स्पष्टीकरण अनेकांना अपुरे वाटले. कारण, प्रणालीत घुसखोरी झालेली नाही आणि वापरकर्त्यांची माहिती बाहेर नाही या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. तसेच हा डेटाबेस नवीन नसून २०२२ मध्ये एपीआयमधील त्रुटींतून गोळा झालेल्या जुन्या माहितीतून तयार झालेला आहे. ही माहिती २०२४ मध्ये सायबर गुन्हेगारी गटांमध्ये फिरत होती; मात्र आता ती सार्वजनिकरीत्या उपलब्ध झाल्यामुळे तिचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. जुनी माहिती असली, तरी तिचा वापर करून मोठ्या प्रमाणावर पासवर्ड रिसेट रिक्वेस्ट पाठवणे शक्य झाले, हे या घटनेतून स्पष्ट होते.

सायबर सुरक्षातज्ज्ञांच्या मते, हा हल्ला प्रत्यक्ष खाते फोडण्यापेक्षा वापरकर्त्यांच्या विश्वासावर आघात करणारा आहे. सतत ई-मेल्स येऊ लागल्यावर लोक घाबरतात आणि सावधगिरीची भावनाही कमी होते. यालाच ‘रिसेट फटिग’ असे म्हटले जाते. खऱ्या आणि बनावट इशाऱ्यांमधील फरक ओळखण्याची क्षमता कमी होते. अशावेळी एखादी चुकीची कृती झाली, तर हल्लेखोरांना संधी मिळू शकते.इन्स्टाग्रामची प्रमाणीकरण व्यवस्था (ऑथेंटिकेशन सिस्टीम) इतर मेटा प्लॅटफॉर्म्सशी जोडलेली असल्याने धोका अधिक वाढतो. एकाच खात्याद्वारे फेसबुक, इन्स्टाग्राम आणि थ्रेड मध्ये प्रवेश मिळतो. त्यामुळे एका ठिकाणी कमकुवत दुवा आढळला, तर तिचा परिणाम अनेक सेवांवर होऊ शकतो. ही गुंतागुंतच हल्लेखोरांसाठी संधी निर्माण करते.

या सगळ्या गोंधळात वापरकर्त्यांनी नेमके काय करावे, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्वप्रथम कोणताही अनपेक्षित पासवर्ड रिसेट ई-मेल मिळाल्यास घाई करू नये. ई-मेलमधील लिंकवर क्लिक करण्याऐवजी थेट ॲप किंवा अधिकृत वेबसाईटवर जाऊन खाते सुरक्षित आहे का, हे तपासणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुसरे म्हणजे प्रत्येक प्लॅटफॉर्मसाठी वेगळा आणि मजबूत पासवर्ड वापरणे आवश्यक आहे. यामुळे एका ठिकाणची माहिती लीक झाली, तरी इतर खाती सुरक्षित राहतात. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे टू स्टेप ऑथेंटिकेशन सुरू ठेवणे. ओळख न झालेल्या उपकरणावरून लॉगिनचा प्रयत्न झाला, तर अतिरिक्त कोडची गरज भासते आणि यामुळे हल्लेखोरांचा मार्ग अडतो.

इन्स्टाग्रामने काही प्रकारच्या खात्यांसाठी हे प्रमाणीकरण आपोआप सुरू केले आहे; मात्र अनेक सामान्य वापरकर्ते ते बंद करतात किंवा दुर्लक्ष करतात. सध्याच्या परिस्थितीत ही चूक महागात पडू शकते. खाते आधीच ताब्यात गेले असल्यास इन्स्टाग्रामकडून दिलेल्या अधिकृत प्रक्रियेद्वारे ते परत मिळवण्याचा प्रयत्न करावा.ही घटना केवळ इन्स्टाग्रामपुरती मर्यादित नाही. ती आजच्या डिजिटल युगातील एक व्यापक वास्तव दाखवणारी आहे. सायबर गुन्हेगार थेट प्रणाली फोडण्याऐवजी कायदेशीर आणि वैध प्रक्रियांचा गैरवापर करून गोंधळ निर्माण करत आहेत. त्यामुळे कंपन्यांना केवळ अंतर्गत सुरक्षा नव्हे, तर वापरकर्त्यांचा अनुभव आणि त्यांच्यापर्यंत पोहोचणारे संकेत यांचाही गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. डिजिटल सुरक्षितता ही एकदाच करून संपणारी गोष्ट नाही, तर सतत जागरूक राहण्याची प्रक्रिया आहे. घाई, भीती आणि गोंधळ यावर नियंत्रण ठेवले, तर अशा हल्ल्यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर कमी करता येऊ शकतो.

मेटाचा डेटा सिक्युरिटीचा इतिहास पाहता संशय कायम राहणे स्वाभाविक आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये सुमारे ६० कोटी फेसबुक आणि इंस्टाग्राम पासवर्ड साध्या मजकुरात साठवले गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. ही पद्धत २०१२ पासून सुरू असल्याचे समोर आल्यानंतर मेटाला तब्बल १०१ दशलक्ष डॉलर्सचा दंड भरावा लागला होता. या पार्श्वभूमीमुळे ‘यावेळी खरोखरच काहीच घडले नाही का’ असा प्रश्न अनेकांच्या मनात आहे.हे प्रकरण केवळ तांत्रिक नसून मानसशास्त्रीयही आहे. पासवर्ड रिसेटसारख्या सूचनांचा मारा झाला की, वापरकर्ते गोंधळतात. परिणामी, एखादी खरी सूचना आली, तरी तिच्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता वाढते. अशी स्थिती सायबर गुन्हेगारांसाठी अनुकूल ठरू शकते. म्हणूनच थेट हॅकिंगपेक्षा वापरकर्त्यांच्या वर्तनावर परिणाम करणाऱ्या पद्धती अधिक वापरल्या जात असल्याचे दिसते.

**शहाजी शिंदे**

# मुलांचे भविष्य आणि सोशल मीडिया

आजचे जग वेगाने डिजिटल होत आहे. स्मार्टफोन, इंटरनेट आणि सोशल मीडिया हे आधुनिक जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. माहिती, शिक्षण, संवाद आणि मनोरंजन या सर्व गोष्टी आता एका स्क्रीनवर उपलब्ध आहेत. मात्र, या डिजिटल सुलभतेच्या झगमगाटामागे एक गंभीर वास्तव दडलेले आहे ते म्हणजे लहान मुलांचे असुरक्षित होत चाललेले मानसिक, भावनिक आणि सामाजिक आयुष्य. मद्रास उच्च न्यायालयाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदीचा कायदा करण्याचा विचार केंद्र सरकारने करावा, अशी केलेली सूचना या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची आणि विचार करायला लावणारी आहे.

आज भारतात १४ ते १६ वयोगटातील ८२ टक्के मुले स्मार्टफोन वापरत आहेत आणि त्यापैकी ७६ टक्के मुले सोशल मीडियावर सक्रिय आहेत. हे आकडे केवळ आकडेवारी नाहीत. ती एक सामाजिक चेतावणी आहे. बालपण म्हणजे खेळ, संवाद, निसर्गाशी नाते आणि भावनिक वाढीचा काळ. मात्र, हे बालपण आता ‘स्क्रीन टाइम’मध्ये अडकत चालले आहे. दररोज तीन तासांपेक्षा जास्त वेळ ऑनलाइन घालवणारी मुले हळूहळू वास्तवापासून दूर जात आहेत. अधीरता, राग, आळस, एकाकीपणा यांसारख्या भावना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनत असल्याचे पालकही मान्य करत आहेत.

प्रौढ व्यक्तीसाठी इंटरनेटवरील सामग्री पाहायची की नाही? हा वैयक्तिक अधिकार असू शकतो. मात्र, मुलांच्या बाबतीत तोच निकष लावणे धोकादायक ठरते. मुलांची मानसिक जडणघडण अजून पूर्ण झालेली नसते. अशा अवस्थेत पोर्नोग्राफिक सामग्री, हिंसक व्हिडीओ, ड्रग्ज, तंबाखू यांसारखी माहिती सहज उपलब्ध होणे म्हणजे त्यांच्या मनावर खोल परिणाम होण्याची शक्यता निर्माण करणे. मद्रास उच्च न्यायालयाने ‘गेटकीपिंग’च्या अभावाकडे बोट दाखवून हीच गंभीर बाब अधोरेखित केली आहे.

अलीकडील काळातील शालेय घटनांमधून मुलांमध्ये आत्महत्येच्या प्रवृत्तीत वाढ होत असल्याचे दिसून येते. सोशल मीडियावर सतत तुलना, अपेक्षांचा दबाव, ट्रोलिंग, सायबर बुलिंग आणि ‘परफेक्ट आयुष्य’चे खोटे चित्र यामुळे मुलांचे आत्मभान ढासळते. अपयश स्वीकारण्याची ताकद कमी होते. ही केवळ वैयक्तिक समस्या न राहता सामाजिक संकट बनत आहे. अशा वेळी ‘कायदा नको, फक्त जागरूकता पुरेशी आहे’ असे म्हणणे वास्तवाशी फारकत घेणारे ठरू शकते.



ऑस्ट्रेलियाने लागू केलेला ‘ऑनलाइन सुरक्षा सुधारणा कायदा, २०२४’ हा जगासाठी एक महत्त्वाचा संदर्भ ठरतो. १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालून, उल्लंघनाची जबाबदारी थेट सोशल मीडिया कंपन्यांवर टाकण्यात आली आहे. मुलांना किंवा पालकांना गुन्हेगार ठरवण्याऐवजी, ‘वय पडताळणी’सारखे तंत्रज्ञान वापरण्याची जबाबदारी कंपन्यांवर देण्यात आली आहे. हा दृष्टिकोन शिक्षात्मक नसून संरक्षणात्मक आहे आणि म्हणूनच तो अधिक परिणामकारक ठरू शकतो. भारतासारख्या देशात, जिथे १६ वर्षांखालील मुलांची संख्या सुमारे ३५ कोटी आहे, तिथे हा प्रश्न अधिक व्यापक आणि गुंतागुंतीचा आहे. केवळ बंदी पुरेशी ठरणार नाही. कायद्याबरोबरच पालकांसाठी डिजिटल साक्षरता, शाळांमधून इंटरनेट सुरक्षिततेचे शिक्षण, पालक विंडो आणि कंटेंट फिल्टरिंग आणि सोशल मीडिया कंपन्यांची कठोर जबाबदारी या सर्व बाबी एकत्रितपणे राबवाव्या लागतील.

मुलांचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे, पण त्याहून महत्त्वाचे आहे त्यांचे संरक्षण. आज घेतलेले निर्णय उद्याच्या पिढीचे मानसिक आरोग्य, मूल्य व्यवस्था आणि सामाजिक भान ठरवणार आहेत. मद्रास उच्च न्यायालयाने व्यक्त केलेली भूमिका ही केवळ न्यायालयीन टिपणी नसून समाजाला आरसा दाखवणारी आहे. ‘डिजिटल भारत’ घडवताना ‘सुरक्षित बालपण’ हरवू नये, हीच खरी कसोटी आहे. त्यामुळे आता प्रश्न असा नाही की, कायदा करावा की नाही? प्रश्न असा आहे की, आपण आपल्या मुलांसाठी जबाबदार समाज म्हणून उभे राहणार आहोत का?

**मच्छिंद्र ऐनापुरे**

# वारी चुकवी जन्म मरणाची फैरी...

श्री दत्त जयंती उत्सव झाल्यावर पौष महिण्यातील श्री गुरुमंदीर येथील प.पू. श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या सातशे सव्वीसाव्या जन्मोत्सव उत्सवाचा पंचेचाळिस दिवसीय उत्सवाची लगभग सुरु झालेली असते.श्रींच्या उत्सवादरम्यान श्री वासुदेव आश्रम अभ्यासिका वाशीम येथील प.पू. श्री पंडीत काका धनागरे महाराजांनी सुरु केलेली वाशीम ते कारंजा या पालखीची जय्यत तयारी सुरू झालेली असते.या वर्षी हा १७ वा पालखी सोहळा २५,२६,२७,२८ डिसेंबर २०२५ या दरम्यान अंत्यत उत्साहात पार पडला. २५ तारखेला सकाळी प. पू. सद्गुरु श्री विजय काका पोफळी महाराज व गुरुमायी जयश्री काकू व श्रद्धेय पू. श्री मकरंद काका यांच्या मार्गदर्शनाखाली दिगंबराच्या उद्‌घोषात पालखीने कारंज्या साठी प्रस्थान केले.वाशीम नगरित प. पू. सद्गुरू श्री विजय काका पोफळी महाराज व सौ गुरुमायी यांचे जागोजागी उत्साहात औक्षण व स्वागत झाले. पालखीने केव्हा सागर हवालदार यांचेकडे अल्पोपहार आटोपून पालखी जाधव क्रशर इथला स्वागत स्विकारित आपल्या आश्रमच्या भटऊंब्रा येथील शेतात भोजनासाठी स्थिरावली. भोजन आटोपून पालखी थंडी व ऊन यां संगमात कोंढाळा महाली येथील माऊली विद्यालयात रात्रीच्या मुक्कामासाठी विसावली. येथे श्रध्देय श्री मकरंद काकांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. येथे पू. श्री मकरदं काकांनी वारी कां करावी याची सुंदर माहिती कथन केली.



प. पू. श्री विजयकाकांनी साधकांच्या शंकाचे समर्पक निरसन केले येथेच साधक श्री गणेशजींनी त्यांना आलेल्या सद्गुरुंच्या अनुभूतीची माहिती सर्वांना कथन केली.श्री मकरंद काकांच्या मार्गदर्शनाखाली पालखी पुढील मार्गक्रमानासाठी सज्ज झाली.कधी दिगंबराचा गजर , विठू नामाचा गजर तर कधी हनुमंताची आळवणी करीत सुमीत चांडक यांच्या शेतात दुपारच्या भोजनासाठी केव्हां पोहचली हे जाणवले नाही. भोजनप्रसाद व विश्रांती घेऊन पालखी आपल्या पूढील प्रवासासाठी मार्गस्थ झाली. सारंग देशपांडे यांनी जेव्हा रंगात रंगली राधा ऐकूनी मुरली कृष्णाची ही गवळण म्हटली तेव्हा जवळ जवळ १० मिनिटे सर्व वारकरी बेभान होऊन फेर धरत, तर कुणी फुगडी खेळत कृष्णमयच होऊन गेलेले अद्भुत दृष्य प्रत्येक जण अनुभवत होते.प.पू. श्री विजय काका पोफळी महाराजांचे आगमन होताच त्यांचे पायघड्या घालून स्वागत करण्यात आले.ईथे पू.श्री मकरंद काकांनी श्रीमदभागवतातील नवविधा भक्तीवर फारच सुंदर विवेचन केले. हे विवेचन करतांना त्याचे उदाहरण देऊन महत्व विषद केले जसे वंदन भक्ति करीत असू तर प. पू. श्री रामानंद बिडकर महाराज यांचे शिष्य रावसाहेब सहस्त्रबुद्धे हे बिडकर महाराजांच्या घरातील प्रत्येकालाच वंदन करीत होते. आजच्या कलीयुगातील सर्वश्रेष्ठ भक्ती जर कोणती असेल तर ती नामस्मरण भक्ती आहे.याचे आजच्या काळातील उदाहरण म्हणजे श्री गोदंवलेकर महाराज यांचे श्री रामनाम व त्यांचे शिष्य श्री बेलसरे महाराज यांनी प्रसार केलेली राम नाम नामस्मरण भक्ती व तिचा प्रचार व प्रसार अशा सर्व नवविधा भक्तिंचे अतिशय समर्पक वर्णन पू. श्री मकरंद काकांनी केले.

वारीमध्ये विविधांगी त्रास होतो तो आम्हाला व्हायला पाहिजे कायावाचामनानी केलेली पापे वारंवार वारी केल्यानी नाहीसे होत असते. कधी काटे रुततात,रस्तांवरील बारीक गोटे रुततात. दिवसा ऊन व रात्री थंडीचा त्रास होतो तो व्हायला पाहिजे पायांना फोडं येतात ते यायला पाहिजे कारण कित्येक जन्मांच्या पापांचा नाश यातून होत असतो.श्री भालचंद्र देशपांडे व इतरही साधकांनी त्यांना आलेल्या अनुभवांचे कथन केले. हे अनुभव ऐकून सर्वचजन थक्क झाले.सद्गुरुंच्या या आश्वासक विचारांनी सर्वच साधक भावविभोर झालेत. पू. श्री मकरंद काकांच्या आधिपत्यात पालखी कारंजाच्या कडे प्रस्थान झाली.आज ओढ होती ती सद्गुरुंच्या श्रीदत्तमहात्म या ग्रथांवरील प्रवचनाची.आज पू. श्री मकरंद काकांनी शंकरतनाया या भजनानी पालखिचे प्रस्थान प्रवास सुरु झाला.शनिवार हनुमतांच्या विविध भजनांचे सुरेल टिप आळवल्या गेले ते इतके की दुपारच्या भोजनाचे ठिकाण केव्हा आले ते पत्ताही लागले नाही. केव्हा ऐकदा प्रवचनासाठी श्री गुरुमंदिरात पोहोचतो असे सर्वांनाच झाले होते. सर्व साधक प.पू.श्री विजय काकांच्या प्रवचनासाठी श्री गुरूमदिरांत पोहचले. आजच्या प्रवचनात पू. श्री काकांनी आयु राजांनी पूत्र प्राप्तीसाठी श्री दत्तप्रभूंची १०० वर्ष कशी सेवा केली कोणत्या प्रकारे केली याचे सुरेख वर्णन केले.

गुरूमंदीराच्या वेशीवर सद्गुरू प. पू. श्री विजयकाका पोफळी महाराजांचे स्वागत करण्यात आले.सद्गुरुंचे सुवासिनींकडून औक्षण करण्यात आले.सौ गुरुमांयीचे स्वागत करण्यात येऊन प. पू. श्री पंडीत काकांना पादूका स्वरुपात आपल्या परातपर गुरुंच्या भेटीसाठी गाभाऱ्यात नेण्यात आले . आज प. पू. श्री विजयकांकानी शुंखला प्रवचन पुढे नेत कथेत प . प. श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांनी रचलेला कर्मविपाक अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितला. जिवनात काय करावे व काय करू नये हे अनेक उदाहरण देऊन सांगितले.समारोपात मंदीराचे व्यवस्थापक प्रकाश काका घुडे असे म्हणाले की कर्ममार्ग इतका सोपा करून सांगणारे फारच कमी संत आहेत.हे फक्त श्री विजय काकाच सांगू शकतात ते आपल्याला समजेल अश्या भाषेत काकांनी आपल्याला सांगितले.आपण वारी कां करावी तर वारित प. पू. सद्गुरूंकडून अनेक शकांची निरसन आपोआप होते.सद्गुरुंचा निरोप घ्यायची वेळ सर्वच साधकवर्गांच्या डोळ्यात आसवांची दाटी झालेली असते प्रत्येक जण सद्गुरूंच्या चरणांवर नतमस्तक होऊन एकमेकांचा निरोप घेत असतो.पालखींच्या चार दिवसाच्या आठवणी मनी साठवत आठवणींचा पुजंका आपले सोबत घेत पुढील पालखीचा सोहळा केव्हा येईल याचे स्मरण करीत ‘आनंदाचे डोही आनंद तरंगे’ असे मणी गुंजत आपले स्वगृह जवळ करित झाले.

**संजय इंगळे ,**
अमरावती.

# वसंत...



निसर्गाने निर्माण केलेले ऋतुचक्र हे केवळ हवामानातील बदलांचे चक्र नसून, मानवी जीवनाला गहन आध्यात्मिक संदेश देणारी एक दिव्य व्यवस्था आहे. प्रत्येक ऋतू मनुष्याच्या अंत:करणातील एखाद्या अवस्थेचे प्रतीक आहे. त्यामध्ये वसंत ऋतू हा आत्मिक उन्नती, चैतन्य आणि नवचैतन्याचा ऋतू मानला जातो. म्हणूनच वसंत ऋतूला ‘ऋतूंचा राजा’ असे संबोधले जाते.

वसंत ऋतू म्हणजे पानगळ आणि बहर यांचा संगम. आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर पानगळ म्हणजे जुने संस्कार, दोष, अहंकार आणि नकारात्मक वृत्ती यांचे गळून पडणे; तर बहर म्हणजे शुद्ध भाव, सात्त्विक विचार आणि ईश्वरप्राप्तीची ओढ यांचे उमलणे. कडाक्याच्या थंडीप्रमाणेच मानवी जीवनातही कधी कधी जडत्व, निरुत्साह आणि अज्ञानाची अवस्था येते. त्या अवस्थेतून बाहेर काढणारी सूर्याची कोवळी ऊब म्हणजे ईश्वरकृपा. ही कृपा प्राप्त होताच अंतर्मनात नवचैतन्य निर्माण होते.

वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटते, आंब्याला मोहर येतो, फुलांवर भोवऱ्यांचे गुंजन सुरू होते. ही सर्व दृश्ये बाह्य असली, तरी त्यांचा सूक्ष्म अर्थ अंतर्मनाशी जोडलेला आहे. पालवी म्हणजे साधकाच्या मनात उगवणारे सद्विचार, मोहर म्हणजे भक्तीभावाची सुरुवात, तर भोवऱ्यांचे गुंजन म्हणजे नामस्मरणातून निर्माण होणारी चैतन्यलहरी. कोकिळेचा मधुर स्वर हा आत्म्यातून उमटणाऱ्या आनंदाचा प्रतिध्वनी आहे.

वसंत ऋतूत येणारी वसंत पंचमी म्हणजे ज्ञानज्योतीचा आध्यात्मिक उत्सव वसंत ऋतूची सुरुवात वसंत पंचमी या पवित्र दिवशी होते. हा दिवस केवळ एक सण नसून, आत्मज्ञानाच्या जागृतीचा दिवस आहे. या दिवशी सरस्वती देवीची उपासना केली जाते. सरस्वती म्हणजे शुद्ध ज्ञान, विवेकबुद्धी आणि चैतन्यस्वरूप शक्ती. साधकासाठी खरे ज्ञान म्हणजे केवळ पुस्तकी विद्या नव्हे, तर आत्मा आणि परमात्म्याची ओळख होणे.

वसंत पंचमीला पिवळ्या रंगाला विशेष महत्त्व आहे. आध्यात्मिक दृष्टिकोनातून पिवळा रंग म्हणजे सत्त्वगुण, प्रसन्नता आणि ज्ञानप्रकाश. जसा पिवळा रंग अंधार नाहीसा करतो, तसाच ज्ञानप्रकाश अज्ञान, अहंकार आणि भ्रम दूर करतो. म्हणूनच या दिवशी साधकांनी ज्ञानप्राप्तीसाठी, सद्बुद्धीसाठी आणि अंतःकरणशुद्धीसाठी प्रार्थना करणे अपेक्षित आहे.

भगवान श्रीकृष्णांनी ‘ऋतूंमध्ये मी वसंत आहे’ असे सांगून वसंत ऋतूचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित केले आहे. वसंत ऋतू आपल्याला सांगतो...

जीवनातील जडत्व, निराशा आणि अज्ञान दूर करून भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा स्वीकार करा.जसा निसर्ग दरवर्षी नव्याने बहरतो, तसाच साधकानेही दररोज स्वतःला अंतर्मुख करून आत्मिक उन्नतीचा संकल्प करावा. साक्षीभाव ठेवून जीवनातील प्रत्येक प्रसंग पाहिला, तर अंतर्मनात कायमचा वसंत नांदू लागतो.

जिथे अंतःकरण शुद्ध आहे, जिथे ईश्वरस्मरण आहे, तिथेच खरा वसंत आहे.

**रमा देशमुख,**
नागपूर

मनपा सत्तेसाठी महासंग्राम!

# अकोल्यात अफवांचे वादळ, राजकीय घुसळण टोकाला

## बहुमताचा जादुई आकडा गाठण्यासाठी भाजप-काँग्रेसची धडपड

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी उद्या महापौर पदाचे आरक्षण जाहीर होणार असतानाच अकोला महानगरपालिकेतील सत्ता संघर्ष अक्षरशः उफाळून आला आहे. मनपावर सत्ता मिळवण्यासाठी बहुमताचा जादुई आकडा ४१ गाठण्याच्या चढाओढीत भाजप आणि काँग्रेसकडून जोरदार राजकीय हालचाली सुरू असून, त्याचवेळी अफवांचा बाजारही चांगलाच तापला आहे. कोणत्या पक्षाचे नगरसेवक कुणाच्या गोटात गेले, कोण नॉट रिचेबल झाले, कोणाची सौदेबाजी सुरू आहे; अशा नानाविध चर्चांनी अकोल्याचे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.*



१६ जानेवारी रोजी अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. या निकालात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. ३८ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी सत्ता स्थापनेसाठी आवश्यक असलेला बहुमताचा आकडा गाठण्यात भाजप अपयशी ठरला. त्यामुळे निकाल लागल्यानंतर अवघ्या काही तासांतच राजकीय गणिते मांडली जाऊ लागली आणि मनपातील सत्ता संघर्षाला तोंड फुटले.

### ●उबाठा सेनेभोवती अफवांचा घेराव

या सत्ता संघर्षात सोमवारी मोठा राजकीय भूकंप झाला. उबाठा सेनेचे सहाही नगरसेवक अचानक नॉट रिचेबल झाल्याच्या अफवेने एकच खळबळ उडाली. 'हे नगरसेवक भाजपच्या गळाला लागले' अशी अफवा काही वेळातच शहरभर पसरली. यामुळे राजकीय वर्तुळात संशयाचे वातावरण निर्माण झाले. एवढ्यावरच न थांबता, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपसोबत सत्ता स्थापन करणार असल्याच्या अफवांनीही जोर धरला. मात्र मंगळवारी उबाठा सेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी थेट पक्ष कार्यालयात सर्व सहाही नगरसेवकांना हजर करून या सर्व अफवांना पूर्णविराम दिला. 'उबाठा सेनेचा एकही नगरसेवक भाजपसोबत गेलेला नाही. सर्वजण पक्षासोबत ठाम आहेत,' असा स्पष्ट संदेश देत त्यांनी राजकीय वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

बहुमतासाठी भाजपकडून मोठ्या प्रमाणात जुळवाजुळव सुरू असल्याची चर्चा आहे. अपक्ष नगरसेवकांसह छोट्या पक्षांवर भाजपची नजर असून, सत्ता स्थापनेसाठी सर्व पर्याय खुले ठेवण्यात आले आहेत. दुसरीकडे काँग्रेसनेही मैदानात उडी घेत भाजपविरोधी आघाडी उभारण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी स्वतः सूत्रे हाती घेत सत्ता स्थापनेसाठी व्यूहरचना आखली आहे. भाजपविरोधी सर्व पक्ष, अपक्ष नगरसेवक यांची मोट बांधण्याचे प्रयत्न सुरू असून, स्वपक्षातील नगरसेवकांना एकत्र ठेवण्याचे मोठे आव्हान काँग्रेससमोर उभे ठाकले आहे.

या सत्तासंघर्षाला आणखी रंगत आणणारी बाब म्हणजे भाजपमधीलच एक गट छुप्या पद्धतीने काँग्रेसला मदत करत असल्याची जोरदार चर्चा. ही मदत नेमकी कुणाकडून आणि कशा स्वरूपात सुरू आहे, याबाबत स्पष्टता नसली तरी या अफवांमुळे भाजपच्या गोटातही अस्वस्थता वाढली आहे. परिणामी, अकोल्यातील राजकारण सध्या पूर्णतः अनिश्चिततेच्या गर्तेत अडकले आहे. गुप्त बैठका, बंद दाराआड चर्चा, नगरसेवकांचे फोन बंद, अचानक भेटीगाठी—या साऱ्यांमुळे अकोल्यातील सत्ता संघर्ष निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. येत्या दोन दिवसांत मनपावर सत्ता कोण प्रस्थापित करणार, याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. शहरातील प्रत्येक राजकीय हालचालीकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे

### महापौर आरक्षणावर साऱ्यांचे डोळे

उद्या महापौर पदाचे आरक्षण जाहीर होताच अकोल्याच्या राजकारणात मोठे वादळ उठणार, हे निश्चित मानले जात आहे. आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी खुले होते, यावरच सर्व राजकीय पक्ष आपली पुढील रणनीती ठरवणार आहेत. त्यामुळे सध्या भाजप, काँग्रेससह सर्वच पक्ष 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असून, महापौर पदाच्या आरक्षणाकडेच संपूर्ण राजकीय लक्ष केंद्रित झाले आहे.

### असे आहे पक्षीय बलाबल

| | |
|---|---|
| भाजप | : ३८ |
| काँग्रेस | : २१ |
| उबाठा | : ०६ |
| वंचित | : ०५ |
| शरद पवार राष्ट्रवादी | : ०३ |
| एमआयएम | : ०३ |
| शिंदेसेना | : ०१ |
| अजित पवार राष्ट्रवादी | : ०१ |
| अकोला विकास समिती | : ०१ |
| मनसे | : ०० |
| अपक्ष | : ०१ |

ऑपरेशन मुस्कानचा मोठा ब्रेकथ्रू: खदान पोलिसांची कामगिरी

# तब्बल आठ वर्षांनंतर बेपत्ता मुलगा हिमाचलमध्ये सापडला



■ प्रतिनिधी | अकोला ■

खदान पोलीस स्टेशनमध्ये सन २०१८ पासून नोंद असलेल्या एका बेपत्ता मुलाचा तब्बल आठ वर्षांनंतर शोध लागल्याने कुटुंबासह पोलिस प्रशासनालाही मोठा दिलासा मिळाला आहे. हिमाचल प्रदेशातील शिमला जिल्ह्यातील रामपूर ज्युरी येथे हा मुलगा सुरक्षित आढळून आला असून, त्याला त्याच्या वडिलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अकोला यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत करण्यात आली असून यामुळे ऑपरेशन मुस्कानला मोठा ब्रेक थ्रू मिळाल्याची प्रतिक्रिया सामान्य नागरिकांकडून उमटत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दिनांक ६ सप्टेंबर २०१८ रोजी फिर्यादी सुधाकर रामकृष्ण बोदडे (वय ४०), रा. तुळजाभवानी कटलरीवर, बुद्ध विहाराजवळ, खडकी, अकोला यांनी पोलीस स्टेशन खदान येथे तक्रार दिली होती. त्यांच्या पत्नी सौ. वैशाली सुधाकर बोदळे (वय ३०) या दोन अल्पवयीन मुलं यश (वय १४) व जय (वय १२) यांना घेऊन घरातून निघून गेल्याची नोंद तक्रारीत करण्यात आली होती. या तक्रारीवरून मिसिंग क्रमांक ६४/२०१८ अन्वये बेपत्ता व्यक्तींची नोंद करण्यात आली होती.

दरम्यान, पोलीस अधीक्षक अकोला अर्चित चांडक (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ऑपरेशन मुस्कान अंतर्गत, खदान पोलीस स्टेशन व डी.बी. पथकातील अधिकारी व अंमलदारांना जुन्या बेपत्ता प्रकरणांचा सखोल तपास करण्याचे आदेश देण्यात आले होते. याच अनुषंगाने तांत्रिक माहिती, जुन्या नोंदी व गोपनीय सूत्रांच्या आधारे तपास सुरू ठेवण्यात आला. तपासादरम्यान मिळालेल्या ठोस माहितीनुसार, बेपत्ता मुलगा जय सुधाकर बोदळे (सध्याचे वय १९ वर्ष) हा हिमाचल प्रदेश राज्यातील शिमला जिल्ह्यातील रामपूर ज्युरी येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तेथील स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने जयचा शोध घेण्यात आला. आवश्यक खातरजमा व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, सदर मुलास त्याचे वडील सुधाकर बोदडे यांच्या ताब्यात सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आले.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, खदान ठाण्याचे पोलिस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली तर प्रत्यक्ष तपासाची जबाबदारी महिला ए.एस.आय. आशा आठे, मपोहवा विद्या बांगर, पोहवा संतोष गावंडे, पोहवा अमर पवार, पो.कॉ. मंगेश खेडकर, पो.कॉ. खनील वानखडे व पो.कॉ. संजय शिरसाट यांनी पार पाडली. तब्बल आठ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर बेपत्ता मुलगा सापडल्याने बोदडे कुटुंबीयांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले तर ऑपरेशन मुस्कान अंतर्गत पोलिसांनी दाखविलेली चिकाटी, संवेदनशीलता व सातत्यपूर्ण तपासामुळे पुन्हा एकदा हरवलेले नाते जुळले आहे.

# राज्यस्तरीय बॉक्सिंग व शूटिंगबॉल स्पर्धांचा मूर्तिजापूरात जल्लोषात शुभारंभ

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

तालुक्याच्या क्रीडा इतिहासात मानाचा शिरपेच ठरणाऱ्या राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग व शूटिंगबॉल क्रीडा स्पर्धांचा मंगळवारी मूर्तिजापूर येथे दणक्यात शुभारंभ झाला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धा १९ वर्षांखालील मुले व मुलींसाठी असून २० ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत तालुका क्रीडा संकुल, मूर्तिजापूर येथे होत आहेत.

स्पर्धांचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मूर्तिजापूर मतदारसंघाचे आमदार हरीश पिंपळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपविभागीय अधिकारी संदीप अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, जिल्हा शूटिंगबॉल असोसिएशनचे सचिव मोहम्मद साकिब, नगरसेवक भारत जेठवानी व उद्योजक प्रशांत हजारी उपस्थित होते.



उद्घाटनप्रसंगी राष्ट्रीय सुवर्णपदक विजेती भक्ती चुंगडे हिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच क्रीडा प्रबोधिनीची बॉक्सिंग खेळाडू समीक्षा सोळंके हिने दमदार खेळ करत विजयी सलामी दिली. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी व आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग प्रशिक्षक डॉ. सतीशचंद्र भट्ट यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश टाले यांनी केले. उद्घाटनावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना म्हणाल्या, 'तालुक्याच्या ठिकाणी अशा भव्य राज्यस्तरीय स्पर्धा होणे ही अभिमानाची बाब आहे. मूर्तिजापूर भविष्यात आणखी मोठ्या क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनेल.'

अध्यक्षीय भाषणात आमदार हरीश पिंपळे यांनी, 'माझ्या मतदारसंघात क्रीडा स्पर्धांसाठी निधीची कधीही कमतरता भासू देणार नाही,' अशी ठाम ग्वाही दिली.

या स्पर्धांमध्ये अकोला, अमरावती, नागपूर, नाशिक, लातूर, कोल्हापूर, पुणे, मुंबई व छत्रपती संभाजीनगर विभागांतील ५६० हून अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.


**Change In Name**

I Have Change
My Name From
**PRAMOD SHALIKRAMJI GONDCHAR**
--TO--
**PRAMOD SHALIKRAM GONDCHAR**
PASSPORT NO :-
G6767836 My
Residential Address is :-
Kisan Mechanical
Centre, Near Police
Station Akola Road,
Akot 444101

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०/२०२६ — प्रोसेस नं.४४०/२०२६
चौ.ता. २६/०२/२०२६ — दिनांक : ०८/०१/२०२६

**अर्जदार :** १. नरेंद्र सुभेदार उर्फ सुबेदारसिंह ठाकुर रा. रमाबाई आंबेडकर नगर, पोस्ट ऑफिस बिल्डिंग, महादेवी, ए - २ / २०४, शांतीसागर, पोलिस को-ऑप हौ. सो. घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०००७५ २. महेंद्रसिंग सुभेदारसिंग उर्फ सुबेदारसिंह ठाकुर रा. हरिहर पेठ, जयरासिंग प्लॉट, गाडगे बाबा पुतळा समोर, जुने शहर, ता. जि. अकोला. ३. संतोषसिंग सुभेदारसिंग उर्फ सुबेदारसिंह ठाकुर रा. गाडगे बाबा पुतळ्यासमोर, जय राम सिंग प्लॉट, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ४. मंगला श्यामसिंह ठाकुर रा. हनुमान आखाडा, अनिकट, अकोला. ५. मंजु सुभेदार सिंग उर्फ उर्फ सुबेदारसिंह ठाकुर रा. ए-३/२०४, शांतीसागर, पोलिस को ऑप हौ. सो. रमाबाई नगर, पंत नगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०००७५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. कमलाबाई सुभेदारसिंग उर्फ सुबेदारसिंह ठाकुर २. सुभेदारसिंग उर्फ सुबेदारसिंह बिपतसिंह ठाकुर
**पत्ता :-** रा. गाडगे बाबा पुतळ्यासमोर, जय राम सिंग प्लॉट, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनिय १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कमलाबाई सुभेदारसिंग उर्फ सुबेदारसिंह ठाकुर यांचे दि. १२/१०/२०२१ रोजी मालविया . हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत सुभेदारसिंग उर्फ सुबेदारसिंह बिपतसिंह ठाकुर यांचे दि. १३/०३/२०१७ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर सूचना

Ref. No. 01/2026 — Date: 20/01/2026

सर्वत्र लोकांना सुचविण्यात येते की आमचे पक्षाकरांनी श्री. तुषार दिलीपराव देशमुख, रा. रणपिसे नगर अकोला ह्यांच्या मालकीची व ताब्यातील शासकीय रेकॉर्ड मध्ये त्यांचे नावाची नोंद असलेले 'पुष्पराज रेसिडन्सी', या इमारती मधील तिसऱ्या मजल्यावर असलेला फ्लॅट नं. ३०३ त्यांच्याशी विकत घेण्याचा सौदा कायम केलेला आहे.

**स्थावर फ्लॅटचे वर्णन :-**

मौजे मलकापुर प्र. ता. जि. र.स.डी. र.डी. अकोला. ग्राम पंचयात मलकापुर, च्या हद्दीतील भुमापन क्र. ५९/२, मा. एस.डी.ओ. साहेब, अकोला यांचे फाईल वरील रे.के.नं. एनएपी-३४/उमरी प्र.अकोला/६५/८६-८७ मधील आदेश दिनांक ०४/०३/१९८७ नुसार मंजूर झालेल्या लेआऊट नकाशातील लेआऊट प्लॉट नं. २- बी असून ज्याचे एकूण क्षेत्रफळ १६३.८३ चौ. मी (१७६३ चौ. फूट) या जमिनी वर निवासी इमारत 'पुष्पराज रेसिडन्सी' या नावाने बांधलेल्या इमारती मधील तिसऱ्या मजल्यावर फ्लॅट क्र. ३०३ ज्याचे क्षेत्रफळ ३०.९९ चौ. मि.(बिल्टअप एरिया) व ४१.३२ चौ. मि. (सुपर बिल्टअप एरिया) ज्यास चतुःसीमा - पूर्वेस - कॉमन पॅसेज पश्चिमेस - लेआऊट रास्ता उत्तरेस - फ्लॅट नं. ३०२ दक्षिणेस - प्लॉट नं १ ए.

तरी वर नमूद फ्लॅट बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहान बोजा, करार, बक्षीस, खेरेदी, हक्क किंवा इतर कोणत्याही प्रकारचा उजर असल्यास त्यांनी माझ्या कडे सर्व संबंधित लेखी कागद पत्रांसाह ७ (सात) दिवसांचे आत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे पक्षकार खरेदी करून घेतील. नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालनार नाही ह्याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**Adv. RUSHIKESH M. KHATRI**
Mob. 8668743509
Shrawagi Plot, Near Lic Office, Akola.

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५/२०२६ — प्रोसेस नं.५४७/२०२६
चौ.ता. ०२/०३/२०२६ — दिनांक : १२/०१/२०२६

**अर्जदार :** १. प्रविण कांतीलाल मकवाना रा. पाण्याच्या टाकीजवळ, शाहू नगर, हरिहरपेठ, ता. जि. अकोला. २. महेंद्र कांतीलाल मकवाना रा. कृष्णा नगर २, व्हीटीसी बोरसड, पो. बोरसड, उप जिल्हा बोरसड, जि. आनंद, राज्य गुजरात ३८८५४० ३. वर्षा भाविक गोहेल रा. बी २०२, स्वामी समृद्धी सोसायटी, उंद्री वडचिवडी रोड, उंद्री व्हीटीसी पुणे सिटी, मोहमडाव, पुणे. ४११०६०

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कांतीलाल जमनादास मकवाना
**पत्ता :-** रा. पाण्याच्या टाकीजवळ, शाहू नगर, हरिहरपेठ, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कांतीलाल जमनादास मकवाना यांचे दि. २२/०४/२०१७ रोजी हरिहरपेठ, शाहू नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २७/२०२६ — प्रोसेस नं.४३५/२०२६
चौ.ता. २३/०२/२०२६ — दिनांक : ०८/०१/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती व्दारकाबाई भिमराव नवलकार २. पदमा साहेबराव नवलकार ३. सागर साहेबराव नवलकार ४. आकाश साहेबराव नवलकार सर्व रा. मु. जवळा बु (दोडकी), पो. कोळंबी, ता. जि. अकोला. ५. पुष्पा राहुल पांडे रा. काकडा, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : साहेबराव भिमराव नवलकार
**पत्ता :-** रा. मु. जवळा बु (दोडकी), पो. कोळंबी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत साहेबराव भिमराव नवलकार यांचे दि. ३१/०१/२०२५ रोजी जवळा बु ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७८८/२०२५ — प्रोसेस नं.५४०/२०२६
चौ.ता. १६/०२/२०२६ — दिनांक : १२/०१/२०२६

**अर्जदार :** १) पुरुषोत्तम गोकुलचंद खंडेलवाल २) प्रकाश गोकुलचंद खंडेलवाल क्र. १ व २ रा. हिंदु ज्ञानपीठ स्कूल, आदर्श कॉलनी, अकोला, ता. जि. अकोला. ३) सुभाष गोकुलचंद खंडेलवाल रा. फलॅट नं.८, दुसरा मजला, सुमन विला अपार्टमेंट, स्वावलंबी नगर, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला. ४. किरण योगेंद्र खंडेलवाल रा. ६९, छत्रपती नगर, एअरपोर्ट रोड, बिजसन रोड, इंदौर, ता. जि. इंदौर, मध्यप्रदेश ४५२००५ ५. शिला शामसुंदर खंडेलवाल रा. ३-९-५६२ अशोक रोड, आदिलाबाद, आंध्रपदेश ५०४००१ ६. अलका अनिल कुमार खंडेलवाल रा. वार्ड नं. ७, लाल बररा रोड, वारशिवणी, ता. वारशिवणी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गोकुलचंद नंदलाल खंडेलवाल
**पत्ता :-** रा. हिंदू ज्ञानपीठ, शाळेजवळ, आदर्श कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोकुलचंद नंदलाल खंडेलवाल यांचे दि.१८/०१/२००५ रोजी निधन झाले.

खासदार काळे म्हणाले, विदर्भातील कौंडण्यपूर हे श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या पावन कथेशी निगडित असलेले ऐतिहासिक तीर्थक्षेत्र आहे. मात्र प्रसिद्धीअभावी ते आजही मागे पडले आहे. त्याचप्रमाणे सेवाग्राम आश्रम जिथून महात्मा गांधी यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे नियोजन केले, या जागेचीही पुरेशी दखल घेतली जात नाही. या वारशाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे ही पत्रकारांचीही मोठी जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.बोर प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांना जंगलाबाहेर पुनर्वसित करण्यात आले. मात्र जेव्हा रोजगार, कंत्राटे, छोटी-मोठी कामे निघतात तेव्हा स्थानिकांना दूर ठेवले जाते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. आर्वी मतदारसंघात आतापर्यंत १०-११ नागरिक वाघांच्या हल्ल्यात, तर १-२ नागरिक अस्वलांच्या हल्ल्यात बळी पडले आहेत. अशा तणावपूर्ण प्रसंगी वनविभागाला स्थानिकांचीच मदत घ्यावी लागते आणि ती मदत स्थानिक मोठ्या मनाने करतात, पण रोजगाराच्या वेळी मात्र त्यांनाच वाऱ्यावर सोडले जाते, ही प्रशासनाची दुटप्पी भूमिका असल्याचे खासदार म्हणाले.वाघांच्या दहशतीमुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात पहारा देणे अशक्य झाले आहे. रात्री न गेल्यास रोही व रानडुक्कर पिके उद्ध्वस्त करतात. गेल्यास जीव धोक्यात अशा दुहेरी कात्रीत शेतकरी सापडला आहे. परिणामी सुपीक जमिनी पडीक पडत असून अनेकांनी शेती कसणेच बंद केले आहे. या प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने, ठोस आणि स्थानिकाभिमुख निर्णय घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भोयर (पालकमंत्री) होते. यावेळी सुमित वानखेडे (आर्वी विधानसभा आमदार), संजय गाते (भाजप जिल्हाध्यक्ष), सुधीर दिवे यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# आर्थ्रोप्लास्टी रोबोटिक नेव्हिगेशन कार्यशाळा

**वर्धा-** जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज (जेएनएमसी) येथील ऑर्थोपेडिक्स विभागाच्या वतीने नुकतेच लाईव्ह आर्थ्रोप्लास्टी रोबोटिक नेव्हिगेशन विषयावरील कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. आधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सांध्यांच्या बदलाच्या शस्त्रक्रियांमध्ये अधिक अचूकता, सुरक्षितता आणि दर्जा कसा साधता येतो, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक या कार्यशाळेत सादर करण्यात आले. या कार्यशाळेला डीएमआय एचईआर ग्लोबलचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. संदीप श्रीवास्तव, एव्हीबीआरएचचे डायरेक्टर डॉ. चंद्रशेखर महाकाळकर तसेच जेएनएमसीचे व्हाइस-डीन डॉ. वैभव अंजनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वैद्यकीय शिक्षण व रुग्णसेवेत होत असलेला प्रभाव अधोरेखित केला.डॉ. गजानन पिसुळकर आणि डॉ. सुहास लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण ऑर्थोपेडिक्स टीमच्या सहकार्याने प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये एक टोटल नी रिप्लेसमेंट (गुडघा बदल) आणि एक टोटल हिप रिप्लेसमेंट (कूल्हा बदल) अशा दोन शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. रोबोटिक नेव्हिगेशनच्या माध्यमातून शस्त्रक्रियेतील अचूकता वाढून रुग्णांना अधिक परिणामकारक उपचार देणे शक्य होते, हे या उपक्रमातून स्पष्ट झाले.कार्यशाळेत ७५ पदव्युत्तर विद्यार्थी, स्टाफ व एमबीबीएस विद्यार्थी सहभागी झाले होते. जॉइंट रिप्लेसमेंटमधील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या ज्ञानात आणि कौशल्यात भर पडली.

# ओजस राऊत यांचे घवघवीत यश

## ‘A’ ग्रेडसह वरिष्ठ पंचपदाची मानाची मोहर

**वर्धा/जनमाध्यम**



अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या (AICF) वतीने अहमदाबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या सीनिअर नॅशनल आर्बिटर (SNA) या प्रतिष्ठेच्या परीक्षेत ओजस संतोष राऊत यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. देशभरातील अनुभवी व नामांकित राष्ट्रीय बुद्धिबळ पंच सहभागी झालेल्या या परीक्षेत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत ७वा क्रमांक पटकावून ‘A’ ग्रेड प्राप्त केला. बुद्धिबळातील नियम, स्पर्धा संचालन, पंचांची जबाबदारी व निर्णयक्षमतेची सखोल चाचणी घेणारी ही परीक्षा अत्यंत कठीण मानली जाते. अशा उच्चस्तरीय परीक्षेत यश मिळवत ओजस राऊत यांनी आपली गुणवत्ता व कौशल्य सिद्ध केले आहे.सीनिअर नॅशनल आर्बिटर (SNA) ही भारतातील बुद्धिबळ पंचांसाठी मानाची व वरिष्ठ पदवी असून, या यशामुळे ओजस राऊत यांना भविष्यात राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या बुद्धिबळ स्पर्धांमध्ये मुख्य पंच अथवा वरिष्ठ पंच म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल बुद्धिबळ क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नम्रतेच्या सुगंधात फुलली श्रीरामकथा, भक्तिभावाने दुमदुमला तरोडा

**वर्धा/जनमाध्यम**

नम्रता हीच खऱ्या भक्तीची ओळख असून, नम्र राहणारा मनुष्यच जीवनात सुख व शांती अनुभवू शकतो, असे भावस्पर्शी मार्गदर्शन ह.भ.प. सुरेश महाराज बाकडे यांनी केले. तरोडा येथे सुरू असलेल्या श्रीराम कथेत ‘पुष्पगुंफण’ व कथावाचनाच्या प्रसंगी ते बोलत होते.

संत केजाजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित श्रीराम कथेत बोलताना बाकडे महाराज म्हणाले की, ज्ञानाचा अभिमान बाळगू नये, तर सतत ज्ञानवृद्धीचा ध्यास ठेवावा. दुसऱ्याचे ऐकण्याची वृत्ती ठेवल्यास व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. देवपूजा ही केवळ कर्मकांड न राहता भावपूर्ण व



सात्त्विक असली पाहिजे. पावित्र्य आणि श्रद्धा जपली गेली, तरच ईश्वरप्राप्ती शक्य होते, असे त्यांनी स्पष्ट केले.अलीकडच्या काळात संस्कृती व संस्कारांचे मूल्य कमी होत असल्याची खंत व्यक्त करत, भारतीय संस्कृतीचे जतन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भारत देश २१व्या शतकात जागतिक महासत्ता म्हणून पुढे येत असून, भारत माता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भूमीचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी आवाहन केले.दान देताना अभिमान न बाळगता, सत्पात्री व निस्वार्थ दान करावे. न मागता दिलेले दान हेच खरे दान असून, त्यातून धनाची तसेच मनाची शुद्धता वाढते, असे सांगत समाजोपयोगी कार्य करण्याचा मोलाचा संदेश त्यांनी दिला. विविध दृष्टांत व उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी श्रीराम कथेचे रसाळ विवेचन करत उपस्थित भक्तांना मंत्रमुग्ध केले. या कथेला तरोडा व पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली असून, संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

# डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेच्या वर्धा जिल्हाध्यक्षपदी प्रा.गिरीश काळे यांची निवड

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत प्रा. गिरीश काळे यांची डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद यांच्या वर्धा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा यवतमाळचे गटशिक्षणाधिकारी पप्पू पाटील भोयर, प्रदेश महासचिव सतीश काळे आणि नागपूर विभागीय अध्यक्ष राजेंद्र भोयर यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नियुक्ती स्वीकारताना प्रा. गिरीश काळे यांनी संपूर्ण राज्य कार्यकारिणीचे आभार मानले. शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय देत संघटन अधिक बळकट करण्यासाठी तसेच शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, मूल्ये व नवोपक्रम यांना प्राधान्य देण्याचा संकल्प त्यांनी



व्यक्त केला. लवकरच वर्धा जिल्ह्याची कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.प्रा. गिरीश काळे हे वर्धा जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष असून उपक्रमशील व अभ्यासू शिक्षक म्हणून त्यांची जिल्हा व राज्यात ओळख आहे. नुकतीच त्यांची राज्यस्तरावर ‘आयडॉल शिक्षक’ म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे संस्थापक राज्याध्यक्ष प्रा. सुनील डिसले (बारामती), कार्याध्यक्षा डॉ. मनीषा रिठे (हिंगणघाट), राज्य समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे (जालना), नागपूर जिल्हाध्यक्ष प्रा. सुरेश नखाते, कार्याध्यक्ष सपन नेहरोत्रा, सचिव संजय तिजारे, भंडारा जिल्हाध्यक्ष प्रा. विनोद हटवार, वर्धा जिल्हा सचिव कुंडलिक राठोड, कोषाध्यक्ष शैलेश निकोसे, मनोज मोहता आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# एक दिवस परिवारासाठी’ उपक्रमातून दाते परिवार स्नेहमिलन उत्साहात

**वर्धा/जनमाध्यम**

कुटुंबातील एकोपा आणि परस्पर स्नेहातूनच व्यक्ती व समाजाचा सर्वांगीण विकास घडतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक मोरेश्वर दाते यांनी केले. ते दाते सभागृह येथे आयोजित दाते परिवार स्नेहमिलन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ‘एक दिवस परिवारासाठी’ या अभिनव संकल्पनेतून साकारलेला हा स्नेहमेळावा दाते परिवारासाठी संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व कुलस्वामिनी माता भवानी, राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.



मराठी लोकसाहित्य परंपरेतील भारूड सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आली. परिवारातील ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार, कर्तृत्ववान तरुण-तरुणींचा गौरव तसेच बालकांसाठी उपक्रम यामुळे सोहळ्याला वेगळीच उंची लाभली.अध्यक्षीय भाषणात मोरेश्वर दाते यांनी अहंभाव समाजाच्या अधःपतनास कारणीभूत ठरतो, असे नमूद करत कुटुंबातील ऐक्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी प्रदीप दाते यांनी मनोगत व्यक्त करत दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.शैक्षणिक, कृषी व उद्योग क्षेत्रातील विशेष यशाबद्दल अनेक सदस्यांचा सन्मान करण्यात आला. पुढील वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सपना दाते यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. प्रफुल्ल दाते यांनी केले. वृक्षारोपणाने कार्यक्रमाची सांगता झाली. तीनशेहून अधिक सदस्यांच्या उपस्थितीत पार पडलेला हा स्नेहमेळावा दाते परिवाराच्या एकतेचे प्रतीक ठरला.

## वृत्तपत्र विक्रेत्यांचा किल्ला मजबूत

# वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाची नवी कार्यकारिणी जाहीर



**वर्धा/जनमाध्यम**

वृत्तपत्र विक्रेत्यांच्या हक्कांसाठी आक्रमक भूमिका घेणाऱ्या वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघ या राज्यातील अग्रगण्य संघटनेची त्रैवार्षिक निवडणूक दणक्यात पार पडली.

स्थानिक ऑक्सिजन पार्क येथे झालेल्या निवडणुकीत बहुमताने नवी कार्यकारिणी निवडून आली असून, संघटनेच्या नेतृत्वात नव्या जोशाचे पर्व सुरू झाले आहे.अध्यक्षपदी सुनिल पाटणकर यांची निवड झाली असून उपाध्यक्ष म्हणून सुधीर मुंजेवार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संघटनेचे सचिवपद गजानन मसने यांच्याकडे देण्यात आले असून सहसचिव म्हणून सतीश सहारे यांची निवड झाली आहे. कोषाध्यक्षपदी अजय डोंगरे तर सहकोषाध्यक्षपदी प्रमोद तामगाडगे यांची निवड करण्यात आली.कार्यकारिणी सदस्य म्हणून मोहन मसने, संजय देवगिरकर, हर्षवर्धन नाखले, प्रशांत नितनवरे आणि अनिल सोनटक्के यांची निवड झाली आहे.

या निवडणुकीचे कामकाज निवडणूक अधिकारी जयंत सबाने आणि पंकज वंजारे यांनी पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाहिले.नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांचे प्रश्न, कमिशन, सवलती व कल्याणकारी योजनांसाठी संघटना अधिक आक्रमकपणे लढा देईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यास सुरुवात

## जिल्ह्यातील ३८३ गावांचा समावेश, शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील निवड झालेल्या ३८३ गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने ऑनलाईन नोंदणी व अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यात विविध घटकांसाठी शेतकऱ्यांना शासनाकडून अर्थसहाय्य व अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार आहे.प्रकल्पांतर्गत सिंचन सुविधेसाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच, विहीर पुनर्भरण आणि पाईप व पंप संच, फलोत्पादन व वृक्ष लागवड घटकांतर्गत फळबाग लागवड, बांबू लागवड आणि वानिकी आधारीत वृक्ष लागवड, शेततळे बाबींतर्गत वैयक्तिक शेततळे आणि शेततळे अस्तरीकरण, संरक्षित शेती बाबीकरीता शेडनेट हाऊस व हरितगृहामधील लागवड साहित्य, सेंद्रीय शेती व पुरक व्यवसाय बाबीकरीता गांडूळ खत व नाडेप युनिट, रेशीम उद्योग, गोड्या पाण्यातील मत्स्यपालन. पशुपालन बाबीकरीता प्रामुख्याने भूमीहीन कुटूंबे, विधवा, परितत्त्या व घटस्फोटीत महिलांसाठी शेळीपालन व इतर बाबीमध्ये बिजोत्पादन कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य व अनुदान देण्यात येणार आहे.इच्छुक पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन किंवा पोकराच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी. जिल्ह्यातील निवडक गावातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, महिला शेतकरी आणि अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, तांत्रिक अडचण असल्यास संबंधित गावचे समूह सहाय्यक, सहाय्यक कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

## जाहीर सूचना

माझे पती आतिश अरुणराव देवगिरकर यांचे दिनांक १०/९/२०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दोन चाकी १)वाहन क्रं. MH32 S7771 चेचीस नंबर MD2DHDHZZTCB15949 इंजिन नंबर DHGBTB03982
२)वाहन क्र. MH32K7771 चेचीस नंबर 06E09C61915 इंजिन नंबर 06E08M58881 हा आहे. माझे नाव:- निशा आतिश देवगिरकर ,वय:- ३२,(नाते पत्नी ) पत्ता:- रुक्मिणी नगर पोद्दार लेआऊट सिंदी (मेघे) वर्धा, हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझ्या कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**श्रीमती निशा आतिश देवगिरकर**
**रुक्मिणी नगर पोद्दार लेआउट सिंदी (मेघे) वर्धा.**
**मो.क्र.८८०५८२६५०९**

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर U3346285 वरील माझे UZAIR KHAN AZHARULLA KHAN असे नाव होते. माझ्या आधार व जन्म प्रमाण पत्रावरील UZAIR AZHARULLA KHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- महादेवपुरा वर्धा ४४२००१**

## नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर B०४९५०३६ वरील माझे SHAIKH IRFAN SHAIKH IQBAL असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील IRFAN IQBAL SHAIKH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : झाकीर हुसैन कॉलनी वर्धा ४४२००१**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ५७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ढगफुटी सदृश्य पावसामुळे बाधित कुटुंबांना मदतीचा हात

**शिराळा-**नजिकच्या ब्राह्मणवाडा भगत येथे ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसामुळे गावातील तब्बल ४० कुटुंब बाधित झाली होती. या आपत्तीग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी सरपंच व ग्रामस्थांनी तहसीलदार साहेबांकडे मदतीची धाव घेतली.सन्माननीय माजी मंत्री अँड यशोमती ठाकूर यांच्या सहकार्याने तसेच गावचे सरपंच मा. शंतनू विवेकराव निचित यांच्या विशेष पुढाकारातून सन्माननीय तहसीलदार विजय लोखंडे साहेब यांनी तत्काळ दखल घेत बाधित कुटुंबांच्या खात्यात आर्थिक मदत जमा करून दिली.या तात्काळ मदतीमुळे बाधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून संपूर्ण ब्राह्मणवाडा भगत ग्रामस्थांच्या वतीने सन्माननीय माजी मंत्री अँड यशोमतीताई ठाकूर, तहसीलदार साहेब विजयजी लोखंडे व सरपंच शंतनू विवेकराव निचित यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. माजी मंत्री अँड यशोमती ठाकुर संकटात धावून येणाऱ्या नेतृत्वाला सलाम! ब्राह्मणवाडा भगत येथील ग्रामस्थांनी केला.

### इंद्रायणी कॉलनीत 'श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ'

**अमरावती-**इंद्रायणी कॉलनी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थानच्या



वतीने शहरात प्रथमच भव्य 'श्री विठ्ठल कथा ज्ञानयज्ञ' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा २२ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार असून, विठ्ठल भक्तांसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे.या ज्ञानयज्ञाचे प्रवक्ते म्हणून श्री.ह.भ.प. कैलाशचंद्र चांदूरकर महाराज (रा. साऊर, अमरावती) आपल्या मधूर वाणीतून विठ्ठल कथेचे निरुपण करणार आहेत. सोहळ्याची सुरुवात २२ जानेवारी रोजी सकाळी काकडा आरती, कलश पूजन आणि दुपारी कलश यात्रेने होईल. २३ ते २८ जानेवारी दरम्यान दररोज पहाटे ६ वाजता काकडा आरती, दुपारी १ ते ५ या वेळेत मुख्य विठ्ठल कथा आणि सायंकाळी ७ वाजता हरिपाठ होईल.२९ जानेवारी रोजी ग्रंथांचे पूजन, व्यासपूजन व सत्कार सोहळा आयोजित केला असून, दुपारी ४ वाजता भव्य दिंडी (ग्राम प्रदक्षिणा) काढण्यात येईल. या सोहळ्याची सांगता ३० जानेवारी रोजी सकाळी होम-हवन आणि काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने सर्व भाविकांनी या मंगलमय प्रसंगी उपस्थित राहून कथेचा लाभ घ्यावा आणि तन-मन-धनाने सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डवरगाव शेतशिवारात बिबट्याने केली गायीसह कुत्र्याची शिकार

**वरूड-**तालुक्यातील डवरगाव लगत सैदापुर मौजा मध्ये डेहणकर यांच्या शेतातील गाय आणि एका कुत्र्याची बिबट्याने शिकार केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे शेतकरी शेतमजुरामध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे. तालुक्यातील डवरगांव शेतशिवारतिल मौजा सैदापुर येथे विठ्ठल डेहणकर यांचे शेत आहे. शेतात गायी सह पाळीव जनावरे असतात.पूर्वी बिबट्याने शिकार करून गायीला आणि एका कुत्र्याला सुद्धा ठार केल्याची घटना उघडकीस आली सदर बिबट्याच्या हैदोसामुळे शेतकरी शेतमजूर धास्तावले असून गहू चणा तसेच संत्रा आंबिया फोडण्यासाठी बहार पाणी ओलीत करावे लागते. यातच रात्रीच्या वीजपुरवठामुळे रात्री अपरात्री शेतात ओलितासाठी जावे लागते. या घटनेमुळे दिवसा रात्री शेतकरी शेती पिकाला ओलीत करण्यास जाणे येणे बंद केले. यामुळे शेतिपिकाचे नुकसान होत आहे. तर दिवसा सुद्धा शेतमजूर कामावर येत नसल्याने शेती कामं रखडले. वनविभागाने घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच शेतकरी शेतमजुरांना रात्री दिवसा शेतात जाताना एकटे जाऊ नका असे आवाहन केले.

## वऱ्हा येथे महाशिवपुराण कथा सप्ताह



**कुऱ्हा** -तिवसा तालुक्यातील वऱ्हा येथील महान कर्मयोगी समर्थ सदगुरु श्री. संत मारोती महाराज उर्फ घंटीवाले बाबा यांचा पुण्यतिथी महोत्सव सन ला दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २१ जानेवारी ते २८ जानेवारी पर्यंत विविध कार्यक्रम धार्मिक कार्यक्रमाने होईल.या महोत्सव पर्वावर महाशिव पुराण कथा सप्ताह माघ शु ३ बुधवार २१ ते २८ जानेवारी पर्यंत कथाचार्य हभप दिनेश महाराज आळंदीकर दुपारी २ ते ५ पर्यंत त्यांच्या अमृतवाणीतून होणार आहे. तसेच विविध धार्मिक कार्यक्रम दि.२१ जानेवारी २०२६ ला सकाळी ८ वा.तिर्थस्थापना व आरती, स ९ वा. श्री. मारोती महाराजांच्या चरित्र गंगा पारायण, दुपारी २ ते ५ महाशिवपुराण कथा, संध्या ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० श्री संत मारोती महाराज महिला भजन मंडळ वऱ्हा, दि. २२ जानेवारी ला सायं.६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ कन्हा, दि. २३ जानेवारी २६ ला सा ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० भवानी महिला भजन मंडळ वऱ्हा दि. २४ जानेवारी ला सायं. ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० श्री अवधुत भजनी मंडळ वऱ्हा, दि.२५ जानेवारी ला सायं.६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० गुरु माऊली महिला भजन मंडळ वऱ्हा, (चंद्रनगर), दि. २६ जानेवारी ला सायं. ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० निर्गुणी भजन मंडळ वऱ्हा दि.२७ जानेवारी ला सायं. ६ वा. श्री' च्या पालखीची मिरवणूक नगरीतून, रात्री ८ ते १० शिव भोले गाणे मंडळ वऱ्हा, दि.२८ जानेवारी ला दुपारी १२ वा. काल्याचे किर्तन हभप दिनेश महाराज आळंदीकर यांचे तर सहकार्य हनुमान वारकरी भजन मंडळ वऱ्हा, तसेच प्रमुख अतिथी आमदार राजेश वानखडे उपस्थीत राहणार आहे सायं. ५ वा. महाप्रसाद वितरण होईल. असे विनित श्री संत मारोती महाराज उर्फ घंटीवाले बाबा देवस्थान व वऱ्हा ग्रामवासी यांनी केले आहे.

# अहिल्यादेवींचा पुतळा विटंबना व हिंदू मंदिरे तोडण्याच्या निषेधार्थ काँग्रेस आक्रमक

**तिवसा/वार्ताहर**

उत्तर प्रदेश राज्यातील वाराणसी येथील मनाकरणी का घाटाची नाशदूस व लोकमाता राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्तीच्या विटंबनेबाबत तिवसा तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस,महिला काँग्रेस यांनी आक्रमक पवित्रा घेत राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेसह तिवसा तहसील कार्यालयावर शेकडोंच्या संख्येने धडक देत केंद्र सरकारच्या वाराणसी कॉरिडॉर विकास आराखड्याचा निषेध नोंदविला.

पुरोगामी विचारसरणीचा वारसा जपणाऱ्या महापुरुषांच्या आठवणी पुसण्याचा काम केंद्र सरकार एका विशिष्ट ध्येयाने करत असल्याचा आरोप यावेळी तालुका काँग्रेस कमिटीने केला.सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी काशी विश्वेश्वर घाट, त्या ठिकाणी नादुरुस्त मंदिरांची पुनर्बांधणी, तिथला जिर्णोद्धार व धर्मशाळांचे बांधकाम करत सामाजिक ऐतिहासिक व धार्मिक वारसा जपण्याच काम केले.अयोध्येमध्ये सुद्धा कॉरिडोर व पुनर्विकासाच्या नावावर असा वारसा नष्ट करणे योग्य नसल्याच्या भावना यावेळी उपस्थित त्यांनी व उपस्थित



धनगर समाजाच्या बांधवांनी व्यक्त केल्या.तालुका अध्यक्ष वैभव स. वानखडे, शहरअध्यक्ष सेतू देशमूख, माजी सभापती कल्पना दिवे, महिला काँग्रेस अध्यक्ष रूपाली काळे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवींद्र राऊत, प्रकाशराव सोनोने, अनिल थुल, सुरेशराव धवने, दिलीप वानखडे,माधुरी निमकर, पूनम काळमेघ, नगरसेविका अर्चना भोंबे, सावित्री वाघमारे, राणी उमरे, जयाताई गंधे,बेबीताई बाखडे, सरिता गौरखेडे, सुनील बाखडे, गटनेते किसन मुंदाने,अतुल गवड, नरेंद्र विघ्ने, नंदकुमार गोहत्रे, विश्वजीत बाखडे, स्वप्निल गंधे, हरिदास भगत, अनिकेत तालन, अंकुश ढेवले, नारायण गोहत्रे, योगेश माहुरे, किशोर गोरडे, बाळासाहेब घुरडे, जनार्दन लांडगे, गिरधर राठोड, सुरेंद्र ढगे, गौतम ढोणे, प्रदीप दमाये,सुनिल राऊत, धिरज ठाकरे, यश करडे, आशिष ताथोडे,विठ्ठल निंभेकर, गजानन भोंबे, रोहन वानखडे, अक्षय रोडगे, अक्षय पवार, दिवाकर भुरभुरे, अतुल खुळे, संजय हेडा, हरिदास भगत, विशाल सावरकर, वसंत जीरापुरे, विनोद मसलदी, प्रणव गौरखेडे, संजय चौधरी, श्रीकांत माहोरे, विजय डोंगरे, मंगेश राऊत, अनिल मेश्राम, महेंद्र वानखडे, गौरव देशमुख,आशिष बायस्कर, वैभव काकडे, निलेश खैरकर, आकाश मकेश्वर,अनिकेत प्रधान, वैभव ढवळे,गौरव चौधरी, तुषार लेवटे, अजय बाखडे, तुषार लेवटे, आदेश पवार, प्रसाद लाजूरकर, पुष्कर वानखडे, हर्षल कडू आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्री.संत गोरोबा काका समाजोन्नती समितीच्या अध्यक्षपदी प्रा.सुरेश नांदुरकर

**अमरावती/क़ा.प्र.**

शिक्षण आणि उद्योग हाच समाजविकासाचा खरा पाया आहे, हा विचार घेऊन गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत असलेल्या श्री संत गोरोबा काका समाजोन्नती बहुउद्देशीय समितीची (मर्या. महाराष्ट्र राज्य) सन २०२६ ते २०३० या कालावधीकरिता पंचवार्षिक निवडणूक आणि आमसभा नुकतीच स्थानिक गोरोबा भवन, शशी नगर, बडनेरा रोड येथे उत्साहात पार पडली. या निवडणुकीत संस्थेच्या अध्यक्षपदी प्रा. सुरेशराव नांदुरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

आमसभेचे अध्यक्षपद समाजरत्न पंजाबराव काकडे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ कुंभार समाज सुधार



समितीचे अध्यक्ष डॉ. सुधाकरराव शेंडोकार उपस्थित होते. सचिव डॉ. श्रीरामजी कोल्हे यांनी संस्थेचा प्रगती अहवाल, जमाखर्च आणि ताळेबंद मंजुरीसाठी सादर केला, तर डॉ. दीपकराव साळीवकर यांनी ऑडिट रिपोर्टला मंजुरी देण्याचा प्रस्ताव मांडला. प्रा. सुरेशराव नांदुरकर यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले. यावेळी निवडणूक अधिकारी राजेंद्र नांदुरकर यांनी नवीन कार्यकारिणीची घोषणा केली: नवनियुक्त कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष प्रा. सुरेशराव नांदुरकर, कार्याध्यक्ष संतोषराव सरोदे, उपाध्यक्ष दिलीपराव खांडेकर व के. एन. मोरे, सचिव डॉ. श्रीरामजी कोल्हे, कोषाध्य सतीशराव गावंडे, सहसचिव सुरेंद्रजी सरोदे, सहकोषाध्यक्ष रामेश्वरराव वडुरकर यांची तर सदस्य म्हणून संजयजी गंधरवार, रमेशराव तांबट, विनोदजी काकडे, देविदासराव खोपे, प्रफुल्लजी खोपे, राजेंद्रजी मांगुळकर, अरुणराव पोहनकर, डॉ. दीपकराव साळिवकर आणि वनमाला जवळेकर यांची निवड करण्यात आली. याशिवाय विधी सल्लागार म्हणून ॲड. गजाननराव तांबट, विभागीय संपर्क प्रमुख म्हणून इंजि. पंडितराव जवळेकर तर मार्गदर्शक म्हणून मारोतराव शेंडोकार आणि पंजाबराव काकडे यांची निवड करण्यात आली.यावेळी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मला नांदुरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुरेंद्र सरोदे यांनी केले. सहभोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समाजातील अनेक मान्यवर व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवलमध्ये शारदा गणोरकर समाजरत्न पुरस्काराने सन्मानित



**परतवाडा -** कांडली येथील फुले प्रेमी संविधानदूत आदर्श शिक्षिका शारदा अरुण गणोरकर यांना नुकतेच पुणे येथील आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल मध्ये संविधान ग्रंथ, सन्मान चिन्ह, शाल व पुष्पगुष्य देऊन समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भिडेवाडाकार फुले पुत्र आदर्श शिक्षक विजय वडवेराव यांनी सदर फेस्टिवलचे आयोजन उत्कृष्टपणे केले होते. सदर फेस्टिवल मध्ये राज्यातील अनेक जिल्ह्यातील तसेच गोवा, अबुधाबी, तेलंगणा, गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक आदी प्रांतातील फुले प्रेमी सहभागी झाले होते. कवियत्रींनी माता सावित्रीचा पेहराव प्रदान करून दर्जेदार सादरीकरण केले. तसे पाहता आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल मध्ये आलेला प्रत्येक व्यक्ती समान असतो.शारदा गणोरकर यांच्या शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल यापूर्वी अनेक आयोजकांनी घेऊन त्यांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सुनील केदार यांचे बबलू देशमुख यांच्याकडून स्वागत

**अमरावती/का.प्र**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात साहेब तसेच माजी मंत्री सुनील केदार हे अमरावती दौऱ्यावर आले होते. अमरावती येथे आगमन होताच जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण)चे जिल्हाध्यक्ष बबलूभाऊ देशमुख यांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने मान्यवर नेत्यांचा सत्कार करण्यात आला. दौऱ्यादरम्यान जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती, संघटनात्मक मजबुती, कार्यकर्त्यांचे प्रश्न तसेच आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. काँग्रेस पक्ष अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम करावे, असे मार्गदर्शन माजी मंत्री बाळासाहेब थोरात व सुनीलभाऊ केदार यांनी केले.

या प्रसंगी माजी आमदार विरेंद्रभाऊ जगताप, बबलूभाऊ शेखावत, संदेश सिंगलकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या भेटीमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



## वार्षिक स्नेहसंम्मेलनात विद्यार्थांच्या कलागुणाचे प्रदर्शन
### जिल्हा परिषद प्राथमिक शाळाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

पंचायत समिती मधिल गणोरी केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उत्तमसरा येथ वार्षिक स्नेहसंम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात नृत्य, भारुड, आदिवासी नृत्य, शेतकरी नृत्य, लावणी, बालगीत, लोकगीत असे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. या उद् घाटन उत्तमसरचे सरपंच धमेन्द्र मेहरे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष रत्नदिप सवाई होते तर प्रमुख अतिथी हायस्कुलचे मुख्याध्यापक लोमेश खैरकर, पोलिस पाटिल सचिन सवाई, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सौ.प्रिया मानकर, सदस्य बंडू थोटे, वनिता जोगी, अनुराधा भिंगारे, मुख्याध्यापिका मिनाक्षी इंगळे,



स.शि. राजेश सावरकर, गजानन येलोने, प्रमोद कांबळे,श्रध्दा बोबडे, अपर्णा झाडे, संगिता कराळे उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद् घाटन करण्यात आले.यावेळी स्काउड गाईड माधिल सहभागी मुलिंचा प्रमाणपत्र व शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी मदन मंजरी लावणी,गोल गोल रिमिक्स,लव्ह यु जिंदगी,मंगळा गौरी,लुंगी डान्स,हिल पोरी हीला,रडू नको बाळा,पर्यावरण गीत,फुले सावित्री नसती तर,रंग दे बसनती चोला देशभक्ती गीत,उदळ उदळ,मायनेम इज लखन,आदिवासी नृत्य,आम्ही जातीच शेतकरी (शेतकरी नृत्य), चिऊ ताई चिऊ ताई, कुऱ्हा चालल्या रानात, स्वर्गात आकाश गंगा, गाव सुटेना राणी, जलवा तेरा जलवा, तिनो बानो के धारी,केसरी के लाल, भिमानं माय सोन्याने भरली ओटी, राज्यस्थानी नृत्य आणि अणवी मेहरे हींच्या भारूड सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

## कुंदकेश्वर शिवमंदिरात शंकर गिरी महाराज यांच्या हस्ते शिवलिंगाची स्थापना

**अंजनगाव बारी -** येथील बारी समाज बांधव व महिलावर्गाच्या लोक वर्गनीतून केलेल्या सहकार्यातून अंजनगाव बारी येथील पानसात चौक येथील 'बारी पंच हॉल' परिसरात कुंदकेश्वर महादेव शिव मंदिराचे स्थापना करण्यात आली.विविध धार्मिक कार्यक्रमासह कुंदकेश्वर मंदिर येथून शिवलिंगाची 'भव्य मिरवणूक व पालखी शोभायात्रा' सोहळा गावातून मोठ्या उत्साहात काढण्यात आला.



कुंदकेश्वर शिव मंदिरात शिवलिंगाची स्थापना व कळस रामगीर महाराज देवस्थान मठाधिपती शंकरगीरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये ब्राह्मणांच्या हस्ते पुजा अर्चा, जोडप्यासह सामुहिक पुजा व भजने विविध धार्मिक कार्यक्रसह भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या मंदिर जिर्णोद्धार व धार्मिक कार्यक्रमाला गावकऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य लाभल्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. मिरवणुकीत शंकर- पार्वती ची 'झाकी' विशेष आकर्षण ठरली. मिरवणुकीत गावातील भजनी मंडळ, श्री गुरुदेव सेवा मंडळ महिला भजनी मंडळ, वारकरी भजनी मंडळ सहभागी झाले. हा सर्व कार्यक्रम शरद इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला यासाठी गावातील बारी समाज बांधव व इतर समाज बांधवांनी आपले अमूल्य योगदान दिले.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी कॉलेजमध्ये राष्ट्रीयस्तरीय स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन
### विद्यार्थ्यांनी अनुभवला आठ तासांचा कोडिंग थरार, विजेत्या संघाला मिळणार दोन लाखांचे पारितोषिक

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती येथे संस्थेच्या प्रतिष्ठित वार्षिक तांत्रिक महोत्सव टेकलॉन्स २०२६ अंतर्गत आयोजित राष्ट्रीयस्तरीय हॅकॅथॉन २०२६ मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचा, नवोन्मेषी विचारांचा आणि समस्या-निराकरण क्षमतेचा प्रभावी प्रत्यय आला.

हॅकॅथॉनचे उद्घाटन पॅरिस्टंट सिस्टीम्स लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी नवोन्मेष, उद्योगाभिमुख कौशल्ये आणि समाजोपयोगी उपाय विकसित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी केवळ कोडिंगपुरते न राहता वास्तवातील समस्या सोडवणारे तांत्रिक उपाय सादर करावेत, असे आवाहन त्यांनी केले. आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव शेअर करत त्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला, ज्यामुळे संपूर्ण वातावरण प्रेरणादायी झाले.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रविण पोटे पाटील,



उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मोहम्मद जुहैर सर्व डीन , सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.आठ तासांची कोडिंग मॅरेथॉन असलेल्या या हॅकॅथॉनसाठी एकूण २ लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली होती. विजेत्या संघास १ लाख रुपये, तर पाच समस्या-विषयक विशेष बक्षिसे प्रत्येकी २० हजार रुपये समारोपीय समारंभात देण्यात येणार आहेत. अंतिम फेरीसाठी देशभरातील विविध अभियांत्रिकी संस्थांमधून निवडलेल्या ५० संघांतील २५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. हॅकॅथॉनमध्ये AI/ML in Healthcare, Generative AI in Supply Chain, AI for Training & Placement, Industry ५.० आणि Open Innovation अशा भविष्योन्मुख समस्या विधानांवर विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण उपाय सादर केले. विभाग प्रमुख डॉ विजय गडीचा यांच्या मार्गदर्शनात प्रा. अखिलेश तायडे व प्रा. ए. डी. चोखट यांनी काम समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. तसेच करमवीर सिंग ओबेरॉय, आयुष चेनानी आणि अथर्व खवाले यांनी तांत्रिक मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. विद्यार्थी समन्वयक यशोवर्धन ठाकरे व वैष्णवी सावरकर यांनी नोंदणीपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. महाविद्यालयाच्या परिसरात पार पडलेल्या या हॅकॅथॉनमुळे नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मकतेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

# माजी मंत्री प्रवीण पोटे यांच्या राजीनाम्याची अफवा



## सोशल मीडियावर व्हायरल होताच खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यापासून भारतीय जनता पक्षात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात असतानाच, आज मंगळवारी २० जानेवारीला दुपारी माजी मंत्री प्रवीण पोट यांच्या राजीनाम्याची अफवा वाऱ्यासारखी पसरली. सोशल मीडियावर ही पोस्ट तुफान व्हायरल झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. मात्र, खुद्द पोटे यांनीच याचे खंडन केल्याने या चर्चेवर अखेर पडदा पडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी २:२५ वाजताच्या सुमारास धारणी येथील एका व्हॉट्स अ‍ॅप ग्रुपवर प्रवीण पोटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचा संदेश आला. पाहता पाहता हा संदेश फेसबुक, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाला. यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. विशेष म्हणजे, ज्यावेळी ही अफवा पसरली, त्यावेळी प्रवीण पोटे एका महाविद्यालयीन कार्यक्रमात व्यस्त होते. ही बातमी त्यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनीही आश्चर्य व्यक्त केले आणि हे विरोधकांचे षडयंत्र असल्याचे स्पष्ट केले.

### 'माझ्या रक्तात भाजप, मी शेवटपर्यंत पक्षासोबतच!'

सोशल मीडियावरील या पोस्टमुळे संतप्त झालेले माजी मंत्री प्रवीण पोटे म्हणाले की, 'ही पोस्ट पूर्णपणे तथ्यहीन असून माझ्या विरोधात रचलेले हे एक षडयंत्र आहे. माझ्या रक्तात आणि विचारात भाजप आहे. मी शेवटपर्यंत भारतीय जनता पक्षासोबतच राहणार असून पक्ष सोडण्याचा विचार स्वप्नातही करू शकत नाही. कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी अशा कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये.' सोशल मीडियावरील या प्रकारामुळे भाजप कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पोटे यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी जाणीवपूर्वक हा खोडसाळपणा करण्यात आल्याची चर्चा शहरात रंगली होती. ही केवळ अफवा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

# अखेर उपचारादरम्यान मंथन देशमुखचा मृत्यू

**अपघातातील दोषी वाहन चालकाच्या अटकेची मागणी**

## मृतदेह घेऊन नातेवाईक धडकले तिवसा पोलीस ठाण्यावर






**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा शहरालगत असलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील वनी फाटा येथे बोलेरो कार व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात अखेर एका निष्पाप युवकाचा बळी गेला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मंथन बबन देशमुख (वय १८, रा. वणी) यांचा अमरावती येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला. यामुळे संतप्त झालेल्या नातेवाईक व नागरिकांनी तिवसा पोलीस स्टेशन येथे धडक देऊन दोषी वाहनचालकाला अटक करण्याची मागणी रेटून धरली होती.युवकाच्या या मृत्यूमुळे वणी व तिवसा परिसरात शोककळा पसरली आहे. दि. १७ जानेवारी रोजी दुपारी ही अपघाताची घटना घडली होती. वनी फाटा येथे दुचाकीवरून जात असताना नागपूरकडून भरधाव वेगात येणाऱ्या ☞(पान २ वर)

# पिंपळखुटा येथील ग्रामसेवकाचा मनमानी कारभार

## गावकऱ्यांनी केली बदलीची मागणी, -गटविकास अधिकारी यांना निवेदन

**धामणगाव रेल्वे/ प्रतिनिधीः-** पिंपळखुटा येथील ग्रामसेवकाचा मनमानी कारभार सुरू असल्यामुळे गावकऱ्यांनी त्यांच्या बदलीची मागणी गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.

ग्रामपंचायत पिंपळखुटा येथील ग्रामसचिव यांचा बदलीचा मुद्दा सध्या खूप जोर धरत आहे. ग्रामसचिव यांच्यावर ऑगस्ट महिन्यामध्यो झालेल्या ग्रामसभेमध्ये भ्रष्टाचाराचे आरोप लागले होते. त्याअंती त्या ग्राम सभेमध्ये त्यांना गावातील युवक व महिला यांनी प्रश्न विचारले होते. त्या प्रश्नाला अनुसरून ग्रामसेवकांना काही उत्तर देता आले नाही. त्यामध्ये गावातील युवकांनी रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध रुपयांची बिले परस्पर काढले व भ्रष्टाचार केला असे गंभीर आरोप त्यांच्यावर लावण्यात आले होते. या ग्रामसभेअंती त्यांना काही तासासाठी ग्रामपंचायत मध्ये डांबून सुद्धा ठेवण्यात आले होते. त्यानंतर पोलिसांना बोलावून वाद शांत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु ग्रामस्थ कुठेही ऐकण्यास तयार नव्हते. अशा वेळेस धामणगाव रेल्वे येथून फोन लावून संबंधित अधिकारी यांना बोलवण्यात आले . त्यांनी त्या सभेमध्ये लोकांना व्यवस्थित रित्या हाताळून वाद शांत केला. सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्या जाईल असे आश्वासन दिले.

गावामध्ये महिलांनी सुद्धा अनेक प्रकारचे आरोप त्यांच्यावर केले आहे, त्यामध्ये कुठलेही काम घेऊन त्या ठिकाणी गेले असताना त्यांना उडवा उडवीची उत्तरे देणे, जन्म मृत्यू यांचे २०१६ आधीचे नोंदी नसलेल्या दाखल्याबद्दल योग्य माहिती न देणे, बांधकाम विभागाच्या फॉर्मवर सही न देता त्यांना स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र मागणे, घरकुल मध्ये घोटाळा करणे, पिक विम्याच्या संदर्भात तक्रारी समजून न घेणे, मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजनेअंतर्गत सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्याशी चर्चा न करीता गावातील विशिष्ट व्यक्तीचे ऐकून त्यांना राजकारणात लाभ पोहोचवणे.असे बरेच आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आलेले आहे. गावकऱ्यांचे असे ही म्हणणे आहे की, ☞(पान २ वर)

# नगरपालिकेत विषय समित्यांवर भाजपाचे वर्चस्व सिद्ध

## बच्चू वानरे, ठाकरे, देशमुख, मोटवानी, दुर्गा भूत यांची सभापतीपदी निवड

**कार्यकर्त्यांचा जल्लोष; नवनिर्वाचित सभापतींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत**



**चांदूर रेल्वे/ प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे नगरपालिकेच्या विषय समित्यांची निवडणूक मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी पार पडली. पीठासीन अधिकारी तथा अचलपूर मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड, चांदूर रेल्वेच्या मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे आणि नगराध्यक्षा प्रियंका विश्वकर्मा यांच्या उपस्थितीत ही निवडणूक प्रक्रिया संपन्न झाली. या निवडींमध्ये भारतीय जनता पक्षाने आपले पूर्ण वर्चस्व सिद्ध केले आहे.

नवनियुक्त पदाधिका-यांमध्ये ,नियोजन व विकास समिती सभापती बच्चू वानरे (उपाध्यक्ष) तर समिती सदस्य शालिनी राऊत,प्रियंका वरठे, हर्षल वाघ, डॉ. सुभाष पनपालिया यांचा समावेश आहे. बांधकाम समिती सभापती गजानन ठाकरे तर सदस्य म्हणुन अंकिता कदम,ममता राय,आनिस सौदागर, अरिहंत गेडाम असून पाणीपुरवठा समिती सभापती प्राविण्य ☞(पान २ वर)

# परतवाडा-अंजनगाव मार्गावरील वाढते अपघात

## आ. केवलराम काळे यांनी घेतली अधिकाऱ्यांसह आढावा बैठक

**अचलपूर/ प्रतिनिधीः-** परतवाडा ते अंजनगाव राष्ट्रीय महामार्गावर अलीकडच्या काळात अपघातांचे प्रमाण लक्षणीय रीत्या वाढल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर अपघात रोखण्यासाठी व रस्ते सुरक्षेसंदर्भात ठोस उपाययोजना राबविण्याच्या उद्देशाने मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्किट हाऊस



परतवाडा येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आ.काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रमोद वानखडे , ☞(पान २ वर)

**व्यवसायिक निलेश बदुकले हत्या प्रकरण**

# आरोपी अजय लंगोटेला २२ पर्यंत पीसीआर

**बेलोरा/ प्रतिनिधीः-** चांदूर बाजार तालुक्यातील गौण खनिज व्यवसायिक निलेश बदुकले यांच्या हत्या प्रकरणात आरोपी अजय लंगोटे याला २२ तारखेपर्यंत पोलीस कोठडी (पीसीआर) देण्याचा आदेश चांदूरबाजार न्यायालयाने दिला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने तपास यंत्रणेला सखोल चौकशीसाठी ही मुदत मंजूर केली.

व्यावसायिक निलेश बदुकले यांचा गाडीने अपघात करून



जाणीवपूर्वक हत्या करण्यात आली होती. या घटनेने चांदूरबाजार शहरासह संपूर्ण

# दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धरमकाट्यावर वजनात तफावत

## वजन ४० किलोने कमी, शेतकऱ्याची तक्रार

**खल्लार/ प्रतिनिधीः-** कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूरच्या धरम काट्यावर एका शेतकऱ्याने कापूस गाडी वजन करण्यासाठी नेली असता त्या काट्यावर संबंधित शेतकऱ्याचा कापूस कमी भरला. उलट त्याच कापूस गाडीचे जिनींगमध्ये वजन केले असता ते जास्त भरले. त्यामुळे याबाबत संबंधित शेतकऱ्याने ☞(पान २

### कोणता धरम काटा खरा, सखोल चौकशी करा

कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर येथे शेतकऱ्यांचा घाम गाळून, मेहनत करून, कर्ज काढून पिकविलेला कापूस खरेदी केला जातो. येथे वजन करण्यासाठी दोन धरम काटे असून दोन पैकी कोणता धरम काटा खरा व कोणता खोटा समजायचा असा प्रश्न निर्माण होतो. या धरमकाट्यावर व इतर प्रशासकीय यंत्रणेवर संचालक मंडळाचे लक्ष आहे काय ? किंवा संचालक मंडळ जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून नेमका कोणाचा फायदा करतो हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे शेतकरी व व्यापारी यांच्या होणाऱ्या नुकसानास जबाबदार कोण? या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून शेतकरी व व्यापारी यांची होणारी पिळवणूक थांबविण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.याबाबतची तक्रार सहाय्यक निबंधक, कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव,तहसिलदार दर्यापूर व ठाणेदार यांच्याकडे भिमराव कुऱ्हाडे यांनी केली आहे.

# दर्यापूर-दहीहांडा रस्त्याच्या निकृष्ठ कामाचा सामाजिक कार्यकर्त्याने केला पंचनामा

## आ.गजानन लवटे यांनी अधिकाऱ्यांना भर रस्त्यात झापले!

**खल्लार/ प्रतिनिधीः-** दर्यापूर ते दहीहांडा या मुख्य मार्गावर कंत्राटदाराने सुरू केलेल्या बोगस पॅचवर्कच्या कामाला शिवसेना (उबाठा) ने दणका दिला आहे. सामाजिक कार्यकर्ते व युवानेते नितेश गावंडे यांनी या भ्रष्टाचाराचा व्हिडिओ काढून भांडाफोड केल्यानंतर आमदार गजानन लवटे यांनी 'शिवसेना स्टाईल'मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. 'जनतेच्या जिवाशी खेळाल, तर गाठ आमच्याशी आहे,' असा सज्जड दम यावेळी देण्यात आला.

### काम बंद पाडून कारवाईची मागणी

गेल्या अनेक दिवसांपासून दर्यापूर दहीहांडा रोडच्या दुरवस्थेमुळे नागरिक त्रस्त होते. यावर उपाय म्हणून सुरू असलेले



पॅचवर्क म्हणजे निव्वळ धूळफेक असल्याचे नितेश गावंडे यांच्या पाहणीत समोर आले. डांबराचा लवलेशही नसलेले हे काम नितेश गावंडे यांनी चक्क हाताने उखडून दाखवले.शिवसेना स्टाईलने हा भ्रष्टाचार आम्ही उखडून टाकू असा इशारा देत त्यांनी कंत्राटदाराची पोलखोल केली. ☞(पान २ वर)

# अमरावतीत प्रथमच १२ लाखांच्या बक्षीसांची अखिल भारतीय बुद्धिबळ स्पर्धा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** विदर्भाच्या बुद्धिबळ इतिहासात प्रथमच अमरावती येथे १२,००,०००(बारा लाख रुपये) इतक्या विक्रमी बक्षीस रकमेची अखिल भारतीय फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

अखिल भारतीय १७०० खालील फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धा – २०२६ ही स्पर्धा दि. २३ ते २५ जानेवारी २०२६ या कालावधीत शुभम मंगलम, दसरा मैदानासमोर, बडनेरा रोड, अमरावती येथे होणार आहे. या तीन दिवसीय स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित, उदयोन्मुख तसेच अनरेटेड बुद्धिबळ खेळाडू



मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक १,११,०००/- असून, १५०१ ते १६०० मानांकन गटासाठी प्रथम बक्षीस ७१,०००/-,

१४०१ ते १५०० मानांकन गटासाठी प्रथम बक्षीस ७१,०००/- ठेवण्यात आले आहे.याशिवाय विविध वयोगट, महिला खेळाडू, ज्येष्ठ खेळाडू व विशेष गटांसाठी एकूण १५१ पेक्षा अधिक आकर्षक बक्षिसांची योजना करण्यात आली असून, सर्व गटांसाठी मिळून एकूण बक्षीस रक्कम १२ लाख इतकी आहे.खेळाडू व पालकांच्या सोयीसाठी स्पर्धास्थळीच भोजन व निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अमरावती चेस असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष प्रतिक घोगरे, सचिव पवन दोडेजा, तसेच होनेस्ट स्पोर्ट्स अकॅडमीचे इफतिकार शेख यांनी विदर्भातील १७०० पेक्षा कमी मानांकन असलेल्या सर्व खेळाडूंनी या दुर्मीळ संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ☞(पान २ वर)

# दिलदार ढाब्यामध्ये शिरले दोन बिबट

## -सीसीटीव्हीत झाले कैद

**चिखलदरा/ प्रतिनिधीः-** येथील वन उद्यान जवळील दिलदार ढाब्यामध्ये सोमवारी रात्री दोन बिबट शिरल्याने एकच खळबळ उडाली. ढाब्या मध्ये लागलेल्या सीसीटीव्ही मध्ये बिबट कैद झाले आहे. बिबट दिसल्यावर तेथून श्वान गायब झाल्याचे देखील समोर आले आहे. यामुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. माहितीनुसार वन उद्यान परिसरात दिलदार ढाबा आहे. नेहमीप्रमाणे संचालक सोमवारी रात्री ढाबा बंद करून गेले होते. मध्यरात्री सुमारास दोन बिबट या ढाब्यामध्ये शिरले. बिबट्यांना पाहताच परिसरात असलेले श्वान तेथून पळाले. आज मंगळवार २० जानेवारीच्या सकाळी जेव्हा ढाबा संचालक दुकानात पोहोचले



तेव्हा त्यांनी सीसीटीव्ही तपासले तर त्यामध्ये दोन बिबट दिसले. यामुळे ते घाबरले त्यांनी याची माहिती तात्काळ वन विभागाला दिली. ☞(पान २ वर)

# संयुक्त किसान मोर्चाचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निर्दशने




## राष्ट्रीय विरोध दिवस पाळला

**अमरावती/ प्रतिनिधीः-** संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने आज मंगळवार २० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर राष्ट्रीय विरोध दिवस पाळून निर्दशने देण्यात आली. देशाच्या राजधानी मध्ये ऐतिहासिक किसान आंदोलन तब्बल ३८६ दिवस चालले. सरकारच्या वतीने आश्वासनं दिली होती. तीन काळे कृषी कायदे मागे घेण्यासोबत आधार भावाचा कायदा एमएसपी करण्याचे उद्देशाने पावले टाकू असे ☞(पान २ वर)

# मोर्शी नगरपरिषदेत विषय समितीच्या सभापतींची निवड

## बांधकाम सभापतीपदी अमन गायकी अविरोध







**मोर्शी/ प्रतिनिधीः-** मोर्शी नगरपरिषदेच्या विषय समितीच्या सभापती पदाची निवडणूक आज दि.२० जानेवारी रोजी अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात अविरोध पार पडली.

सार्वजनिक बांधकाम सभापतीपदी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे अमन गायकी यांची अविरोध निवड करण्यात आली.या समितीवर सदस्य म्हणून हर्षल चौधरी,नितीन पन्नासे,आनंद सदातपुरे, रवी परतेती यांची निवड झाली.

शिक्षण सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अंकुश घारड यांची निवड करण्यात ☞(पान २ वर)